७६३६
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. ५८५

REFBK-0005441

# मार्क्सवाद -

## -नवयुगाचें तत्वज्ञान.

REFBK-0005441

लेखक:—
स. रं. सुठणकर, एलएल्. बी.
धारवाड.

किंमत ८ आणे.

प्रकाशक:—

र. वा. जठार.

संपादक राजहंस, धारवाड.

❀ ❀ ❀ ❀

प्रथमावृत्ती डिसेंबर १९३६.

❀ ❀ ❀ ❀

मुद्रक:—

सी. आर. देसाई

तरुण भारत प्रेस, [illegible]

प्रिय पत्नी कमलेस·



८८०२
ता. निबंध ...
ता. १-१-१९३६
ग्रं. क्र. ५६४१

## १. मार्क्सपूर्व समाजवाद.

जगाला सज्ञान दशा प्राप्त झाल्यापासून मानवी समाजांत उच्चनीच, रावरंक, जड–बुद्धिमान्, क्रूर–दयावंत, शूर–भेकड इत्यादि द्वंद्वात्मक विषमता वावरत असलेली दिसून येत आहे; किंबहुना जगांतील सर्व वस्तू, व्यापार व कृति हीं त्रिगुणात्मक आहेत असा सिद्धांत आपल्या प्राचीन पूर्वजांनीं बांधून ठेविला आहे. तथापि जगतामध्यें शक्य तितकी समता प्रस्थापित व्हावी अशी थोर पुरुषांची मूळपासून सदिच्छा असून तदनुसार त्यांचे प्रयत्नहि चालू आहेत. या प्रकारचा भेदभाव अगर विषमता जगांत नांदत आहे; ह्मणून जगाचें आदिकारण परमेश्वर आहे किंवा नाहीं अशी शंका ब्रह्मसूत्रांत उपस्थित केली आहे–"नेश्वरो जगतः कारणमुपपद्यते वैषम्यनैर्घृण्यप्रसंगत्वाच्च।" परंतु ही विषमता अगर निर्घृणता इंद्रियांचें अज्ञान असून खरें आत्मस्वरूप जाणणारांना त्याची बाधा होत नाहीं, ह्मणून प्रत्येकाने आत्मस्वरूप ओळखून घेऊन चिरकालीन शांति प्राप्त करून घ्यावी अशी आपल्या पूर्वजांची शिकवण आहे. सर्वसामान्य मानवी समाजाला ही शिकवण अव्यवहार्य असल्याकारणानें ती फोल ठरते! गौतम बुद्धालाहि जगतांतील दुःखमय विषमता व निर्घृणता पाहून अत्यंत विषाद वाटला व सर्व मानव जातीस शांती प्राप्त व्हावी या सद्हेतूने त्यानें नूतन धर्माची प्रस्थापना करून त्याचें लोण मानवी समाजांतील दलितवर्गापर्यंत पोहोचविलें. परंतु हिंदुस्थानची भूमि ही सुपीक व धनधान्यसमृद्ध असल्यामुळें

संसारांतील शारीरिक व मानसिक सुखदुःखात्मक विषमतेखेरीज आर्थिक विषमतेकडे आपल्याकडील विचारवंतांचें लक्ष न जातां त्यांनीं मनुष्य प्राण्याची दुःखमय जन्ममरणांतून सुटका कशी होईल हें शोधून काढण्याकडे आपलें बुद्धिसर्वस्व खर्चिलें. शिवाय येथच्या लोकांच्या मनावर धर्माची व धर्मतत्वांची जबर पकड असल्यामुळें सहसा जुलमी सत्ताधीश येथें निपजत नव्हते. त्याचप्रमाणें येथील ग्रामसंस्था, लोकसत्ताक व नियंत्रित लोकसत्ताक राज्यें, चातुर्वर्ण्यव्यवस्था, यज्ञसंस्था इत्यादि सांघिक संस्थांच्या अस्तित्वामुळें मुसलमानांचा अंमल येथें चालू होईपर्यंत येथील प्रजाजनांना राजकीय अगर धार्मिक जुलूम अगर आर्थिक पिळणूक यांची विशेष झळ लागली नाहीं.

परंतु, पाश्चात्य देशांत निराळा प्रकार घडून आला. तेथें अन्नवस्त्र-प्रावरणासाठीं मनुष्यप्राण्याला निसर्गाशीं पहिलेपासून पुष्कळ झगडावें लागल्यामुळें तेथें आर्थिक बाबींना अधिक महत्व प्राप्त झालें; व तेथील प्रजा विशेष कर्तृत्ववान् निपजूं लागली. आर्थिक विषमतेकडे तेथील विचारवंतांचें विशेष लक्ष लागून राहिलें. सुप्रसिद्ध प्राचीन ग्रीक तत्ववेत्ता प्लेटो यानें आपल्या समकालीन जुलमी सत्ता व दीनदुबळ्यांची पिळणूक हीं अवलोकन करून आपल्या 'आदर्श लोकसत्ता' [ Ideal Republic ] या पुस्तकांत आदर्शभूत समाजरचना कशी असावी याचें मनोरम चित्र रेखाटिलें आहे. तसेंच बायबलच्या जुन्या करारांत आमोस, इसाइहा, होशिया वगैरेनीं अधिकारी वर्गाचा जुलूम, पुरोहितवर्गाची कृष्णकृत्यें, अनाथ प्रजेची पिळणूक यांचा उल्लेख केला आहे. यांतूनच पुढें समतेच्या तत्वावर सत्ययुगाची निर्मिती होईल असें त्यांनीं भाकित केलें आहे. बायबलांत ईशप्रभूच्या राज्याचें–प्रेम व समता यावर अधिष्ठित केलेल्या राज्याचें वर्णन आहे. त्याचप्रमाणें जॉन विक्लिफ, सर थॉमस मूर यांचें युटोपियांतील नंदनवनतुल्य वर्णन नमुनेदार आहे. यानंतर अगदीं अलिकडे यान्त्रिक युगाला सुरवात झाल्यानंतर रॉबर्ट ओवेन, फोरिअर, प्रौढन,

वगैरेनीं साम्यवादी रचना अस्तित्वांत येण्याकरतां अनेक स्तुत्य प्रयोग केले; परंतु ते निष्फल झाले. कारण यांचा साम्यवाद विज्ञानशुद्ध (Scientific) नव्हता. मानवी स्वभावाची स्वार्थमूलक रचना त्यांच्या स्पष्टपणें लक्षांत आली नाहीं. त्याचप्रमाणें सामाजिक विकासाचा आर्थिक उलगडा त्यांना आकलन झाला नाहीं. अल्पसंख्य अधिकाऱ्यांचीं मनें गुण्यागोविंदानें वळवून क्रमाक्रमानें समतावादाची प्रस्थापना करितां येईल असा त्यांना विश्वास वाटत होता. अखेर हा त्यांचा विश्वास फोल ठरला. परंतु या मार्क्सपूर्वकालीन समाजवाद्यांच्या प्रयोगामुळें समाजवादाच्या विचारांना चालना मिळून साम्यवादस्वरूप वृक्षाला मार्क्स व एंजल्स यांच्या सारख्यांच्या विचारांची गोड फळें आलीं. या सत्ययुगवाद्यांची विचारसरणी ईश्वराची न्यायप्रीति व समदृष्टी यावर अधिष्ठित झाली होती. ईश्वर हा न्यायप्रिय, समदृष्टि असल्यामुळें जगतारंभी विश्वांतील सर्व चराचर वस्तूंवर अखिल मानवी समाजाची समान सत्ता होती. पण पुढें मानवी स्वार्थ व अधःपात यांमुळें खाजगी मालमत्तेच्या कल्पनेचा उदय झाला. उच्चनीच, रावरंक, इत्यादि भेद व अल्पसंख्याकांची दडपशाही, बहुसंख्यांकांची शोचनीय स्थिति हीं सर्व त्याच कल्पनेचीं कटु फळें होत! परंतु ही स्थिति चिरकालीन नसून अखेर भूतलावर कृतयुगाची निर्मिति होणार व तदर्थ प्रत्येकानें प्रयत्न करणें अवश्य आहे. मार्क्सपूर्व समाजवाद्यांची ही विचारसरणी अर्थात् शास्त्राच्या कसोटीस उतरणें शक्य नाहीं.

मार्क्सच्या शास्त्रीय समाजवादाची यथार्थ कल्पना येण्याकरितां प्रथम त्याच्यापूर्वीच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचें अवलोकन करणें क्रमप्राप्त आहे. या दृष्टीनें पाहतां प्रथम रूसो डोळ्यासमोर उभा राहतो.

### रूसोचा सिद्धांत—नैसर्गिक साम्यावस्था.

रूसोचा साम्यवादाला चालना देणारा महत्वाचा सिद्धान्त हा कीं, निसर्गतः मनुष्यजात ही समान अवस्थेंत असते; अर्थात् खनिजउद्भि-

आदि सर्व तऱ्हेच्या संपत्तीवर अखिल मनुष्य प्राण्यांचा सारखाच हक्क असला पाहिजे. सृष्टिनियमानुसार भूमीवर राजाइतकाच रंकाचा हक्क आहे. पृथ्वी सर्वांची आहे. तिच्यावर कोणा विशिष्ट व्यक्तीचा अगर समाजाचा 'निसर्गतः' हक्क नाहीं. अशा प्रकारें समतावादाचें बीज रूसोनें फ्रान्सच्या भूमींत पेरलें. रूसोच्या या सिद्धान्तांतूनच आंतरराष्ट्रीय साम्यवाद (International Communism) व जहाल साम्यवाद (Bolshevism) वगैरे तत्वांचा पुढें उदय झाला. समतेची कल्पना स्पष्टपणें प्रथम रूसोनें ठासून मांडली.त्याचें श्रेय त्याला देणें अवश्य आहे. रुसोनंतर सेंट सायमन, फोरियर, ब्लँक, प्रौढन, ओवेन वगैरे काल्पनिक समाजवादी होऊन गेले. यापैकीं रॉबर्ट ओवेन हा इंग्लंडांतला पहिला नामांकित कल्पनावादी (Utopian) होय ! ओवेनच्या कार्याकडे वळण्यापूर्वीं त्यावेळची इंग्लंडची परिस्थिती कशी होती हें पाहिलें पाहिजे.

## इंग्लंडांतील औद्योगिक क्रांतीचीं कटु फळें.

इंग्लंडांत प्रथम यंत्रयुगाचा उद्भव होऊन औद्योगिक क्रांति घडून आली. १८ व्या शतकाच्या अखेर उद्योगधंद्याच्या कामीं वाफेच्या शक्तीचा उपयोग होऊं लागल्यापासून अर्वाचीन भांडवलशाही समाजपद्धति निर्माण होण्यास सुरवात झाली. धूर्त, बुद्धिमान पण स्वार्थी मंडळींना वाफेच्या शक्तीच्या सहाय्यानें आतां आपणास गबर होण्यास संधि बरी आहे असें आढळून आलें. याचा परिणाम असा झाला कीं, १९ व्या शतकाच्या आरंभींच ग्रेट ब्रिटनमध्यें ठिकठिकाणीं बेकार, गलिच्छ, दलितदुःखोद्गारी व अनीतीचीं माहेरघरें अशीं औद्योगिक शहरें दृष्टीस पडूं लागलीं. या क्रांतिमुळें ग्रेटब्रिटनला विपुल द्रव्य व इतर फायदे यांची रेलचेल झाली. परंतु कामकऱ्यांच्या वांट्यास मात्र १६ तासावर राबणूक ! इतकें राबूनहि भरपूर अन्नवस्त्र मिळण्याची मारामार ! विशेषतः बायकामुलें यांचे हाल कुत्रासुद्धां खाणार नाहीं, अशी तत्कालीन वस्तुस्थिती होती. एका आठव-

ह्यांत तीन शिलिंग मिळविण्याकरितां रोज स्त्रियांना व ५।६ वर्षांच्या मुलामुलींना देखील १८–१८ तास राबावें लागत असे! त्याचप्रमाणें जर्मनी व फ्रान्समध्यें या क्रांतीचा प्रसार होऊन तेथेंही अशाच प्रकारची शोचनीय परिस्थिती उपस्थित झाली.

## रॉबर्ट ओवेन व त्याचे मार्ग.

हीं कामगारांचीं दुःखें चव्हाट्यावर आणून त्यांवर उपाययोजना करणाऱ्यांत रॉबर्ट ओवेन हा सर्वांच्या आधीं उदयास आला. हा न्यू लानार्क येथील एका कापडाच्या गिरणींतील डायरेक्टर होता. आपल्या गिरणींतील २५०० मजुरांची त्यानें एक स्वतंत्र वसाहत निर्माण केली. या वसाहतींत कामगारांच्या सर्व सुखसोयींची उत्कृष्ट व्यवस्था ठेवण्यांत आली होती. कामगारांशीं तो आपुलकीच्या भावानें वागत असे. शिस्त, स्वच्छता, काटकसर, मद्यप्रतिबंध इत्यादि सुधारणा त्यानें आपल्या कारखान्यांत घडवून आणवून लहान लहान कामगार बालकांच्या शिक्षणाकडे त्यानें विशेष लक्ष पुरविलें; व ग्रेटब्रिटनमधील बालक–शिक्षण संस्थांचा प्रथम पाया घातला. या वसाहतींतील सर्वच लोक परस्परांशीं प्रेमानें वागत असल्यामुळें कामगारांची गुन्हेगारी प्रवृत्ति हळुहळू नष्ट होत चालली. धंद्याच्या दृष्टीनें लागणारें शिक्षण कामगारांना देण्याची व्यवस्था झाल्यामुळें व सर्वत्र आपुलकीचें प्रोत्साहक व उत्तेजक वातावरण असल्यामुळें कारखान्यांत हुशार, कर्तृत्ववान्, प्रामाणिक व चिकाटीचे कामगार तयार होत असत. सर्व तऱ्हेची नूतन यंत्रयोजना, तीं यंत्रें चालविणारा प्रेमबद्ध कर्तृत्ववान कामगार समाज व ओवेनसारखा थोर मनाचा दयाशील चालक, यांच्या त्रिवेणी संगमाचा योग लानार्क येथील वसाहतींत घडून आलेला दृष्टोत्पत्तीस येत असे. औद्योगिक क्रांतीनंतर मालाची निपज कितीतरी पटीनें वाढली होती. पूर्वी सहा लाख मजूर एका दिवसांत जितका माल उत्पन्न करीत त्यापेक्षांहि अधिक माल ओवेनच्या कारखान्यांत २५०० कामगार निर्माण करीत असत. आयर्लंडमधील कामगारवर्गाची दुःखें व

आदि सर्व तऱ्हेच्या संपत्तीवर अखिल मनुष्य प्राण्यांचा सारखाच हक्क असला पाहिजे. सृष्टिनियमानुसार भूमीवर राजाइतकाच रंकाचा हक्क आहे. पृथ्वी सर्वांची आहे. तिच्यावर कोणा विशिष्ट व्यक्तीचा अगर समाजाचा 'निसर्गतः' हक्क नाहीं. अशा प्रकारें समतावादाचें बीज रूसोनें फ्रान्सच्या भूमींत पेरलें. रूसोच्या या सिद्धान्तांतूनच आंतरराष्ट्रीय साम्यवाद (International Communism) व जहाल साम्यवाद (Bolshevism) वगैरे तत्वांचा पुढें उदय झाला. समतेची कल्पना स्पष्टपणें प्रथम रूसोनें ठासून मांडली.त्याचें श्रेय त्याला देणें अवश्य आहे. रुसोनंतर सेंट सायमन, फोरियर, ब्लँक, प्रौढन, ओवेन वगैरे काल्पनिक समाजवादी होऊन गेले. यापैकीं रॉबर्ट ओवेन हा इंग्लंडांतला पहिला नामांकित कल्पनावादी (Utopian) होय ! ओवेनच्या कार्याकडे वळण्यापूर्वी त्यावेळची इंग्लंडची परिस्थिती कशी होती हें पाहिलें पाहिजे.

## इंग्लंडांतील औद्योगिक क्रांतीचीं कटु फळें.

इंग्लंडांत प्रथम यंत्रयुगाचा उद्भव होऊन औद्योगिक क्रांति घडून आली. १८ व्या शतकाच्या अखेर उद्योगधंद्याच्या कामीं वाफेच्या शक्तीचा उपयोग होऊं लागल्यापासून अर्वाचीन भांडवलशाही समाजपद्धति निर्माण होण्यास सुरवात झाली. धूर्त, बुद्धिमान पण स्वार्थी मंडळींना वाफेच्या शक्तीच्या सहाय्यानें आतां आपणास गब्बर होण्यास संधि बरी आहे असें आढळून आलें. याचा परिणाम असा झाला कीं, १९ व्या शतकाच्या आरंभींच ग्रेट ब्रिटनमध्यें ठिकठिकाणीं बेकार, गलिच्छ, दलितदुःखोद्गारी व अनीतीची माहेरघरें अशी औद्योगिक शहरें दृष्टीस पडूं लागली. या क्रांतिमुळें ग्रेटब्रिटनला विपुल द्रव्य व इतर फायदे यांची रेलचेल झाली. परंतु कामकऱ्यांच्या वांट्यास मात्र १६ तासावर राबणूक ! इतकें राबूनहि भरपूर अन्नवस्त्र मिळण्याची मारामार ! विशेषतः बायकामुलें यांचे हाल कुत्रासुद्धां खाणार नाहीं, अशी तत्कालीन वस्तुस्थिती होती. एका आठव-

ध्यांत तीन शिलिंग मिळविण्याकरितां रोज स्त्रियांना व ५।६ वर्षांच्या मुलामुलींना देखील १८-१८ तास राबावें लागत असे! त्याचप्रमाणें जर्मनी व फ्रान्समध्यें या क्रांतीचा प्रसार होऊन तेथेंही अशाच प्रकारची शोचनीय परिस्थिती उपस्थित झाली.

## रॉबर्ट ओवेन व त्याचे मार्ग.

हीं कामगारांचीं दुःखें चव्हाट्यावर आणून त्यांवर उपाययोजना करणाऱ्यांत रॉबर्ट ओवेन हा सर्वांच्या आधीं उदयास आला. हा न्यू लानार्क येथील एका कापडाच्या गिरणींतील डायरेक्टर होता. आपल्या गिरणींतील २५०० मजुरांची त्यानें एक स्वतंत्र वसाहत निर्माण केली. या वसाहतींत कामगारांच्या सर्व सुखसोयींची उत्कृष्ट व्यवस्था ठेवण्यांत आली होती. कामगारांशीं तो आपुलकीच्या भावानें वागत असे. शिस्त, स्वच्छता, काटकसर, मद्यप्रतिबंध इत्यादि सुधारणा त्यानें आपल्या कारखान्यांत घडवून आणवून लहान लहान कामगार बालकांच्या शिक्षणाकडे त्यानें विशेष लक्ष पुरविलें; व ग्रेटब्रिटनमधील बालक-शिक्षण संस्थांचा प्रथम पाया घातला. या वसाहतींतील सर्वच लोक परस्परांशीं प्रेमानें वागत असल्यामुळें कामगारांची गुन्हेगारी प्रवृत्ति हळुहळू नष्ट होत चालली. धंद्याच्या दृष्टीनें लागणारें शिक्षण कामगारांना देण्याची व्यवस्था झाल्यामुळें व सर्वत्र आपुलकीचें प्रोत्साहक व उत्तेजक वातावरण असल्यामुळें कारखान्यांत हुशार, कर्तृत्ववान्, प्रामाणिक व चिकाटीचे कामगार तयार होत असत. सर्व तऱ्हेची नूतन यंत्रयोजना, तीं यंत्रें चालविणारा प्रेमबद्ध कर्तृत्ववान कामगार समाज व ओवेनसारखा थोर मनाचा दयाशील चालक, यांच्या त्रिवेणी संगमाचा योग लानार्क येथील वसाहतींत घडून आलेला दृष्टोत्पत्तीस येत असे. औद्योगिक क्रांतीनंतर मालाची निपज कितीतरी पटीनें वाढली होती. पूर्वी सहा लाख मजूर एका दिवसांत जितका माल उत्पन्न करीत त्यापेक्षांहि अधिक माल ओवेनच्या कारखान्यांत २५०० कामगार निर्माण करीत असत. आयर्लंडमधील कामगारवर्गाची दुःखें व

गाऱ्हाणीं दूर करण्याकरितां न्यू लानार्कच्या धर्तीवर तेथील कामगारांच्या लहान लहान वसाहती कशा निर्माण कराव्या याची एक विस्तृत योजना त्यानें आंखली होती. आपल्या स्वतःच्या खर्चानें त्यानें अमेरिकेंतहि याच नमुन्याच्या आदर्श वसाहती प्रस्थापिल्या.

## ओवेनची भावनावादी विचारसरणी.

आपल्या योजनांच्या बुडाशीं असणाऱ्या तत्त्वांचा प्रसार करण्यासाठीं, 'समाजाकडे पाहण्याची नवीन दृष्टी', 'मानवी शील बनविण्याची तत्त्वें' वगैरे विषयांवर त्यानें स्वतंत्र प्रबंध प्रसिद्ध केले. त्याच्या सिद्धांताचा निष्कर्ष असा कीं, मनुष्याचें शील उत्कृष्ट बनवावयाचें असल्यास त्याच्या सभोंवती त्याच्या बाल्यावस्थेपासून शारीरिक, नैतिक, सामाजिक दृष्ट्या अनुकूल असें वातावरण अर्थात् परिस्थिती निर्माण करणें अवश्य आहे. मनुष्य हा परिस्थितीचा बंदा असल्याकारणानें त्याच्या गुणावगुणाबद्दल त्याची व्यक्ति जबाबदार न धरतां, तो ज्या परिस्थितींत वाढतो त्या परिस्थितीलाच जबाबदार धरलें पाहिजे. ओवेनच्या सरळ व सोज्वळ मनाला मनुष्याचें शील सहज बदलतां येतें असें वाटलें. त्याच्या कारखान्यांतील सुंदर वातावरण हें त्याच्या वैयक्तिक सद्गुणांचे गोड फळ आहे हे त्या महानुभावाच्या स्पष्टपणें लक्षांत आलें नाहीं. म. गांधींची विचारसरणी ही सुद्धां त्याच नमुन्याची असून तदनुसार त्यांनींसुद्धां दक्षिण आफ्रिका व साबरमती येथें आदर्श वसाहती निर्माण केल्या हें सर्वश्रुत आहेच. परंतु महात्माजींच्या गैरहजेरींत टॉलस्टॉय फार्म व आश्रम यांची कशी वाताहत झाली हें नव्यानें सांगण्याची गरज नाहीं. ओवेनप्रमाणेंच फ्रान्समध्यें बॅबॉफ कॅबेट, ब्लँक, सायमन, फोरियर, प्रौढन वगैरे साम्यवादाचा पुरस्कार करणारे अनेक आदर्श पुढारी उदयास आले. कौंट टॉलस्टॉय हा देखील कल्पनावादी होऊन गेला. त्याच्या कल्पनेनुसार पुष्कळ आदर्श समाज अगर मंडळ्या स्थापन झाल्या. केवळ मनुष्याच्या सद्भावनेवर ह्मणजे मानवी स्वभावाच्या चांगुलपणावर विश्वास ठेवून उभारलेल्या वसाहती यशस्वी होणें शक्य नाहीं.

## ओवेनच्या अपयशाची कारणें.

मानवी स्वभावावर फाजील विश्वास या सर्वसामान्य कारणाशिवाय ओवेनला अंतिम यश प्राप्त न होण्यास कांहीं विशिष्ट कारणें होतीं. ओवेन हा एक अत्यंत उदार, दयाशील व प्रेमळ अंतःकरणाचा सत्पुरुष या नात्यानें भांडवलदार समाजांतील त्याचे स्नेही व उदार हृदयाचे लोक प्रथम त्याला सढळ हातानें सहाय्य करीत असत.पण ओवेन हा दिवसेंदिवस हळुहळू साम्यवादाचा पुरस्कार करीत चालला असून सांप्रतच्या समाजरचनेंत त्याला क्रांती घडवून आणावयाची आहे हें जेव्हां त्यांच्या लक्षांत आलें तेव्हां त्यांनीं आपले हात आखडते घेऊन ओवेनला उघडा टाकिला. यामुळें, त्याला वसाहतीचा खर्च चालविणें अशक्य होऊन उलट त्याचा समाजांतील दर्जा नष्ट झाला, व त्याला आपल्या स्वतःच्या खासगी मालमत्तेला देखील पूर्णपणें मुकावें लागलें. परंतु त्याचें महत्वाचें कार्य विसरतां कामा नये. त्यानें इंग्लंडांत बालशिक्षण संस्थांच्या सहकारी चळवळीचा पाया घातला. फॅक्टरींतील मजुरांच्या कामाचे तास कमी करण्याबद्दलचे श्रेय त्याला दिलें पाहिजे. याप्रमाणें कामकरी वर्गाच्या परिस्थितींत व समाजरचनेंत त्यानें सुधारणा घडवून आणल्यामुळें त्याला फार तर सुधारणावादी ह्मणतां येईल, क्रांतिवादी ह्मणतां येणार नाहीं.

मार्क्सचा सहकारी एंजल्स हा सुद्धां प्रथम प्रथम सुधारणावादी होता. मानवी स्वभावांत हळुहळू बदल घडवून आणवून सत्ययुग प्रस्थापितां येईल; क्रांतीची गरज नाहीं असें त्याला वाटत होतें. त्याकरितां समाजांतील दोषांचें आविष्करण करून त्यांवर उपाय योजतांना मानवी स्वभावांतील दया, प्रेम, न्यायबुद्धि वगैरे भावनांवर विसंबून कार्यभाग होईल असा त्याचा समज होता. परंतु मार्क्सशीं जसजसा त्याचा दाट परिचय होऊं लागला, तसतशी त्याच्या विचारांत क्रांति घडून येऊं लागली. दया, प्रेम इत्यादि सद्भावनांच्या नंदनवनांतून त्याचें सच्छिल मन स्वार्थी जगाच्या व्यवहारांत येऊन बसलें.

## २. मार्क्सवादाचा उदय.

कार्ल मार्क्सच्या क्रांतिकारक विचारसरणीचा उदय त्याच्या जीवनांत इ. स. १८४३ च्या सुमारास झालेला त्याच्या चरित्रावरून आढळून येतो. सूर्योदयाच्या तेजानें ज्याप्रमाणें नक्षत्र गण निस्तेज होत होत अखेर लुप्तप्राय होऊन जातो त्याप्रमाणें सत्ययुगवादी अगर सुधारणावादी यांची भावनापूर्ण ध्येयवादी विचारसरणी मार्क्सच्या जडवादी टीकेच्या कसास लागल्याबरोबर निस्तेज व फिकी पडूं लागली. याचा परिणाम असा झाला कीं, सत्ययुगवाद्यांच्या धुरीणत्वाला उतरती कळा लागून

### मार्क्सवादाचा प्रभाव

मानवी मनावर प्रस्थापित होण्यास प्रारंभ झाला; व गेल्या अर्ध्या अधिक शतकांत या मार्क्सवादानें मानव जातीच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक इत्यादि विचारसरणीवर कल्पनातीत प्रभाव गाजविला असून भविष्यकालीन इतिहासांत यापेक्षांही जास्त प्रभुत्व मानवी मनावर तो गाजवील अशी चिन्हें दिसूं लागलीं आहेत. मार्क्सच्या क्रांतिकारक विचारसरणीचें दृश्य फळ ह्मणजे इ. स. १८४८ चा सुप्रसिद्ध कम्युनिस्ट जाहीरनामा हें होय. हा जाहीरनामा ह्मणजे दलित वर्गाला आत्मोद्धारार्थ संघटित होऊन अखिल मानव जातीला आर्थिक गुलामगिरींतून मुक्त करण्याबद्दल ललकारणीच होती असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं! मार्क्सचा प्रमुख सिद्धांत हा कीं:—मनुष्य प्राणी हा स्वार्थप्रेरित असल्यामुळें स्वार्थाचा प्रश्न

आला कीं, दया, प्रेम, न्यायबुद्धि वगैरे भावनांचा लोप होत जातो; तेव्हां अशा सहजासहजीं विरघळणाऱ्या भावनावर विसंबून भांडवलदार व सत्ताधीश वर्गाच्या तोंडाकडे पाहून सुधारणा घडवून आणवीत दलित वर्गाच्या स्थितींत अमूलाग्र फरक घडवून आणण्याची आशा करणें निव्वळ मूर्खपणा आहे. मानवी समाजाच्या इतिहासाचें त्यानें सूक्ष्म अवलोकन केलें व हा इतिहास ह्मणजे वर्गकलहाचा इतिहास आहे हे तत्व त्यानें शोधून काढिले. त्याचें प्रमुख कार्य हें कीं, त्यानें मानवांना मानवी इतिहासाकडे, मानवी व्यवहाराकडे, मानवी भविष्यकालाकडे पाहण्यास आर्थिक चष्मा दिला. सामाजिक विकासाचे आर्थिक महत्व त्यानें पहिल्या प्रथम मनुष्य जातीला पटवून दिलें. राजकारण, धर्म वगैरे कल्पना प्रथम आणि भाकरी मिळण्याची साधनें नंतर अशी समजूत समाजांत रूढ होती व अजूनहि पुष्कळ ठिकाणीं आढळून येते. या भावनेच्या ऐवजीं रोजची भाकरी मिळविण्यास कारणीभूत होणारी आर्थिक परिस्थिती हीच राजकारण, धर्म व नीतिविषयक कल्पनांच्या मुळाशीं आहे ही कल्पना त्यानें समाजांत प्रसृत केली. ह्मणजे राजकारण, विज्ञान, कला, धर्म वगैरे विषयांचा विचार करण्यापूर्वी प्रत्येक मनुष्यप्राण्याला गरजेप्रमाणें खावयास अन्न, प्यावयास पाणी, ल्यावयास वस्त्र, व रहावयास जागा असलीच पाहिजे, या सरळ सत्याचा आविष्कार मार्क्सनें केला. तात्पर्य, ध्येयवादी भावनामय स्वर्गस्थ वातावरणांत घुटमळणारे मानवी मन मार्क्सनें व्यावहारिक भूमिकेवर आणून सोडिले. या व्यावहारिक सत्याचा प्रकाश पाडून दलित वर्गाची पिळणूक सतत वाढत जाण्यास मानवी स्वभावांतील स्वार्थ कसा कारणीभूत आहे हें त्यानें स्पष्ट दाखवून दिलें. ह्मणजे यंत्रादि अर्थोत्पादनाच्या साधनावरील सत्ता एका वर्गाच्या ह्मणजे पुंजीवाल्यांच्या हातांत व अर्थोत्पादनार्थ राबण्याचें काम दुसऱ्या वर्गाचें ह्मणजे दलित वर्गाचें. अशी वस्तुस्थिती असल्यामुळें श्रमजीवि वर्गाच्या श्रमाचा भरपूर नफा भांडवलवाले एकसारखा खात असून त्यांचे नफेबाजीचे प्रमाण सतत वाढत्या प्रमाणावर असणें मानवी स्वार्थास

धरूनच आहे. एक वर्ग दुसऱ्या वर्गाच्या कल्याणार्थ आपल्या सत्तेचा अगर मालकीचा उपयोग करूं देईल ही गोष्ट अशक्य आहे, इतकेंच नव्हे तर उलट सत्ताधीश वर्ग आपल्या कह्यांत सांपडलेल्या दलित वर्गाला पिळून आपल्या सत्तेचा उपयोग आपली तुंबडी भरण्याकडेच करणार ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे. तेंव्हां ही पिळणूक थांबविण्यास भांडवलदार वर्गाच्या हातून यंत्रादि उत्पादनाच्या साधनावरील सत्ता हिसकावून घेऊन त्यावर दलित वर्गाची अखेर सामाजिक सत्ता प्रस्थापित करणें अवश्य आहे. असा व्यावहारिक मार्ग मार्क्सनें शोधून काढून आंतरराष्ट्रीय कामगारांच्या प्रचंड संघटनेचा पायंडा पाडला.

## मुळावरच घाव

आर्थिक विषमतेचा विषवृक्ष नाहींसा करावयाचा झाल्यास त्याच्या फांद्या तोडून भागावयाचे नाहीं. उलट ' कीं तोडिला तरु फुटे अणखी भरानें ' या न्यायानें तो वृक्ष जोरानें फोफावून येण्याचा बराचसा संभव असतो. ह्मणून त्या वृक्षाच्या मुळावर घाव घालून त्याचें निर्मूलन केल्याशिवाय तो वृक्ष मरणें शक्य नाहीं. मानवी समाजरचनेंत सुधारणा घडवून आणणे ह्मणजे तद्वत विषवृक्षाच्या फांद्या तोडण्याप्रमाणें आहे. तेव्हां या विषमवृक्षाचें मूळ जी उत्पादन साधनावरील पुंजीवाल्यांची सत्ता ती खणून काढून दलित वर्गाच्या हातीं दिल्याशिवाय जगांत आर्थिक समता प्रस्थापित व्हावयाची नाहीं व अशी शुद्ध समता प्रस्थापित झाल्याशिवाय खऱ्याखुऱ्या संस्कृतीचा उदय होणार नाहीं, अशी क्रांतिवादी विचारसरणी मानवी समाजांत प्रसृत करण्याचें कार्य मार्क्सनें केलें. यापुढें जाऊन उत्पादनसाधनांवर सामाजिक सत्ता प्रस्थापित होऊन तिचा उपयोग दलित वर्गाच्या हितार्थ व्हावयाचा असल्यास, दलित वर्गानें राजकीय सत्ता काबीज करून श्रमजीवि वर्गाचें अधिराज्य Dictatorship of the Proletariat निर्माण करणें अवश्य आहे असें मार्क्स ह्मणतो. अशा प्रकारच्या मार्क्सच्या क्रांतिकारक विचारसरणीचा प्रसार आपल्या देशांत जोरानें होत असून

[library stamp: ता. ७-४१ ११३८०]

भारतवर्षातील राजकीय, सामाजिक, आर्थिक इ. सर्व तऱ्हेच्या विषमतेचें मूळ जी साम्राज्यशाही तिच्या विरुद्ध एकजूट करून सत्ता हातीं घेतल्याशिवाय हिंदुस्थानचे कोणतेच प्रश्न सुटणार नाहींत असें उघड प्रतिपादन करणारा साम्राज्यविरोधी गट कॉंग्रेसमध्यें निर्माण होत असलेला स्पष्टपणें दिसून येत आहे. लखनौ कॉंग्रेसमध्यें पं. नेहरूंनीं सुद्धां विषयनियामक कमिटींतील वादविवादाच्या भरांत सुधारणावादी व क्रांतिवादी अशा द्विविध विचारांचे प्रवाह कॉंग्रेसमध्ये वाहत असल्याचें स्पष्टीकरण ( Clarification ) केले. यापुढें क्रांतिवादाचा आद्यजनक जो मार्क्स त्याचें ओजस्वी चरित्र व क्रांतिमय कार्य याकडे वळूं.

## मार्क्सचें बालपण व विद्याभ्यास

या क्रांतिकारक महापुरुषाचें चरित्र अत्यंत प्रभावी व परिणामकारक असें आहे. जर्मनींत याचा जन्म एका ज्यू घराण्यांत ट्रेव्हेस येथें इ. स. १८१८ मध्यें ५ मे रोजीं झाला. हा सहा वर्षांचा असतांना याच्या कुटुंबानें ख्रिश्चन धर्माचा अंगिकार केला. याचे आईबाप अत्यंत प्रेमळ व सच्छील असेच होते. या प्रेमी जोडप्याला पुष्कळ मुलें झाली. परंतु कार्ल मार्क्सवर त्यांचें सर्वांत जास्त प्रेम होते. हा मुलगा तडफदार बुद्धीचा असल्यामुळें आपल्या घराण्याचें नांव काढील अशी त्यांची खात्री होती. ही त्यांची अपेक्षा अस्थानी नव्हती याला इतिहासच साक्ष आहे. परंतु मार्क्सनें खूप पैसा मिळवावा अशी त्याच्या आईबापाची इच्छा मात्र त्याला परिपूर्ण करतां आली नाहीं. 'मार्क्सनें भांडवल हा बडा ग्रंथ लिहिण्याऐवजीं भरपूर भांडवल जमविले असते तर बहार झाली असती!' असें त्याची आई उद्गारीत असे असें ह्मणतात! मार्क्सनें आपल्या बुद्धिचापल्यानें आजूबाजूच्या लोकांचीं मनें आकर्षून घेतलीं होतीं. ट्रेव्हेसमध्यें असतां त्याला एका पाठशाळेंत पाठविण्यांत आलें. शाळेंत अत्यंत हुशार विद्यार्थी ह्मणून त्याची ख्याति होती. शाळेच्या क्रीडांगणावरहि तो विद्यार्थ्यांचा आवडता होता. काव्यनाटकादि अनेक विषयांत त्याचा व्यासंग विस्तृत होता. इतके

असूनही आपल्या अभ्यासात तो प्रवीण होता. शेजारी राहणारे प्रीव्ही कौन्सीलचे व्हॉन वेस्ट फॉलन नांवाचे एक सभासद यांचा व मार्क्सचा दाट परिचय झाला. यांच्याशीं विविध विषयावर चर्चा करण्यांत मार्क्सचा बराच वेळ जात असल्यामुळें मार्क्सच्या ज्ञानांत पुष्कळ भर पडली. प्राथमिक शिक्षणानंतर १७ व्या वर्षीं मार्क्स मॅट्रिक उत्तीर्ण झाला व आपल्या पित्याच्या इच्छेनुसार कायद्याचा अभ्यास करावा या हेतूनें त्यानें बॉन येथील विद्यापीठांत ( University ) प्रवेश केला. पुढें एकाच वर्षांत ह्मणजे १८३६ सालीं तो बर्लिनच्या विद्यापीठांत आला, व तेथें शिरल्यावर कायदा, तत्वज्ञान, इतिहास, वाङ्मय, कला इत्यादि विविध विषयांचा त्यानें जोरानें अभ्यास केला. ब्रिअर ह्मणतो, मार्क्सनें जनसंपर्क अजिबात सोडून देऊन रात्रंदिवस अध्ययन चालू ठेवलें. त्यांची अध्ययनाची पद्धत अशी असे कीं, तो जें कांहीं वाचत असे त्याचा सारांश लिहून काढी, ग्रीक व लॅटिन अवतरणाचे भाषांतर करी, तत्वज्ञानाच्या विविध अंगावर स्वतःचे विविध गहन विचार मांडून ठेवी, कायदा व तत्वज्ञान यांचा आराखडा तयार करी, काव्याची बाडेंचीं बाडें लिहून काढी.

## कँट कडून हेगेलकडे

आरंभींच त्याला कँट व फिशे यांची ध्येयवादी विचारसरणी ( Idealism ) नापसंत पडून तो हेगेलच्या तत्वज्ञानांत समाधान शोधूं लागला. हेगेलचा तत्वज्ञानाचा सिद्धांत व आत्मवाद जरी मार्क्सच्या बुद्धीला पटला नाहीं, तरी त्याचा विरोध—विकासवाद मार्क्सच्या कल्पनांचा विकास करूं शकला. या विरोध विकासवादाच्या सहाय्यानें सामाजिक, आर्थिक व ऐतिहासिक गूढ उलगडूं असा त्याला विश्वास वाटला, व त्याचें चित्त स्थिर झालें. या दृष्टीनें हेगेल हा मार्क्सचा गुरूच ह्मटला पाहिजे. पण मार्क्सच्या शद्बांत सांगायचें ह्मणजे ‘ खालीं डोकें वर पाय ’ हें गुरूचें तत्वज्ञान त्यानें पायावर उभें केलें. मार्क्सच्या आयुष्यांतील हा काळ मानसिक दृष्ट्या अत्यंत खळबळीचा गेला. पाहिल्यापासून त्याचा व्यासंग जबर होता. गुरूचें ‘ उलटें ’

तत्त्वज्ञान सुलटें करून जगापुढें मूर्त स्वरूपांत मांडण्यापूर्वी त्याच्या डोक्यांत विचारांचें काहूर माजलें होतें; अंत:करणांत तळमळ चालली होती, त्याची मन:स्थिती अस्वस्थ झाली होती. अध्यात्मवादाच्या पकडींतून सुटून मार्क्स जडवादाच्या प्रांतांत प्रवेश करूं लागला होता. आत्मवादास अनुसरून पूर्वी त्यानें केलेल्या काव्यरचनेचा व लघुकथा लिहिण्याकरितां गोळा केलेल्या सामुग्रीचा त्यानें नाश करून टाकिला. हीं सर्व अवलोकन करून त्याच्या पित्यास अत्यंत खेद झाला; व त्यानें इतर विद्यार्थ्यांप्रमाणें कसून अभ्यास करून पुढील जीवन सुमखय व निष्कंटक करण्याच्या मार्गास लागण्याबद्दल मार्क्सची कानउघाडणी केली. परंतु, सत्याच्या शोधार्थ धडपडणाऱ्या मार्क्सला सुखलोलुप जीवन कसें रुचणार ! त्याला सरकारी बहुमानाच्या नोकरीचा मोह पडला नाहीं, इतकेंच नव्हे, तर खालीलप्रमाणें दिव्य लढाऊ संदेश त्यानें तरुणांना दिला:—

Let us not in base subjection
Brood away our fearful life,
When with deed and aspiration
We might enter in the strife.

पुढें बॉन विद्यापीठांत प्रो.ब्रुनोबोर यांच्या समवेत अध्यापकाचें काम करावें असे मार्क्सच्या मनानें घेतल्यामुळें त्यानें कायद्याचा अभ्यास सोडून देऊन तत्वज्ञानाच्या अभ्यासाला स्वत:ला वाहून घेतलें. व 'Natural Philosophies of Democritus & Epicurus' या विषयावर एक निबंध लिहून इ. स. १८४१ मध्यें 'डॉक्टर ऑफ फिलॉसफी' ही पदवी जेनाच्या विश्वविद्यापीठाकडून त्यानें संपादन केली. परंतु स्वतंत्र बुद्धीच्या तडफदार मार्क्सला प्रुशियांतील विश्वविद्यापीठांत नोकरी मिळणें शक्य नव्हते. ह्मणून स्वतंत्र लढाऊ वृत्तीला पोषक असा वर्तमानपत्राचा धंदा पत्करल्याशिवाय त्याला गत्यंतर नव्हते. सुदैवाने मार्क्सला तशी संधी लौकरच प्राप्त झाली.

## संपादक मार्क्स

'र्‍हाइनिश झिटुंग' नांवाचे यावेळीं (१८४२) र्‍हाईन प्रांतातील 'उदार मतवादी संघा' ने एक वृत्तपत्र सुरूं केलें होतें. त्यांत लिहिण्याचें व लगेच त्याचा प्रमुख संपादक होण्याचें कार्य कार्ल मार्क्सवर पडलें. जर्मनीला राजकीय, धार्मिक स्वातंत्र्य संपादन करून देण्याच्या इराद्यानें व जुन्या मतांचा धुव्वा उडविण्यासाठीं हेगेलच्या खंडणात्मक टीकास्त्राचा मार्क्सनें अवलंब केला. हें वर्तमानपत्र चालवीत असतां मार्क्सला अर्थशास्त्राचा अभ्यास करणें भाग पडलें. जमिनींची विभागणी, लाकूडतोडीचा बंदोबस्त, मोसेल जिल्ह्यातील शेतकर्‍याविरूद्ध सरकारनें उपसलेलें हत्यार, खुला व्यापार कां संरक्षण, इत्यादि प्रश्नासंबंधानें र्‍हाइनच्या पार्लमेंटमध्यें चाललेलें वादळ, तसेंच फ्रेंच सोशालिझम् व कम्युनिझम् यांतील वादाचा र्‍हाइनिश झिटुंग या वृत्तपत्रांत उमटत असलेला प्रतिध्वनी हीं सर्व मार्क्सनें आर्थिक प्रश्नाचें अध्ययन करण्यास कारणीभूत झालीं; व तदर्थ अवसर मिळावा ह्मणून मार्क्सनें वृत्तपत्रव्यवसायांतून आपलें अंग काढून घेतलें.

## मार्क्सचें वैवाहिक जीवन

याच वेळीं जेनी वेस्टफेलन या मनोरम व सुसंस्कृत कन्येबरोबर मार्क्सचा विवाह करण्याचा विचार घाटत होता. मार्क्सच्या प्रणयाचा पाया बौद्धिक स्वरूपाचा असून त्याची रचना काव्यप्रीतींतून झाली होती. उभयतांच्या प्रेमाचा अंकूर शुद्ध स्वरूपाचा असून त्याचा उद्भव एकमेकाच्या हृदयोद्यानांत लहान वयातच झाला होता. लहानपणीं वेस्ट फेलनच्या घरीं मार्क्स विविध विषयांवर चर्चा करीत असे ह्मणून वर सांगितलेंच आहे. वेस्ट फेलन व मार्क्स यांच्यांत कविता, गायन, नाट्य इत्यादि विषयांवर चर्चा सुरूं झाली ह्मणजे वेस्ट फेलनची मुलगी जेनी साहजिकच त्या ठिकाणीं येऊन बसत असे व तीहि त्यांत हौसेनें भाग घेत असे. कार्ल मार्क्स हा काव्यगायनाचा चांगला भोक्ता आहे, तो स्वतंत्रपणें अनेक विषयांवर कविता रचतो, हें

पाहून जेनीच्या अंतःकरणांत मार्क्सबद्दल आदरसंमिश्र प्रेमभावना उत्पन्न झाली. हें प्रेम प्रतिपदेच्या चंद्राप्रमाणें हळूहळू वर्धमान पावत चाललें; व अखेर गुप्त रीतीनें झालेलें प्रेममीलन उभयतांना त्यांच्या सर्व आयुष्यभर पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणें अत्यंत सुखावह व आनंदमय झालें. सौंदर्य, सुसंस्कृत मन व शुद्ध चारित्र्य या गुणांनी अलंकृत असलेल्या जेनीवर मार्क्सचें प्रेम अखंड राहिलें. जेनीनेंहि मार्क्सला अनेक आपत्तीमध्यें एकनिष्ठ मनानें सहाय्य करून आपलें सहचारिणीपद सार्थ केलें.

## साम्यवादाचा पुरस्कार.

असो, मार्क्सनें अर्थशास्त्र व साम्यवादी वाङ्मय यांचा अभ्यास हेगेलच्या लिखाणाइतकाच कसोशीनें चालू ठेविला. त्याच्या इ. स. १८४३ व १८४४ या दोन सालच्या अध्ययनाचें दृश्य फळ ह्मणजे मार्क्स हा पक्का साम्यवादी बनला. फोरियर, प्रौढन, कॅबेट इत्यादिकांच्या ग्रंथाचें त्यानें मनःपूर्वक परिशीलन केलें व आपल्या मनाशीं असा ठाम सिद्धांत बांधून ठेविला कीं, सत्ययुग-प्रस्थापनेच्या खटाटोपांत आपल्या स्वतःच्या कार्यशक्तीचा अपव्यय न करितां तिचा उपयोग तात्कालिन राजकीय व सामाजिक परिस्थितीवर टीकेची झोड उडवून देण्यांत व तत्कालीन सामाजिक आकांक्षा व कलह यांचा कार्यकारण संगतिपर अर्थ लावून देण्यांत केला पाहिजे. इ. स. १८४३ च्या अखेर त्याचें असें पक्कें मत बनलें कीं, तत्कालीन औद्योगिक परिस्थितींत क्रांतिकारक बदल घडवून आणावयाचा असल्यास तें कार्य उत्पादनसाधनाच्या मालकांच्या हातून होणें शक्य नसून तदर्थ कामकऱ्यांनींच पुढें सरसावलें पाहिजे.

## मार्क्स व एंजलस-ऐतिहासिक जोडी.

हीं मतें त्यानें स्वतः आपण आपल्या तरुण पत्नीसहवर्तमान पॅरीस मध्यें राहून 'फ्रँको जर्मन इयर बुक्स' या नियतकालिकाचें संपादकीय काम पाहत असतां प्रतिपादिलीं होतीं. इ. स. १८४४ च्या वसंत ऋतूमध्यें या नियतकालिकांत फ्रेडरिक एंजलस यानें ओवेनादिकरून कल्पना-

वाद्यांचा ( Utopian ) आदर्श समाज रचनेचा इनकार करून न्यायाच्या नांवाखालीं धिंगाणा घालणाऱ्या प्रचलित भांडवलशाही समाजपद्धतीवर टीकेची झोड उडवून देणारा एक निबंध प्रसिद्ध केला होता. हा निबंध ह्मणजेच मार्क्स व एंजल्स या दोघांमधील शाश्वत व ऐतिहासिक स्नेह-मंदिराचा पाया होय ! या स्नेहाचा मार्क्सला पुष्कळ फायदा झाला; नाहीं-तर त्याच्या हातून इतकें प्रचंड कार्य झाले नसतें. कारण मार्क्स हा प्रचंड अलौकिक बुद्धिमत्तेचा व तात्त्विक सिद्धांताची प्रस्थापना करण्यांत पटाईत असला, तरी तो हट्टी असून त्याचें व्यवहाराकडे व द्रव्यसंपादनाकडे लक्ष नसल्याकारणानें नेहमीं द्रव्याच्या अडचणींत काल कंठणें त्याला भाग पडे. बौद्धिक दृष्टयाहि एंजल्स कांहीं कमी योग्यतेचा नव्हता; एंजल्सकडून मार्क्सला बौद्धिक व आर्थिक सहाय्य बरेंच झाल्यामुळें आपल्या आयुष्यांतील कार्यें त्याला सहजगत्या पार पाडतां आली. नाहींतर एंजल्सच्या मदतीच्या अभावी त्याजवर वनवासांत अगर अज्ञातवासांत आपल्या आयुष्यांतील काल कंठीत विनाकार्य नाश पावण्याचा प्रसंग येऊन ठेपला असता.

## ऐतिहासिक जडवाद.

' इयर बुक ' हे नियतकालिक बंद पडल्यानंतर समाजवाद, इतिहास व अर्थशास्त्र या संबंधीच्या ब्रिटिश, फ्रेंच आदिकरून विचारसरणींचा मार्क्सनें जारीनें अभ्यास चालू ठेविला. इ.स.१८४४ च्या शरद ऋतूंत त्यानें ' पवित्र कुटुंब ' नांवाचें एक पुस्तक लिहून त्यांत ' इतिहासाची आधि-भौतिक मीमांसा ' व ' वर्ग विग्रह ' या प्रमुख सिद्धांतांचें बीजारोपण केलें. याचवेळीं त्याचा हेनि, प्रौढन वगैरे फ्रेंच सुधारणावाद्यांशीं परिचय होऊन ' पॅरिस व्हार्वर्ट ' मध्यें त्याचे अनेक निबंध प्रसिद्ध होण्याचा योगही जमून आला होता. परंतु लगेच प्रुशियन सरकारच्या चिथावणीमुळें त्याला फ्रान्स सोडणें भाग पडून ब्रुसेल्सचा रस्ता धरावा लागला. यूरोपची १८४८ सालची क्रांति उद्भवेपर्यंत तो तेथेंच राहिला. तेथेंही तो स्वस्थ न बसतां एंजल्सनें त्याला प्राप्त करून दिलेल्या अर्थशास्त्रावरील समग्र ग्रंथांचे अव-

लोकन करण्यांत त्यानें कालक्रमणा केली, व ग्रंथावलोकन करून केलेले संशोधन त्यानें प्रौढन याच्या ' दारिद्याचें तत्वज्ञान ' या पुस्तकाला उत्तर ह्मणून लिहिलेल्या ' तत्वज्ञानाचें दारिद्य ' या स्वतःच्या पुस्तकांत प्रथम ग्रथित केलें. हें पुस्तक त्यानें इ. स. १८४७ त लिहिलें. यांत प्रौढनच्या भावनावादाचें त्यानें पुरें खंडन केलें. त्यानंतर लगेच १८४८ च्या जानेवारींत मार्क्स व एंजल्स यांचा कम्युनिस्ट जाहीरनामा बाहेर पडला. हा जाहीरनामा ह्मणजे पूर्वोक्त ' तत्वज्ञानाचें दारिद्य ' या पुस्तकांचें विकसित स्वरूप होय. हा अत्यंत महत्वाचा व क्रांतिकारक स्वरूपाचा असल्यामुळें याचे साद्यंत विवेचन केल्याशिवाय मार्क्सच्या चरित्रकार्याचें व्याख्यान संपूर्ण होणार नाहीं.

दलित वर्गाला गाढ निद्रेंतून जागें करून त्यांना संघटनेचें महत्व पटवून देणारें विवेचन पहिल्या प्रथम केलेलें असें सुप्रसिद्ध ' कम्युनिस्ट जाहीरनाम्यांतच ' आढळून येतें. म्हणून या जाहीरनाम्याचें महत्व अद्वितीय असें आहे.

इ. स. १८३६ मध्यें जर्मनीच्या बाहेर ठिकठिकाणीं राहणाऱ्या जर्मन कामगारांनीं ' न्यायी संघ ' म्हणून एक संस्था स्थापन केली होती. या संस्थेची विविध राष्ट्रांत विविध केंद्रे असून तिची प्रमुख कचेरी फिरतां फिरतां अखेर १८४० त लंडन येथील स्वतंत्र वातावरणांत ठाणें देऊन बसली होती. या संघानें मार्क्सची प्रसिद्धी व कामगाराबद्दल कळकळ ऐकून मार्क्सविषयीं अधिक माहिती काढण्याबद्दल १८४७ च्या जानेवारींत आपला एक सभासद ब्रुसेल्स येथें पाठविला. या संघाचें पुढें साम्यवादी संघांत रूपांतर होऊन तिची पहिली बैठक १८४७ च्या उन्हाळयांत भरली; तींत एंजल्स हजर होता. लगेच तिची दुसरी बैठक १८४७ च्या डिसेंबर महिन्यांत बसली. तींत मार्क्सहि सामील झाला. यावेळीं नवा कार्यक्रम आंखण्याचें कार्य मार्क्स व एंजल्स या उभयताकडे आलें. हा नवीन कार्यक्रम ह्मणजेच कम्युनिस्ट जाहीरनामा होय.

## ३. कम्युनिस्ट जाहीरनामा.

I consider myself bound to state that the fundamental proposition, which forms the nucleus, belongs to Marx. That proposition is: that in every historical epoch the prevailing mode of economic production and exchange, and social organization necessarily following from it, from the basis upon which is built up, and from which alone can be explained the political and intellectual history of that epoch, that consequently the whole history of mankind ( since the dissolution of primitive tribal society, holding land in common ownership ) has been a history of class-struggles, contests between exploiting and exploited, ruling and oppressed classes, that the history of these class-struggles forms a series of evolution in which now-a-days a stage has been reached where the exploited & oppressed classes ( the proletariat ) cannot attain its emancipation and from the sway of the exploiting and ruling class ( the bourgeoisie ) without at the same time and once for all, emancipating society at large from all exploitation, oppression, class distinction and class struggles. —*Frederic Engels.*

' कोणत्याही युगांतील राजकीय व बौद्धिक इतिहास हा तत्कालीन आर्थिक उत्पादन व विनिमय पद्धति व तदुद्भूत सामाजिक घटना या पायावर उभारलेला असून या आर्थिक पायाशिवाय त्या इतिहासाची उपपत्तीच लागत नाहीं. तेव्हां अर्थात्, जमीनीवर सामाजिक मालकी अस-

लेला आद्य सांघिक समाज लय पावल्यापासूनचा मानव जातीचा इतिहास हा वर्ग कलहांचा इतिहास आहे; म्हणजे पिळणारा-पिळला जाणारा, सत्ताधीश-सत्ताहीन असा परस्परहितविरोधी द्विविध वर्गांतील द्वंद्वयुद्धाचा इतिहास आहे. या दोन्ही वर्गांच्या लढ्यांतूनच सामाजिक विकास होतां-होतां समाज आज या स्थितीप्रत येऊन पोंचला आहे कीं, यापुढें पिळणूक, गांजणूक, वर्गभेद, वर्गविग्रह या सर्वांतून अखिल मानवी समाजाची एकसमयावच्छेदेंकरून कायमची मुक्तता झाल्याशिवाय भांडवलदार व सत्ताधीश वर्गाच्या गुलामगिरींतून श्रमजिवी वर्गाची सुटका होणें शक्य नाहीं.'

—फ्रेडरिक एंजल्स.

या जाहीरनाम्याचे चार विभाग केलेले असून पहिल्या विभागांत सुखवस्तू वर्गाचा म्हणजे अर्वाचीन भांडवलशाहीचा उगम आणि उत्कर्ष कसा झाला याचें विवेचन केलेलें आहे.

## औद्योगिक क्रांति

समाजाचा ज्ञात इतिहास हा वर्गकलहाचा इतिहास असून गुलामगिरी युग व सरंजामी युग या युगद्वयांत हे लढे कधीं कधीं गुप्तपणें तर केव्हां केव्हां उघडपणें चाललेले असून त्यांचें पर्यवसान कधीं क्रांतिमूलक समाजरचनेंत तर कधीं उभय वर्गांच्या विनाशांत झालेलें आहे. अमेरिकेचा शोध लागून आशिया खंडांतील राष्ट्रांचीं द्वारें खुलीं झाल्यामुळें जगांतील बाजारपेठा सर्वांना मोकळ्या झाल्याबरोबर भांडवलशाहीच्या उदयास प्रारंभ झाला. सरंजामी पद्धत प्रचलित असतां औद्योगिक उत्पादन हें लहान लहान कारखान्यांतून होत असे. या कारखान्यांतून होणारा माल मर्यादित स्वरूपाच्या बाजारपेठांची मागणी भागवीत असे. परंतु जगांतील नवीन जगड्व्याळ बाजारपेठांची गरज पुरविणें या लहान सहान कारखान्यांना अशक्य होऊन बसलें. यामुळें लहान लहान कारखाने मोडले जाऊन त्यांची जागा मोठ्या कारखान्यांनी घेतली. आरंभीं आरंभीं या मोठ्या कारखान्यांतील कामें हस्तशक्तीच्या ( Hand power )

सहाय्यानेंच उरकलीं जात असत. पुढें पुढें हस्तशक्तीची जागा बाष्प-शक्तीनें काबीज केली; अर्थातच, लहान सहान हस्तयंत्रांच्या स्थानीं बड्या बाष्प–यंत्रांची प्रतिष्ठापना झाली. उत्पादन झपाट्यानें वाढलें. सर्व जगांतील बाजारपेठांची गरज भागाविणें सुलभ झालें. या योगें नाविक व खुष्कीच्या दळणवळणास प्रचंड चालना मिळाली.

## भांडवलशाहीचें क्रांतिकारक स्वरूप.

जेथें जेथें भांडवलशाही प्रस्थापित झाली तेथें सरंजामी पद्धतींतील पूर्वापार चालत आलेले सर्व परस्पर संबंध अगर नातीं तिनें तडातड तोडून टाकिलीं आहेत; नागवा स्वार्थ अगर रोकड द्रव्याची देवाण–घेवाण याशिवाय मानवामानवांमध्यें कोणत्याहि संबंधाचें किंवा नात्यागोत्याचे धागेदोरे तिनें शिल्लक ठेविलेलें नाहींत. उत्कट धर्मप्रेम व उदात्त भावना यांवर तिनें विरजण घातलेलें स्पष्ट दिसून येते. मानवांची वैयक्तिक योग्यता द्रव्यानें मोजण्यांत येऊं लागली. मानवांचे प्रस्थापित झालेले असंख्य स्वातंत्र्याचें हक्क नष्ट होऊन खुल्या व्यापाराचे तत्व प्रस्थापित झालें.एका वाक्यांत सांगावयाचें ह्मणजे धर्म व राजकारण यांच्या मायावी स्वरूपाखालीं चालत असलेल्या पिळणुकीला भांडवलशाही युगांत नागवें, निलाजरें प्रत्यक्ष डोळ्याला ढळढळीत दिसणारें असें पाशवी स्वरूप प्राप्त झालें. आजपर्यंत जे उद्योगधंदे सन्माननीय व आदरणीय मानले जात असत त्यांतील तेज भांडवलशाहीने नष्ट केले आहे. डॉक्टर, वकील, पुरोहित, कवी, विज्ञानशास्त्रज्ञ या सर्वांना तिनें रोजंदारीनें आपले मजूर बनविले आहे.

इजिप्तचे पिरॅमिड, रोमन कालवे व गॉथिक भव्य मंदिरें यांना लाजविणाऱ्या आश्चर्यकारक गोष्टी भांडवलशाहीनें करून दाखविल्या आहेत. प्राचीनकाळची युद्धें व धर्मयुद्धें यांना मान खालीं घालायला लावणारीं प्रचंड युद्धें व अखिल भूमंडळाला व्यापणाऱ्या स्वाऱ्या तिनें चालविल्या आहेत. उत्पादनांत क्रांति, सामाजिक वस्तुस्थितींत सतत घडामोड, चिरकालीन अस्थिरता ही भांडवलशाहीची विशिष्ट प्रतीकें होत.

भांडवलशाहीनें मनुष्य प्राण्याला मानवी जीवनाच्या खऱ्या वस्तुस्थितीची व मानवांतील परस्पर–संबंधाची यथास्थित जाणीव प्राप्त करून दिली. भांडवलशाहीची बाजारपेठाबाबतची हांव सारखी बळावत चालल्यामुळें तिला सर्व भूमंडळ व्यापून टाकणें क्रमप्राप्तच झालें. मालाच्या उत्पादनाला व खपाला सर्वराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झालें. यामुळें सर्व राष्ट्रें परस्परावलंबी बनलीं. बौद्धिक उत्पादनही आंतरराष्ट्रीय होऊन जागतिक वाङ्मय निर्माण झालें व रानटी राष्ट्रेंहि सुधारणाचक्रांत ओढलीं गेलीं. उत्पादित मालाच्या स्वस्त किंमती हाच भांडवलशाहीचा दारूगोळा! याच दारूगोळयाच्या मदतीनें राष्ट्राराष्ट्रांमध्यें असणारी चायना–वॉलसारखीं भिताडें तिनें जमीनदोस्त केलीं आहेत. सर्व राष्ट्रांनीं नष्ट तरी व्हावें एक, नाहींतर भांडवलशाही उत्पादनपद्धती तरी स्वीकारावी हें दुसरें, याशिवाय गत्यंतर नाहीं. अशी परिस्थिती भांडवलशाहीनें निर्माण केली आहे!

## भांडवलाचे केंद्रीकरण

भांडवलशाहीनें आखिल जनता सूत्रबद्ध केली असून उत्पादन–साधनांचें व परिणामतः भांडवलाचें मूठभर लोकांच्या हातांत केंद्रीकरण केलें आहे. याबरोबरच राजकीय सत्तेचेंहि केंद्रीकरण होण्यास बरीच मदत झाली आहे. अवघ्या शंभर वर्षांच्या कारकीर्दीत तिनें अपूर्व अशा प्रचंड उत्पादनशक्ती निर्माण केल्या आहेत. निसर्गशक्ती माणसांच्या कह्यांत आणून सोडणें, यंत्रसामुग्री, उद्योगधंदे व शेतकी यांच्या बाबतींत रसायनशास्त्रांची तत्त्वें लागू करणें, आगबोटी, आगगाड्या, तारायंत्रें, भूतलावरील बहुतेक सर्व प्रदेशाची लागवड करणें, नद्यांतून प्रचंड कालवे काढणें इत्यादि प्रचंड उत्पादनशक्ती सामाजिक श्रमशक्तींच्या गर्भांत वास करीत आहेत यांची अंधुक कल्पना तरी पूर्वकालीन समाजाला होती काय? हल्लींच्या भांडवलशाही संस्कृतीचा उदय, सरंजामी समाजपद्धतीच्या रक्षेतून झाला असून तिनें वर्गकलहाचें निर्मूलन न करितां जनतेच्या नजरेंत स्पष्टपणें भरणारे असे नवीन वर्ग निर्माण केले आहेत.

इतकेंच नव्हे, तर एकंदर समाजाचें दिवसेंदिवस विग्रहात्मक–एकमेका-समोर उभे असे परस्परविरोधी तट पडत चालले आहेत! भांडवलदार आणि श्रमजीवी! भांडवलाच्या जोरावर सुखवस्तुवर्ग राजकीय सत्ता सहज लीलेनें काबीज करूं शकतात, व आजच्या कोणत्याहि राष्ट्राचें प्रमुख मंत्रिमंडळ हें भांडवलदारांच्या सामान्य हिताचें कामकाज पाहणारी अशी एक समीति बनली आहे.

## भांडवलशाहीच्या विनाशाचीं बीजें

सरंजामी समाजपद्धतीनें ज्या शक्ति निर्माण केल्या त्या तिला आवरतां येईनाशा झाल्या; त्याचप्रमाणें परिस्थिती भांडवली युगांत निर्माण झाली आहे. ज्या समाजानें इतकीं अवाढव्य अशी उत्पादन–विनिमयाचीं राक्षसी साधनें आस्तित्वांत आणिलीं त्याची, एकाद्या जादुगारानें आपल्या सामर्थ्यानें पाताळांतून विविध शक्ति भूलोकावर आणून सोडाव्या व आणून सोडल्यावर त्या त्याला अनावर व्हाव्या, अशी केविलवाणी स्थिति झाली आहे. अर्वाचीन उत्पादनाच्या वस्तुस्थितीविरुद्ध अर्वाचीन उत्पादन-शक्तींच्या बंडाचा इतिहास म्हणजेच उद्योगधंद्याचा गेल्या अनेक दशकांतील इतिहास होय. सांप्रतच्या व्यापारी जगतांत एकापेक्षां दुसरा बलवत्तर असे आणीबाणीचे प्रसंग थोड्या वर्षांच्या अवधीनें पुन्हां पुन्हां उद्भवलेले आढळून येतात; व हे प्रसंग भांडवलशाहीला मुळासकट खणून काढतात कीं काय अशी साधार भीति वाटूं लागते. यांतूनच अत्युत्पादनाची सांथ निर्माण होते. व्यापार उद्योगधंदा सपशेल बुडून जातो कीं काय असें भासूं लागतें. कारण, आधुनिक संस्कृतीचा, जीवनसाधनांचा, उद्योगधंद्याचा व व्यापाराचा अति-रेक सर्वत्र होत असलेला आढळून येतो. याप्रमाणें एकंदर परिस्थिती सुख-वस्तुवर्गाच्या अवाक्याबाहेर निघून गेलेली आढळून येते. उत्पादन साध-नांचा मोठ्या प्रमाणांत विध्वंस करून, नवीन नवीन बाजारपेठा काबीज करून, जुन्या बाजारपेठा पिळून काढून तो या भयंकर परिस्थितींतून आपली मुक्तता करून घेण्याची खटपट करतो. याचा परिणाम मात्र उलटा

होतो. अधिक मोठ्या प्रमाणावर व अधिक बलवत्तर अशी संकटें तो आपल्यावर ओढून घेतो, व त्यांचा प्रतिबंध होईल अशा उपायांचा तो नाश करतो. एकंदरींत ज्या शास्त्रास्त्रांच्या सहाय्यानें भांडवलशाहीनें सरंजामी पद्धतीला जमीनदोस्त केलेलें असतें, तींच शस्त्रास्त्रें आतां तिच्याच विरुद्ध उलटलेली अशीं आढळून येतात.

## श्रमजीवी वर्गाची वाढ.

सुखवस्तुवर्गानें केवळ आपल्या नाशाची शस्त्रेंच तेवढी उत्पन्न केली आहेत असें नव्हे तर त्याबरोबर ती धारण करून त्यांचा उपसर्ग करणाऱ्या कामकऱ्यांचा दलितवर्गहि त्यानें निर्माण केला आहे. यंत्राचा उपयोग मोठ्या प्रमाणांत होऊं लागल्यामुळें व श्रमविभागाचें प्रमाण व्यापक झाल्यामुळें कामकऱ्यांच्या कामांतील व्यक्तिमहात्म्य व आल्हाद यांचा लोप झाला आहे. कामकरी हा यंत्राचा नुसता मदतनीस बनला आहे. त्याचें काम अगदीं साध्या स्वरूपाचें पण कंटाळवाणें बनलें आहे. त्याच्या उत्पादनाचें मोल त्याच्या वंशसातत्यार्थ–उदरनिर्वाहार्थ लागणाऱ्या सामुग्रीच्या किंमतीचें झालें आहे. जसजसें यंत्राच्या उपयोगाचें व श्रमविभागणीचें प्रमाण वाढत जातें तसतसें कामकऱ्याच्या कामाचाहि बोजा वाढत जातो. मग तो दिवशीं तासाचें प्रमाण वाढविल्यामुळें ह्मणा अगर ठराविक वेळांत अधिक काम चोपून घेतल्यामुळें ह्मणा, अगर यंत्राच्या गतीचा वेग वाढविल्यामुळें ह्मणा! अर्वाचीन औद्योगिक क्रांतीनें लहान सहान कारखान्याचें मोठमोठ्या गिरण्यांत रूपांतर घडवून आणलें आहे. सर्व कामकऱ्यांचे थवेच्या थवे यंत्राच्या वेसणींत गोवून त्यांना गुलाम बनविण्याचें कार्य भांडवलशाहीनें केलें आहे. यंत्राच्या वाढीमुळें वैयक्तिक हस्तकौशल्य व श्रमशक्ति याचें महत्व जसजसें कमी होत चाललें तसतसें पुरुषांची कामें करण्यास बायकाही पुढें येऊं लागल्या आहेत. भांडवलदारानें दिलेली मोलमजुरी तरी त्याला संपूर्ण रीत्या उपभोगायला मिळतें असें ह्मणावें तर ती लुबाडून घ्यायला सुखवस्तु वर्गाचे जमीनदार, सावकार, दुकानदार इ. इतर भाऊबंद टपून बसलेले आहेतच.

क्रमाक्रमानें मध्यमवर्गाचा खालचा थर ( ह्मणजे लहान सहान व्यापारी, दुकानदार, कारागिर, शेतकरी इत्यादींचा बनलेला असा ) श्रमजीवी वर्गात लय पावतो. कारण तुटपुंज्या भांडवलाच्या बळावर बड्या भांडवलदाराशीं टक्कर देणें त्यांना अशक्य होऊन जातें, व उत्पादनाच्या नवीन साधनामुळें त्यांचे विशिष्ट कारागीर–कौशल्य निरर्थक बनून जातें. याप्रमाणें श्रमजीवी वर्गात हळुहळू सर्व वर्ग सामील होऊं लागल्यावर त्यांची संघटना होऊ लागते.

## मजूर वर्गाच्या चळवळीची दिशा.

मजूर वर्गाची प्रगति निरनिराळ्या स्थित्यंतरांतून होत जाते. हा वर्ग जन्माला आल्यापासूनच त्याचा भांडवलदारवर्गाशीं कलह सुरू असतो. प्रारंभी हा कलह वैयक्तिक स्वरूपाचा असतो. नंतर कारखान्यांतील कामकऱ्यांचा समूह हा लढा चालवीत असतो, आणि पुढें एका विशिष्ट क्षेत्रांतील कारखान्यांचे कामकरी एकत्र संघटित होऊन या लढ्याला उग्र स्वरूप प्राप्त करून देतात. या कामकऱ्यांच्या लढ्याची टोळधाड पहिल्या प्रथम यंत्रसामुग्रीवर येऊन पडते व ते यंत्रसामुग्रीचा नाश करूं लागतात. आरंभीं अनियंत्रित राजसत्ता उलथून पाडण्याच्या कामीं कामकऱ्यांच्या शक्तीचा उपयोग सुखवस्तु वर्गाकडून केला जातो. त्यानंतर कामकरीवर्ग व भांडवलदारवर्ग यांमधील कलहाला सुरवात होऊन तो कलह दिवसेंदिवस उग्र स्वरुप धारण करूं लागतो. लगेच कामकरी वर्ग हा ट्रेड युनियनसारखे भांडवलदाराविरुद्ध लढणारे संघ निर्माण करूं लागतो. आपल्या मजुरीचे दर स्थिर ठेवण्याकरतां अगर वाढविण्याकरितां तो वर्ग सारखी चळवळ करतो व संपासारख्या चळवळीच्यावेळीं भांडवलदाराशीं यशस्वी टक्कर देतां यावी ह्मणून चिरकालीन संस्था स्थापन करण्याच्या मार्गास तो लागतो. कधीं कधीं या कलहाला दंग्याधोप्याचें स्वरूप प्राप्त होतें. प्रसंगोपात्त कामकऱ्यांना विजयहि मिळूं लागतो. त्यांचे संघ अधिकाधिक विस्तृत व व्यापक होऊ लागतात. दळणवळणाच्या वाढत्या साधनामुळें

त्यांच्या संघाच्या वाढीला पुष्कळच मदत होते. पुढें हा कलह राष्ट्रीय बनून त्यांचें राजकीय स्वरूपांत स्थित्यंतर होतें.

यानंतर त्यांचा राजकीय पक्ष निर्माण होतो. हा पक्ष दिवसेंदिवस अधिकाधिक प्रबळ होत जातो. सुखवस्तू वर्गांतील दुफळीचा फायदा घेऊन तो कामकऱ्यांचे विशिष्ट हक्क प्रस्थापित करून घेतो. यामुळें साहजिकच राजकीय व सामान्य शिक्षण मिळण्याची संधि त्यांना प्राप्त होते. याप्रमाणें सुखवस्तू वर्गांशीं लढण्याची शस्त्रें आपोआप या वर्गाच्या हातीं येतात.

शिवाय सत्ताधीश वर्गांतील पुष्कळ लोकांना श्रमजीवी वर्गांत सामील होणें भाग पडते. या लोकांच्या संगतीनें या वर्गांत नवीन विचारांचा प्रकाश पडून तो कार्यक्षम व प्रगतिपर बनत जातो. अखेर वर्गकलहाला ज्या वेळीं निर्णायक स्वरूप प्राप्त होते, त्यावेळीं सत्ताधीश वर्गांतहि खळबळ उडण्यास प्रारंभ होऊन ती खळबळहि प्रचंड उग्र स्वरूप धारण करते. याचा परिणाम असा होतो कीं, सत्ताधीश वर्गांतील एक छोटेखानी विभाग आपल्या वर्गांतून बाहेर पडून भावी राजसत्ता काबीज करूं पाहणाऱ्या क्रांतिकारी वर्गांत सामील होतो.

## श्रमजीवी वर्गच क्रांति करणार !

भांडवलदारांशीं झुंज देणाऱ्या अनेक वर्गांत कामकरी वर्ग तेवढाच क्रांतिकारक असतो. अन्य वर्ग ह्मणजे छोटे कारखानदार, शेतकरी इत्यादि वर्ग हे आत्मसंरक्षणार्थ सुखवस्तू वर्गांशीं लढतां लढतां अंतर्धान पावतात. हे वर्ग जातिवंत क्रांतिकारी नसून आपले भावी हितसंबंध मजूर वर्गांशीं संबद्ध असणार हें जाणून ते क्रांतियुद्धाला सज्ज होतात.

श्रमजीवी वर्ग हा मालमत्ता विरहित असतो. राष्ट्रीय वैशिष्ठ्य व संस्कृति यांची व त्यांची ताटातूट भांडवलदारी समाज पद्धतीनें केलेली असते. कायदा, नीति, धर्म ह्मणजे सुखवस्तु वर्गाच्या नानाविध हितसंबंधावर दिलेला मुलामा होय अशी त्याची समजूत असते. इतर वर्ग जेव्हां विजय संपादन करतात तेव्हां ते सर्व समाजाला आपल्या कह्यांत ओढून घेत

असतात. कामकरी वर्गाला मात्र प्रचलित समाजपद्धती जमीनदोस्त केल्याशिवाय समाजांतील उत्पादन शक्तीवर स्वामित्त्व मिळवितां येत नाहीं. त्यांना स्वतःचे असें कांहींच मिळवावयाचें अगर जतन करावयाचें नसतें.

आतांपर्यंतच्या सर्व ऐतिहासिक चळवळी ह्या अल्पसंख्याकांनीं अगर अल्पसंख्यांकांच्या हितसंरक्षणार्थ चालविलेल्या अशा होत्या. परंतु दलित वर्गाची ही चळवळ ह्मणजे आत्मजागृतीनें व स्वयंस्फूर्तीनें चालविलेली चळवळ होय. समाजाच्या वरच्या थरावर असणारा सत्ताधीश वर्ग हवेंत पार उडवून दिल्याशिवाय समाजाचा सर्वांत खालचा जो दलित वर्ग त्याला चलनवलन करतां अगर आपलें डोकें वर काढतां येणें शक्य नाहीं. दलित वर्गाचा हा लढा आरंभीं राष्ट्रीय स्वरूपाचा असतो व नंतर त्याला आन्तरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त होते. अखेर या युद्धाला दारुण स्वरूप प्राप्त होऊन भांडवलशाही कोलमडून पडते व श्रमजीवी वर्गाच्या सत्तेचा पाया घातला जातो.

गुलाम हा गुलामगिरीयुगांत संघाच्या सभासदत्वाचा मान मिळवूं शकला; सरंजामी युगांत छोटा भांडवलदार हा बड्या भांडवलदाराच्या रूपांत विकास पावूं शकला. परंतु भांडवलशाहीयुगांत मजुरांची स्थिती मात्र अत्यंत केविलवाणी होत चालली आहे ! औद्योगिक प्रगतीबरोबर त्याची प्रगति होण्याऐवजीं त्याचें जीवित अधिकाधिक निकृष्ट होत चालले आहे. तो कंगाल तर बनत चाललाच आहे; पण लोकसंख्येची वाढ व अर्थोत्पादन यांच्या मानानें त्याचें दारिद्र्य प्रचंड प्रमाणांत वाढत असलेलें दिसून येत आहे. यावरून असें सिद्ध होत आहे कीं, याउपर भांडवलशाही ही सत्ता चालविण्याच्या कामीं नालायक झाली आहे. कारण या कालांत मालक मजुरांचें पोषण करीत नाहींत तर मजूर हाच मालकाचें पोषण करीत आहे, मालकाची संपत्ति वाढवीत आहे. ही कृत्रिम स्थिति फार दिवस टिकणें शक्य नाहीं. भांडवलशाहीच्या अस्तित्वास भांडवलाची निर्मिती व अभिवृद्धि हीं मुख्यत्वेंकरून कारणीभूत होत असतात; व भांडवलाच्या निर्मितीस श्रमजीवी

वर्गाचें श्रम हेच कारणीभूत होतात. भांडवलशाहीच्या प्रगतीबरोबरच मजुरांच्या संघटनेला प्रारंभ होतो. ही संघटनाच अखेर भांडवलशाहीच्या नरडीचा घोट घेते! याप्रमाणें भांडवलशाहीनें निर्माण केलेला आपला पाया जो मजूरवर्ग तोच आपल्यावरची भांडवलशाहीची टोलेजंग इमारत ढासळून पाडतो. तात्पर्य, भांडवलशाहीनेंच निर्मिलेला मजूरवर्ग भांडवलशाहीच्या दफनाचा खड्डा खणूं लागतो. अखेर तिचा ऱ्हास व दलित वर्गाचा विजय ही एकसमयावच्छेदेंकरून घडून येतात.

## कम्युनिस्ट आणि कामकरी

याप्रमाणें पहिल्या विभागांत भांडवलशाहीच्या ऱ्हासाचें व उत्पादक वर्गाच्या यशाचें विवेचन केल्यानंतर मार्क्स व एंजल्स हे दुसऱ्या विभागाकडे वळतात. यांत कम्युनिस्ट व कामकरीवर्ग यांचा परस्परसंबंध दिग्दर्शित केला आहे. त्यांचें ह्मणणें असें आहे कीं, समाजसत्तावादी हे कामगार वर्गापासून अलिप्त नसून त्या वर्गाचेच अंशरूप होत. कामकऱ्यांतील कोणत्याहि पक्षांशीं समाजसत्तावादी पक्षाचा विरोध नसून सर्व दलित वर्गाच्या हितसंबंधाखेरीज त्याचे स्वतःचे स्वतंत्र असे कोणतेच हितसंबंध नाहींत. श्रमजीवी वर्गाच्या [ Proletariat ] चळवळींना विशिष्ट वळण देण्याकरतां त्यांनीं स्वतःची अशीं कोणतींच सांप्रदायिक तत्वें पुढें मांडलेलीं नाहींत. कम्युनिस्ट व इतर मजूरपक्ष यांच्यांत पुढीलप्रमाणें फरक आढळून येतो.

१ निरनिराळया राष्ट्रांच्या दलित वर्गाच्या चळवळीच्या वेळीं कम्युनिस्ट हे राष्ट्रीयत्वाची भावना बाजूस सारून जगांतल्या सर्वसामान्य दलितांच्या हितसंबंधास प्राधान्य देऊन त्यांचे महत्व सर्वांस पटवून देतात.

२ मजूरवर्ग सुखवस्तुवर्गाच्या विरुद्ध जो लढा चालवितो त्याच्या विविध विकासावस्थांच्या प्रत्येक वेळीं आणि प्रत्येक ठिकाणीं ते मजूर वर्गाच्या चळवळीचा पुरस्कार करतात. कामकरी वर्गांतल्या पुढारलेल्या विभागांत ते मोडत असून दलितांच्या चळवळी ते सर्वांत धडाडीनें पुढें रेटतात. इतकेंच नव्हे तर दलितांची चळवळ कोणत्या धोरणानें आंखावी,

तिची वस्तुस्थिती कशी आहे, तिचें अंतिम पर्यवसान कशांत होणार आहे, इत्यादि सर्व गोष्टींचें आकलन त्यांना चांगलें करतां येतें. मजूरवर्गाच्या इतर पक्षाप्रमाणें या कम्युनिस्ट पक्षाचेंहि, मजुरांची संघटना करणें, भांडवलशाही उलथून पाडणें, मजूर वर्गाच्या हातांत सर्व सत्ता केंद्रित करणें हे तिरंगी ध्येय आहे.

## कम्युनिस्टांवरील आक्षेपांचें खंडण.

कम्युनिस्ट हे समाजानें उत्पन्न केलेल्या वस्तू माणसांना उपभोगावयास अधिकार देत नाहींत असा त्यांच्यावर एक आक्षेप घेण्यांत येतो. पण हा आक्षेप खरा नसून, श्रम करावे एकानें, पण त्या श्रमशक्तीवर स्वतःच्या नफेबाजीसाठीं सत्ता गाजवावी दुसऱ्यानें, ही वस्तुस्थिती त्यांना मान्य नाहीं. कम्युनिस्ट हे कौटुंबिक साम्यवादाचा [ Community of women ] पुरस्कार करतात असाहि त्यांच्यावर आणखी एक आक्षेप घेतला जातो. पण त्यांचा सारा कटाक्ष केवळ उत्पादनाची हत्यारें म्हणून स्त्रियांना हीन दर्जा प्राप्त करून देणाऱ्या सांप्रतच्या समाज पद्धतीवर आहे. प्रचलित उत्पादन पद्धतीचा नाश झाला म्हणजे त्या पद्धतीपासून उद्भूत झालेल्या कौटुंबिक साम्यावस्थेचा आपोआपच नाश होईल. ही कौटुंबिक साम्यावस्था म्हणजेच खाजगी अगर सार्वजनिक वेश्याव्यवसाय होय !

देशभेद व राष्ट्रीय भावना याचें निर्मूलन करण्याकडे कम्युनिस्टांचा रोख आहे असा त्यांना दोष दिला जातो. पण कामकऱ्यांना देशच नाहीं; त्यांच्याकडे जें नाहींच तें त्यांच्याकडून आम्ही कसें काढून घेणार? राजकीय सत्ता काबीज करणें दलितांना प्रथम प्राप्त आहे; व यानंतर त्यांना राष्ट्राचें नेतृत्व पत्करावयाचें असतें. या दृष्टीनें त्यांच्यांत राष्ट्रीय भावना आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. राष्ट्रभेद व राष्ट्रविरोध हे दिवसेंदिवस कमी होत चालले आहेत. याला कारणें—भांडवलशाहीचा उत्कर्ष, खुला व्यापार, जगड्व्याळ बाजारपेठ, उत्पादन पद्धतींतील व तदनुरुप प्राप्त झालेल्या जीवनस्थितींतील एकरूपता हीं होत. कामकऱ्यांचे अधिराज्य झाल्यानंतर

तर या भेदांचें समूळ उच्चाटन होणारें आहे. जसजशी व्यक्तीची करावयाची पिळणूक बंद होत जाणार, तसतशी राष्ट्रानें राष्ट्राची करावयाची पिळणूक आपोआपच थांबत जाणार! या प्रमाणांत वैयक्तिक राष्ट्रांतील वर्गद्वेष लोप पावत जाणार, त्याच प्रमाणांत राष्ट्राराष्ट्रांतील वैराचाहि निरास होत जाणार!

## कम्युनिस्टांचा कार्यक्रम

कामगार क्रांतीचें पहिलें पाऊल दलित वर्गाला सत्ताधीश बनविणें, व लोकशाही लढ्यांत विजय संपादन करून देणें हें होय. मग या राजसत्तेच्या बळावर दलितवर्ग भांडवलदारांच्या हातचें भांडवल हिसकावून घेईल व उत्पादनाचीं सर्व साधनें श्रमसत्ताक राष्ट्राच्या हातांत केंद्रीभूत करून शक्य तितक्या लवकर समाजाच्या एकंदर उत्पादनशक्ती संवर्धित करील. दलित वर्गाच्या तात्कालिक योजना या कीं:—

( १ ) जमीनीवरील मालकी हक्क नष्ट करून जमीनीवरील खंडाचा उपयोग सार्वजनिक उपयोगाकडे करणें, ( २ ) खाजगी उत्पन्नावर जबरदस्त व वाढत्या प्रमाणांत कर लादणें, ( ३ ) वारसाहक्कांचे उच्चाटन, (४) देशत्यागी व बंडखोर यांची सर्व मालमत्ता जप्त करणें, ( ५ ) राष्ट्रीय बँकेच्या सहाय्यानें राष्ट्राची सर्व पत सरकारच्या हातीं केंद्रीभूत करणें; बँकेतील सर्व भांडवल सरकारी असून सरकारी बँकाशिवाय इतर बँका असतां कामा नये, ( ६ ) सरकारच्या हातांत दळणवळणाची व वहातुकीची साधनें केंद्रीभूत करणें, ( ७ ) सरकारच्या मालकीचे कारखाने व सत्तेचीं उत्पादन साधनें यांची वाढ करणें, ( ८ ) पड जमीन लागवडीस आणणें, सर्व सामान्य योजनेनुसार जमीन सुधारणा अमलांत आणणे, ( ९ ) सर्वांना सारखेच श्रम करण्यास जुंपणें, औद्योगिक सेना उभारणें—विशेषतः कृषिकार्यार्थ, ( १० ) शेती व औद्योगिक कारखाने यांचे संबंध जोडणें, ( ११ ) शहर व ग्राम यांमधील लोकसंख्येच्या प्रमाणांत असलेली भिन्नता आस्तेकदम नाहींशी करणें. ( १२ ) सर्व मुलांस सार्वजनिक मोफत शिक्षणाची सोय करणें, कारखान्यांत मुलांकडून ज्या प्रकारचें काम आज चोपून

घेण्यांत येते त्याचें प्रचलित स्वरूप नष्ट करणें.( १२ ) शिक्षण व औद्योगिक उत्पादन यांचा परस्परसंबंध जोडणें.

## राज्ययंत्राचा स्वाभाविक लोप

यांप्रमाणें वर्गविग्रह अंतर्धान पावल्यानंतर व अखिल राष्ट्राच्या सर्वव्यापी संस्थेच्या हातांत राष्ट्रीय उत्पादन केन्द्रीभूत झाल्यावर शासन संस्थेचें राजकीय स्वरूपच लुप्त होईल. राजकीय सत्ता ह्मणजेच आधीं एका वर्गानें दुसऱ्या वर्गाला पिळून काढण्याकरितां निर्मिलेली संघटित सत्ता! ज्याअर्थी दलित वर्गाला भांडवलशाहीबरोबर चालू ठेविलेल्या लढ्यांत वर्ग-संघटना करणें जरूर पडते, व क्रांतीच्या द्वारें सर्व सत्ता काबीज करून उत्पादनाची पुरातन परिस्थिती नष्ट करावी लागते, त्याअर्थी अर्थातच उत्पादनाच्या जीर्ण परिस्थितीबरोबर जीर्ण झालेले समाजांतील वर्गविरोधहि नामशेष करणें त्या वर्गाला भाग पडून स्वतःचेंहि वर्ग दृष्ट्या अस्तित्व व वर्चस्व नष्ट करावें लागतें. याप्रमाणें वर्गात्मक व वर्गविग्रहात्मक भांडवलशाही समाजपद्धती विनाश पावल्यावर तिच्या जागीं अशी एक सामाजिक संस्था निर्माण होईल कीं, जिच्यांत प्रत्येक व्यक्तींचा स्वतंत्र विकास ह्मणजे समाजांतील सर्व व्यक्तींचा अप्रतिबंध विकास होत जाईल.

येथें जाहीरनाम्याचा दुसरा विभाग समाप्त होतो. पुढें तिसऱ्या विभागांत कल्पनावादाचें खंडन आलेलें आहे. या खंडनानंतर शेवटच्या चौथ्या विभागाला आरंभ झाला असून त्यांत समाजसत्तावाद्यांची कार्यपद्धति कशी असते यांचें विवेचन केलें आहे.

## कम्युनिस्ट व इतर पक्ष.

कम्युनिस्टांचा लढा हा कामगार वर्गाचीं तात्कालिक उद्दिष्टें व क्षणिक हितसंबंध साध्य करून घेण्याकरतां चालू केलेला असतो. परंतु वर्तमानकाळची चळवळ ते चालवीत असतां तिला भविष्यकाळीं प्राप्त होणाऱ्या स्वरूपाकडे ते कधींहि दुर्लक्ष करीत नाहींत. थोडक्यांत सांगा-

वयाचें ह्मणजे ज्या ज्या ठिकाणीं प्रचलित सामाजिक व राजकीय रचनापद्धतीविरुद्ध क्रांतिकारक चळवळ चालू असते, त्या त्या ठिकाणीं कम्युनिस्ट हे मदतीकरितां धाव घेत असतात. शेवटी सर्व देशाच्या लोकशाही पक्षाशीं सहकार करण्यासाठीं ते सर्वत्र धडपडत असतात.

आपली मतें व उद्दिष्टें छपवून ठेवण्याच्या गोष्टींचा कम्युनिस्टांना मनापासून कंटाळा आहे. प्रचलित समाजपद्धती जबरदस्तीनें उलथून पाडल्याशिवाय आपलीं ध्येयें गांठणें शक्य नाहीं असें ते उघडपणें प्रतिपादन करतात. समाजवाद्यांच्या क्रांतीकडे पाहून सत्ताधीश वर्गाच्या अंगांत कापरें भरतें. यांत दलित वर्गाचें कांहींच नुकसान नसून आपल्या भोंवतालच्या श्रृंखला त्याला तडातड तोडावयाच्या आहेत. अखिल विश्व त्याला जिंकावयाचें आहे. ह्मणून

अखिल जगांतील कामकऱ्यानों, एक व्हा.

याप्रमाणें आशापूर्ण दिव्य संदेश कामकऱ्यांना देऊन मार्क्स व एंजल्स यांनीं आपला जाहीरनामा पुरा केला आहे.

## ४. पहिली कामगार क्रांती.

गेल्या विभागांत विस्तृतपणें दिग्दर्शित केलेल्या साम्यवादी जाहीरनाम्यांतील खरा अर्थ व मर्म स्पष्टपणें ध्यानांत भरून येण्यास तत्कालीन युरोपच्या परिस्थितीचा विचार करणें अवश्य आहे. उदित भांडवलदाराकडून पुरुष, स्त्रिया व मुलें यांची होत असलेली नागवी पिळणूक—पूर्वापार चालत आलेल्या संबंधामध्यें यांत्रिक उत्पादनामुळें घडून आलेली जबरदस्त क्रांती, वाढत्या प्रमाणावर प्रादुर्भूत होत जाणारी आर्थिक हलाखी, कामगारांमध्यें स्पष्ट दिसून येणारा संघशक्तीचा अभाव, युरोपच्या बहुतेक राष्ट्रांत कामकरी वर्गाकडून हिसकावून घेतलेले मतदानाचे हक्क, सर्वत्र उघड उघड दिसून येणारी बंडाची, अत्याचाराचीं अनेक चिन्हें, इत्यादि प्रकारांनीं अनुषंगिक अशी भयदायक परिस्थिति युरोप खंडभर थैमान घालीत होती. यावर जाहीरनाम्याची ठिणगी पडल्याबरोबर १८४८ च्या फेब्रुवारी २४ तारखेस क्रांतीच्या आगीनें फ्रान्समध्यें प्रथम पेट घेतला. जगांतील ही पहिली कामगार क्रांती होय. यावेळीं गिझॉट हा फ्रान्सचा मुख्य प्रधान होता. तेथील राज्ययंत्र लांचलुचपतीच्या प्रकारानें अत्यंत अधःपतन पावलें होतें. सत्ता मूठभर लोकांच्या हातांत केंद्रित झाली होती. मताधिकार फारच थोड्यांना होता. अखेर लोकांत असंतोष इतका माजला कीं, गिझॉटला राजीनामा देणें भाग पडलें. पॅरिसमधील परराष्ट्र कचेरीपुढें २३ फेब्रुवारी रोजीं रात्रीं जंगी मिरवणूक थडकली. तीवर

गोळीबारही झाला,त्यांत पुष्कळ लोक ठार झाले. २४ तारखेला सकाळीं पहावें तों शहराच्या पूर्वभागांत सैन्याच्या हालचालीस पायबंद घातला गेला असून शहरांत सर्वत्र बंडाचा वणवा पेटूं लागला होता. लुई फिलीप हा आपल्या नातवाला राज्यपद अर्पण करून मोकळा झाला. यानंतर दुपारी लोकशाही [ Republic ] जाहीर केली गेली. नॅशनल असेंब्लीची मंजुरी तेवढी मिळवावयाची राहिली. पुष्कळ कामकऱ्यांनीं या क्रांतीचा प्रेमानें सत्कार केला. त्यांना असें वाटूं लागलें कीं, पुढें होऊं घातलेल्या कामगार क्रांतीची ही पूर्वचिन्हें होत.

कांहीं दिवसांनीं या क्रांतीची झळ ऑस्ट्रियाला लागली व तेथेंहि १३ मार्चला व्हिएन्नाचा विद्यार्थीवृंद ' मेटरनीझ्चा ( ऑस्ट्रियन मुत्सद्दी ) धिक्कार असो ' या आरोळ्यांनीं आकाश पाताळ एक करीत लोकसभेच्या दिवाणखान्यावर चाल करून गेला. ऑस्ट्रियांतील दंडुकेशाहीखालीं लोकांच्या हालअपेष्टा चालल्या होत्या. लोकमताशिवाय कर वसुलीचा सपाटा तेथें चालू होताच. शेतकऱ्यांनासुद्धां एका खेड्यांतून दुसऱ्या खेड्यास जावयाचें असल्यास परवानगी लागत असे. पुस्तकें व वृत्तपत्रें यांवर पोलिसांची करडी नजर असे. या क्रांतीमुळें मेटरनिझ्ला राजीनामा देणें भाग पडलें. या क्रांतीचा परिणाम इटलीवर होऊन इटलीनें ऑस्ट्रियाच्या जुलुमाविरुद्ध बंड पुकारलें व लॉबार्डीतून ऑस्ट्रियन सेना हांकून देऊन विविध नागर-लोकशाही ( Republics ) स्थापित केल्या. यावेळीं जर्मनीनेंहि उचल खाल्ली. रशियानेंही झारजवळ लोकशाही घटनेची मागणी केली. याचवेळीं मताधिकार विस्तृत करण्याबद्दल इंग्लंड व स्वित्सरलंडमध्यें चळवळी चालू होत्या. क्रांतीची सरशी इतकी होत चालली कीं, पुष्कळांना ती केवळ विस्तृत मतदानहक्क संपादून स्वस्थ न बसतां आर्थिक स्वातंत्र्यहि मिळवूं शकेल असें वाटूं लागलें.

पॅरीसमध्यें या फेब्रुवारीच्या क्रांतीनंतर हंगामी सरकार प्रस्थापित झालें व त्या सरकारनें असें फर्माविलें कीं, सर्वत्र राष्ट्रीय कारखाने उभारावे,

सर्वांना रोजगार मिळण्याची सोय व्हावी व कामकरी वर्गाच्या हितसंबंधाकडे लक्ष देण्याकरितां एक कमिटी बसवावी. या कमिटीचे मुख्य ब्लँक व आल्बर्ट यांना सरकारच्या या उदार कृतींत कामकऱ्यांच्या नव्या युगाची छटा दिसूं लागली. त्यांनीं सर्व व्यापार व उद्योगधंद्यांतून मागविलेल्या प्रतिनिधींचें एक मजूर पार्लमेंट बोलाविलें. परंतु मे महिन्यांत सार्वत्रिक मताधिकाराच्या तत्वावर राष्ट्रीय परिषद ( National Assembly ) निवडली गेली. यांत वरील साम्यवादी कायदेकानू मान्य नसणाऱ्या नेमस्त लोकशाही लोकांचाच भरणा पुष्कळ होता. या असेंब्लीच्या पहिल्या बैठकींतच तिनें राष्ट्रीय कारखाने बंद करून रिक्त झालेल्या मजुरांना सैन्यांत सामील होण्यास अगर शहर सोडण्यास हुकूम दिला. यामुळें त्यांनीं नवीन सरकारशीं २३ जून पासून पुढें चार दिवस पॅरिसच्या भर रस्त्यांत निकराचा लढा चालविला. पण सरकारच्या शिस्तीच्या फौजेपुढें अर्धपोटीं, साधनसामुग्रीविरहित दीनहीन कामकऱ्यांचा टिकाव कसा लागणार? याप्रमाणें त्यांचा पराभव झाल्यानंतर त्यांना कडक शासन करण्यांत आलें. लुई बोनापार्टची अध्यक्षाच्या जागेवर निवडणूक झाली व पुढें चार वर्षांतच त्यानें बादशाहीपदही काबीज केलें. याच प्रकारें आस्ट्रिया, हंगेरी, इटली, बर्लीन वगैरे ठिकाणींहि बंडखोरांचा पुरा मोड झाला. कम्युनिस्ट लीगच्या मध्यवर्ती मंडळाच्या सभासदांना प्रशियन सरकारनें तीनपासून सहा वर्षांपर्यंत शिक्षा दिल्या. यामुळें लीग पार वितळून गेली. लीग लयास गेली तरी तिचें तेजस्वी अर्भक जें कम्युनिस्ट मॅनिफेस्टो त्यानें या भूतलावर कामगार चळवळीच्या कामीं कमालीचा प्रभाव गाजविला आहे हें निराळें सांगण्याची गरज नाहीं.

## पहिली क्रांति व मार्क्स.

फेब्रुवारी—क्रांतीचा मार्क्सच्या परिस्थितीवर मुख्य परिणाम असा झाला कीं, त्याला बेल्जममधून हद्दपार करण्यांत आलें. फ्रान्समधील हंगामी सरकारनें मात्र या समयीं मार्क्सला फ्रान्समध्यें येऊन राहण्यास अगत्याचें

आमंत्रण दिलें होतें. यापुढें कांहीं काळ मार्क्स पॅरिसमध्यें होता. फ्रान्समध्यें मार्क्सनें कम्युनिस्ट लीगचे कांहीं लोक गोळा केलें व जर्मनींत जाऊन क्रांती यशस्वी करण्याबद्दल त्यांना प्रोत्साहन दिलें,व एंजल्ससहवर्तमान स्वतः ऱ्हाईन प्रांतांत प्रवेश केला. जून महिन्यांत ' न्यू ऱ्हायनिश झिटूंग ' पत्राचे संपादकीय काम त्यानें पत्करलें व पुढील एका वर्षाच्या कठीण काळांत तें पत्र त्यानें जोमानें चालविलें. थोड्याच दिवसांत तें पत्र लोकप्रिय झालें. फ्रान्समधील दोन तीन राज्यक्रांत्या जनतेच्या मदतीनें घडून आल्या तरी क्रांत्युत्तरकालीं जनहितसंबंधाचें संरक्षण अगर संवर्धन करण्याचा कांहींच प्रयत्न करण्यांत आला नाहीं. उलट त्यांच्या आकांक्षा दडपण्यांत आल्या; इतकेंच नव्हें तर पोटभर अन्न मिळणें सुलभ व्हावें ह्मणून क्रांतींत सामील होणाऱ्या कामकरी व शेतकरी यांच्या जमावावर गोळीबार करण्यांत आला. या गोष्टी मार्क्सनें आपल्या पत्रांतून उघडकीस आणिल्या व क्रांतीच्या पुढाऱ्यांना असा सल्ला दिला कीं, क्रांती ही यशस्वी व्हावयाची असल्यास मध्यमवर्ग व ऐतखाऊ सुखवस्तूवर्ग यांच्या हातांत राज्यसूत्रें जाऊं न देतां श्रमजीवी वर्गाच्या पुढाऱ्यांनीं सत्ता काबीज करणें अवश्य आहे. परंतु या सल्ल्याचा फायदा फ्रेंच पुढाऱ्यांनीं यावेळीं करून घेतला नाहीं. पुढें रशियन क्रांतीच्या वेळीं लेनिन व ट्रॉस्की यांना या सल्ल्यापासून स्फूर्ति मिळाली. या वेळीं हा सल्ला अंमलांत आणिल्याचें सुंदर फळ म्हणजे कामकरी व शेतकरी यांच्याच पुढाऱ्यांच्या हातांत राजसत्ता कायम राखण्यासाठीं नेटाचा प्रयत्न करण्यांत आला व क्रांती यशस्वी झाली.

याप्रमाणें क्रांतीकारकांचा चहूंकडून पुरा मोड झाला; तरी १८४९ मेच्या शेवटच्या अंकांत क्रांतिकारक सेना युरोपखंडभर निर्माण होत असून लागोपाठ क्रांति घडून येणार अशी भविष्यवाणी मार्क्स व एंजल्स यानी जाहीर केली होती. परंतु याप्रकारें क्रांती होण्याबद्दल चुकीचें भाकीत केल्याबद्दलची कबुली आपल्या मरणापूर्वी सहा महिने एंजल्सनें खालील-प्रमाणें दिली:—

" History has made it clear that the status of economic development on the Continent was then, by no means, ripe for the abolition of capitalist production. It has proved this by the economic revolution, which since 1848, has affected the entire Continent, and has introduced large industry in France, Austria, Hungary, Poland and more recently in Prussia and has made of Germany an industrial nation of first rank. "

१८४८ च्या वेळीं भांडवलशाही उलथून पाडण्यास जरूर असणारी औद्योगिक क्रांती परिपक्व दशेला आली नव्हती. ही दशा प्राप्त होऊन युरोपखंडभर आर्थिक क्रांतीचा प्रसार होण्यास १८४८ नंतर जवळ जवळ पन्नास वर्षें लागलीं. एंजल्स पुढें असें ह्मणतो कीं, मताधिकाराचा उपयोग स्वातंत्र्य संपादनार्थ कसा करावा हें आतां [ १८९५ ] मजुरांना कळूं लागलें. मताधिकारामुळें आपलें शत्रुबलही कितपत आहे हें अजमावून पाहण्यास कामकऱ्यांना सुलभ झालें व यशाबद्दल त्यांच्यांत आत्मविश्वास उत्पन्न झाला. तसेंच सामान्य जनसमूहांशीं यामुळें त्यांचा निकट संबंध येऊं लागला. पार्लमेंटमध्यें आपल्या विरोधकांशीं त्यांना योग्य रीतीनें तोंड देतां येऊं लागलें व सामान्यजनांना स्वातंत्र्याचें धडे आपोआप मिळूं लागले. याचा सरकार व भांडवलशाहीवर एकंदरींत असा परिणाम झाला कीं, बंडापेक्षां कामगारांच्या निवडणूकींतील विजयामुळें त्यांच्या उरांत धडकी भरूं लागली. एंजल्सनें केलेलीं हीं विधानें ' न्हायनिश झिटूंग ' मध्यें आतां लगेच क्रांति होणार ह्मणून काढलेल्या उद्गारानंतर ४५ वर्षांनीं केलेलीं विधानें होत ! लगेच वर्षांतच झिटूंग बंद पडलें. यावेळीं सर्व मालमत्ता विकून मार्क्सला दहा हजार रुपये भरावे लागले. नंतर लाल क्रांती होईल या आशेनें त्यानें पॅरिसचा रस्ता धरला. परंतु तेथें पहावें तों प्रतिक्रांती घडून येत असलेली त्याच्या नजरेस पडली. तेथून १८४९ तच त्याला हद्दपार व्हावें लागून लंडनची कांस धरणें भाग पडलें लंडन येथेंच त्याला आयुष्यांतील उरलेलीं वर्षें कंठावीं लागलीं.

लंडनमध्यें राहून आरंभीं त्यानें ' न्यूयॉर्क ट्रिब्यून ' मधून युरोप-खंडातील ' क्रांति व प्रतिक्रांति ' या विषयावर लेख लिहिण्यास सुरवात केली. त्याच्या मतें फेब्रुवारी व मार्चमध्यें झालेल्या बंडाचें कारण आर्थिक मंदी ही असून प्रतिक्रांतीचें कारण १८५० च्या उन्हाळ्यापासून प्रारंभ पावलेला व कळसास पोंचलेला औद्योगिक उत्कर्ष होय. जर्मनींत तर बहुसंख्य कामकरी हे लहान सहान व्यापाऱ्यांनी गुंतवलेले असे होते. बहुतेक सर्व कारखानदारी पद्धती मध्ययुगांतील एक अवशेष होता. या क्रांतीच्या वेळीं गिरणी कामगारांची संख्या अत्यल्प होती. क्रांतिकारकांत बहुतेक भरणा शेतकरी ह्मणजे लहान सहान स्वतंत्र जमीनदार, जमीन करणारे, कृषिजीवि कामकरी यांचाच होता. याप्रकारें परस्पर विरोधी असे विविध हितसंबंध एकत्र एकमेकाविरूद्ध जोरानें आदळूं लागल्यामुळें या हितसंबंधाच्या झगड्यांत कांहींच निष्पन्न न होणें साहजिक आहे. तेव्हां क्रांतीचा पायाच इतक्या ठिसूळ स्वरूपाचा असल्यामुळें ती यशस्वी झाली नाहीं यांत आश्चर्य कसचें ? असें क्रांतीच्या अपयशाबद्दलचें मार्क्सचें निदान आहे. हेंच मार्क्सच्या अधिकारयुक्त वाणींत सांगायचें ह्मणजेः–

" The mass of workers were employed by small tradesmen, whose entire manufacturing system was a mere relic of middle age. Industrial workers were in a minority. There were a large number of peasantry, small free holders, feudal peasants and agricultural labourers. There was then an unsubstantial foundation for a successful revolution. When the interest so varied, so conflicting, so strongly crossing each other, are brought into violent collision, when these contending interests in every district, every province are mixed in different proportions, when above all, there is no great centre in the country, no London, no Paris, the decision of which, by their weight, may supersede the necessity of fighting out the same quarrel over and over again, in every single locality; where else is to be expected but that the

contest will dissolve itself into a mass of unconnected struggles, in which an enormous quantity of blood, energy and capital is spent, but which for all that, remain without any decisive results.

मार्क्सनें अखेर लंडन हेंच आपलें निवासस्थान केल्याचें मागील प्रकरणीं आलेंच आहे. तेथें असतां बरींच वर्षें मार्क्स बहुतेक रोजच्या रोज ब्रिटिश म्युझियमला भेट देत असे. सकाळपासून म्युझियमचे दरवाजे बंद होईपावेतों अर्थशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र इत्यादि विषयावरील ग्रंथांचें अवलोकन करीत ' कॅपिटल् ' या ग्रंथाकरतां सामुग्री गोळा करीत तेथें तो कालक्रमणा करीत असलेला दृष्टोत्पत्तीस येत असे. लंडनसारख्या बड्या शहरांत मार्क्स सहकुटुंब राहिला होता. हे दिवस त्याला अत्यंत हलाखींत कंठावे लागले. लंडन येथील डीन स्ट्रीटमधील दोन खोल्यांच्या अत्यंत संकुचित जागेंत त्याला आपला संसार थाटणें भाग पडलें. १८५२ ' मध्यें कलोन कम्युनिस्ट ' ट्रायल संबंधी एक हस्तपत्रक प्रसिद्ध करण्याकरता लागणारा कागद विकत घेण्याकरिता त्याला त्याचेजवळ असलेला अंगचा एकच एक कोट विकावा लागला ! औषध देण्यास पैका नसल्यामुळें त्याचें एक मूल याचवेळीं मृत्युमुखीं पडलें ! १८५१ पासून १८६० पर्यंत त्याच्या उपजीविकेचें साधन म्हणजे 'न्यूयार्क ट्रिब्यून'कडून दर लेखाला एक सॉव्हरिन या दराप्रमाणें मिळत असलेला मोबदला हेंच एक होतें. १८६० नंतर त्याची स्थिती थोडीबहुत सुधारली. कारण त्याला त्याच्या वुइल्हेम वूल्फ नांवच्या मयत स्नेह्याच्या मृत्युपत्राद्वारें ८०० पौंड यावेळीं मिळाले होते. तसेंच एंजल्सनेंही त्याला दरसाल ३५० पौंड देऊ केले होते. वूल्फनें दिलेल्या द्रव्यामुळेंच त्याला ' कॅपिटल ' या ग्रंथाचा पहिला विभाग लिहणें सहज झालें. तेथें असतां मार्क्सनें १८५९ मध्यें ' अर्थशास्त्रावरील परीक्षण ' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. यांत ' इतिहासाची आधि भौतिकमीमांसा ' व ' अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत ' या मार्क्सप्रणीत सिद्धांतमणींचे प्रमुखत्वानें विवेचन आले आहे.

मार्क्सला अनेक संकटांत धीर देणारी त्याची अलौकिक पत्नी जेनी ही त्याला प्रत्येक कार्यांत सहाय्य करण्यास तत्पर असे; म्हणून त्याचें जीवन त्याला इतकें दुःसह भासलें नाहीं. जेनी गर्भश्रीमंत असूनही अत्यंत प्रेमळ स्वभावाची होती. जेनीने दरिद्री मार्क्सला वरिलें, तरी पण त्याबद्दल ती कधींही पश्चात्ताप पावली नाहीं. जेनी मार्क्सपेक्षां ४ वर्षांनीं मोठी असल्यामुळें वडीलधाऱ्या माणसाप्रमाणें ती मार्क्सशी वागत होती. मार्क्सच्या हृदयांत उचंबळून येणाऱ्या प्रचंड भावनालहरी व उद्दामवृत्ति यांना आळा घालण्याची कुशलता जेनीमध्यें होती. ती प्रसन्न मनानें व हंसतमुखानें अतिथिअभ्यागताचें स्वागत करीत असे. कामगारवर्गाशी मार्क्स हा आपुलकीच्या भावनेने एकरूप होत असे. त्यामुळें स्नेहीसोबती, अनुयायी यांचा वाढता परिवार घरीं जमलेला पाहून जेनी कृतकृत्य होत असे. जेनीनें आपल्या प्रेमळ स्वभावानें या सर्व मंडळींची हृदयें आपल्याकडे आकर्षून घेतलीं होतीं. प्रतिस्पर्धी म्हटला कीं त्याला हाणून पाडावयाचें ही मार्क्सची वृत्ती ! यामुळें त्याला पाहून प्रतिस्पर्ध्यांच्या अंगचा थरकाप होत असे.परंतु जेनीची वागण्याची धर्ती निराळी असे.प्रतिस्पर्धी अगर प्रतिपक्षीय झाला म्हणून काय झाले, त्याच्याशी खासगी व्यवहारांत प्रेमानें वागण्यानें कोणतें नुकसान आहे असें जेनी नेहमीं म्हणत असे. या तिच्या उदात्त प्रेमळ स्वभावाचे व वर्तनाचे प्रतिपक्षीयांनासुद्धा कौतुक वाटत असे. तिची बुद्धीही तीक्ष्ण व सूक्ष्म होती. तिच्या बुद्धिवैभवाबद्दल मार्क्सलाही अत्यंत धन्यता वाटत होती, इतकेंच नव्हे तर आपलीं हस्तलिखितें तो तिला तपासण्यास देत असे, व तपासून तिनें केलेल्या अनेक सूचनांना तो अत्यंत महत्व देत असे. याबद्दल मार्क्सचा जांवई पॉल लाफार्ज म्हणतो:—

"Heinrich Heine the relentless Satirist feared Marx's scorn; but he cherished the greatest admiration for the keen sensitive mind of Marx's wife. Marx's esteemed so highly the intelligence & critical sense of his wife that he told me in 1866 that he submitted all of his manuscripts to her and

that he set a high value upon her judgement." मार्क्सला एकंदर सहा मुलें होती. त्यापैकीं दोन मुलगे व एक मुलगी लहानपणीं वारलीं. उरलेल्या तिनहीं मुलींनीं कम्युनिस्टांशींच आपला विवाह करून घेतला. त्यापैकीं इलिनॉर फार हुषार असल्यामुळें ती मार्क्सला फार आवडत असे. याप्रमाणें १८६० नंतरची मार्क्सची कांहीं वर्षें कौटुंबिक सुख व मनःस्वास्थ्य या दृष्टीनें कांहींशीं सुखावह गेलीं. परंतु हा कामगार चळवळीचा ओहोटीचा काळ होता. तरीसुद्धां मार्क्स हा निराश न होतां कामगार चळवळीचा पाया दृढतर करण्याच्या मार्गास लागला.

# ५. आंतरराष्ट्रीय कामगार संघ.

१८६३ मध्यें रशियानें पोलंडवर केलेल्या स्वारीचा निषेध करण्याकरतां लंडनमध्यें एक प्रचंड सभा बोलावण्यांत आली होती. याप्रसंगीं ट्रेड युनिअन पुढारी ऑडगर यानें तर अशाप्रकारची आंतरराष्ट्रीय सभा बोलावण्याबद्दल सूचना केली होती. त्याचें फळ ह्मणजे २५ ते २८ सप्टेंबर १८६४ च्या दरम्यान लंडनमध्यें एक परिषद भरविण्यांत आली. जर्मन कामगारांचा प्रतिनिधी ह्मणून मार्क्सला या परिषदेला हजर राहाण्यास निमंत्रण गेले होते. यांतूनच 'संट मार्टिन' दिवाणखान्यांत आंतरराष्ट्रीय कामगार संघाचा उदय झाला. याचवेळीं मार्क्सनें स्वतःच प्रास्ताविक भाषण [Inaugural address] लिहून काढून संघाच्या बुडाशीं असणारीं तत्वें जाहीर केलीं. या भाषणांत १८२५ पासून १८६४ पर्यंतचा इंग्लिश कामगारांचा इतिहास दिला असून १८४८ ते १८६४ पर्यंतच्या कालावधींत व्यापार व उद्योगधंदा यांत कसकशीं कल्पनातीत वाढ होत गेली, केवळ पुंजीवाल्या वर्गापुरती सत्ता व धन हीं मर्यादित होत जाऊन १८५१ पासून १८६१ च्या कालमर्यादेंत भांडवलाचें केंद्रीकरण कसकसें वाढत गेलें, उलटपक्षीं कामगार हे दिवसेंदिवस दुःखपंकांत खोल खोल कसे रुतत चालले आहेत या सर्व वस्तुस्थितींचें शास्त्रीय दृष्ट्या मुद्देसूद असें विवेचन आले आहे. या भाषणाच्या अखेर मार्क्सचें निर्वाणीचें असें सांगणें आहे कीं राजकीय सत्ता काबीज करणें हे कामगारांचे आद्य कर्तव्य असून त्याना

केव्हांही संख्याबल अनुकूल असतें. पण त्या बळाला संघटनेची जोड व ज्ञान-संपन्न पुढारीपण लाभल्याशिवाय कार्यभाग होणार नाहीं. या भाषणानंतर संघाची नियमावलीही मार्क्सनें तयार केली. तींत संघाचे उद्देश खालील-प्रमाणें नमूद आहेत.

( अ ) कामगारांचा आर्थिक उद्धार हें चळवळीचें उद्दिष्ट असून राजकीय चळवळ हें त्याचें साधन आहे.

( ब ) समाजांतील इतर घटकाप्रमाणें कामगार वर्ग कार्यक्षम व्हावा, कामगारांना समान हक्क संपादन व्हावेत. कोणत्याही वर्गाचा कोणत्या वर्गावर जुलूम अगर अधिकार न चालतां समाजांत समता प्रस्थापित व्हावी या उदात्त हेतूनेंच कामगारांच्या आर्थिक स्वातंत्र्याची चळवळ सतत चालू ठेवावी. कामगारांचा उद्धार कामगारांनींच केला पाहिजे.

( क ) कामगार वर्गांत माजलेली दुही नाहीशी करून कामगार वर्गांत परस्पर प्रेम व सहानुभूती निर्माण करणें.

( ड ) कामगारांचा उद्धार ही मानवी समाजापुढील महत्त्वाची बाब आहे.

( ई ) विविध राष्ट्रांत चालू असलेल्या कामगार चळवळींचा अन्योन्य संबंध येत नसल्याकारणानें आंतरराष्ट्रीय संघाची जरूरी आहे ह्मणून हा संघ स्थापिला जात आहे.

या संघ स्थापनेच्या पुढील वर्षी ह्मणजे १८६५ त मार्क्सनें कामगार आंतरराष्ट्रीय संघाकडे आपल्या श्रमसिद्धांतावर 'मूल्य, किंमत व नफा' हा प्रबंध पाठविला.

## कॅपिटल.

१८६७ त मार्क्सनें आपल्या चिरस्मरणीय 'कॅपिटल' या ग्रंथाची पहिली जर्मन प्रत प्रसिद्ध केली. या ग्रंथांत नमुन्यादाखल इंग्लंडच्या औद्योगिक क्रांतीचें त्यानें उदाहरण घेतलें आहे. कारण इंग्लंडांत यांत्रिक युगाचा प्रथम उद्भव होऊन भांडवलशाहीचा उदय झाला; ह्मणून औद्योगिक

दृष्ट्या मागसलेल्या देशास आपल्या भविष्यकालीन परिस्थितीची कल्पना देण्यास इंग्लंडचेंच उदाहरण योग्यतम असें मार्क्सला वाटणें सयुक्तिक होय! या ग्रंथांत उत्पादित मालांची वस्तुस्थिती, द्रव्य, भांडवल व तदंतर्गत परस्पर संबंध यांचे विवेचन आलेले असून अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत प्रस्थापित केला गेला आहे. त्याचप्रमाणें सामान्यतः समाजावर व विशेषतः तदंगभूत कामकऱ्याच्या जीवनावर यंत्रशाहीनें केवढा क्रांतिकारक परिणाम घडवून आणिला आहे हे त्यांत दिग्दर्शित केलें असून तावत्कालपर्यंत अंमलांत आलेल्या फॅक्टरी कायद्यांचा सुपरिणाम काय झाला आहे याकडे जनतेचे लक्ष वेधलें गेलें आहे. अखेर 'भांडवलाच्या केंद्रीकरणाच्या' सिद्धांताची चर्चा आली आहे.

## भांडवलाच्या केंद्रीकरणाचा सिद्धांत.

**[ Law of Capitalist Accumulaion. ]**

जसजसे भांडवलशाहीच्या उत्पादनाचें प्रमाण वाढत जाते, तसतसें भांडवल थोड्या लोकांच्याच हातांत केंद्रीभूत होत जातें. यंत्राच्या सहाय्यानें जसजशी मजुराची उत्पादनशक्ती वाढत जाते, तसतशी मजूरांची जरूर कमी कमी भासूं लागते. याचा क्रमाक्रमानें असा परिणाम होत जातो कीं बेकारी कामकऱ्याची सेना दिवसेंदिवस एकसारखी वर्धमान पावत जाते. याप्रमाणें कामकऱ्यांची बेकारी वाढत गेल्यानंतर कारखान्यांत काम करणाऱ्या कामकऱ्याच्या दुःस्थितीचा कडेलोट होत जातो. कारण त्यांचे जीवनसर्वस्व सर्वस्वी भांडवलदाराच्या मर्जीवर अवलंबून असतें.

एकीकडे सुखसंपन्न मदोन्मत्त असा छोटासा भांडवलदार वर्ग तर दुसरीकडे दुःस्थितीच्या पंकांत रुतलेला प्रचंड कामकरी वर्ग या विरोधी परिस्थितींतच भांडवलशाहीच्या स्फोटाचीं द्रव्यें स्पष्टपणें दृगोचर होतात. मार्क्स ह्मणतो:—" Along with the constantly diminishing number of the magnates of capital, who usurp and monopolise all advantages of this process of transformation, grows the mass

of misery, oppression, slavery, degradation, exploitation; but with this too, grows the revolt of the working class, a class always increasing in numbers and discipline, united, organised by the very mechanism of the process of capitalist production itself. The monopoly of capital becomes a fetter upon the mode of production, which has sprung up and flourished along with it, and under it. Centralisation of the means of production and socialisation of labour at last reach a point where they become incompatible with their capitalist integument. This integument is burst asunder. The knell of capitalist private property sounds. The expropriators are expropriated, and the capitalist era gives birth to an industrial society, based on the possessions in common of the land and of the means of production "

" औद्योगिक क्रांतीपासून निष्पन्न झालेले सर्व फायदे केवळ स्वतः स्वाहा करू लागणाऱ्या भांडवलदाराच्या संख्येला जसजशी सतत ओहोटी लागत जाते, तसतशी कामकरी वर्गाच्या दुःखाला, जुलुमाना, गुलामगिरीला, अधःपाताला व अखेर पिळणुकीला भरती येऊं लागते. याबरोबरच संख्येनें सतत वाढणारा, भांडवलशाहीच्या यंत्रमूलक उत्पादनपद्धतीच्या वळणांत कसून संघटित व शिस्तनिष्ठ बनलेला कामगारवर्ग बंडाला प्रवृत्त होऊं लागतो. भांडवलावरील वैयक्तिक हक्कच पुढे पुढें भांडवलशाहीनिर्मित उत्पादनपद्धतीला प्रतिबंधक होऊं लागतात. अखेर उत्पादनसाधनांचें केंद्रीकरण व श्रमाचे समुदायीकरण ही वाढत जाता जाता अशी एक वेळ येऊन ठेपते कीं त्यांना भांडवलशाहीचे कवच असह्य होते. याचा परिणाम असा होतो कीं, भांडवलशाहीच्या कवचाच्या ठिकऱ्या उडून जातात व खाजगी मालमत्तेच्या मृत्यूची घंटा वाजूं लागते. भांडवलदारांचे भांडवल गळून पडतें व अखेर भांडवलशाही युग ज्या समाजांत जमीन व उत्पादनसाधनें यावर सर्वत्रांची सर्वसामान्य सत्ता असते अशा यंत्रप्रधान समाजाला प्रसवते. " असो, या भांडवलग्रंथांतील कांहीं प्रमुख

सिद्धांताचें विस्तृत विवेचन पुढें क्रमशः करण्यांत येईल. ग्रंथांच्या उल्लेखा-नुषंगानें जरूर तेवढें तदंतर्गत विषयाचें दिग्दर्शन केलें आहे. भांडवल हा ग्रंथ कामकरी वर्गाचा प्रमाणभूत ग्रंथ असून ते त्याला वेद, बायबल अगर कुराण या ग्रंथाइतका मान देतात.

## आंतरराष्ट्रीय संघांत फाटाफूट

'कॅपिटल' प्रसिद्ध केल्यानंतर आंतरराष्ट्रीय संघ वाढविण्याकडे मार्क्सनें आपलें लक्ष पुरविलें. पुढें मागें क्रांति झाल्यास या संघाचा आप-ल्याला चांगला उपयोग होईल असें मार्क्सला वाटत होते. परंतु संघाचा ताबा हस्तगत करण्याबद्दल प्रथमपासूनच संघांत भांडणतंटे उपस्थित झाले होते. १८६५ पासून १८६७ पर्यंत या संघाचा ताबा प्रौढन व त्याचे अनु-यायी यांच्याकडे होता; तो १८६८–१८७० मध्यें मार्क्सकडे गेला. पुढें १८७१ पासून त्या संघाचा शेवट होईपर्यंत ह्मणजे सुमारे एक वर्ष तो बाकुनिन व त्याचे अनुयायी यांच्याकडे राहिला. या संघांत केवळ तात्विक मतभेद होता इतकेच नव्हे तर त्यांत राष्ट्रभेद व वंशभेद यांचे प्रस्थ माजत चालले होते. मार्क्सचा कार्यक्रम राजकीय स्वरूपाचा होता; तर इतरांचे लक्ष सामाजिक संस्थेची संयुक्त आर्थिक घटना बनविण्याकडे होते. प्रौढनचा मार्क्स व त्याचा कार्यक्रम याला संपूर्ण विरोध होता. बाकुनिन शासनाभाव समाजव्यवस्थेचा ( Anarchism ) पुरस्कर्ता होता. हे वादविवाद उपस्थित झाले असता फ्रँको जर्मन युद्ध व फ्रेंच राज्यक्रांति घडून आली.

## दुसरी कामगार क्रांति

या युद्धांत २ सप्टेंबर १८७० मध्यें सेडन येथें फ्रेंचाचा पुरा मोड झाल्यानंतर ४ सप्टेंबरला फ्रान्समधील साम्राज्य नष्ट झालें असून तेथें लोक-सत्ताक राज्य प्रस्थापित झालें असे जाहीर करण्यांत आलें, आणि लोकसत्ताक हंगामी सरकार राज्यकारभार पाहूं लागले. यावेळीं मार्क्सनें संघाच्या साधा-रण सभेला पत्रद्वारें असा उपदेश केला कीं शत्रू पॅरीस दरवाजे ठोठावीत असता नूतन लोकसत्ताक सरकार उलथून पाडणें मूर्खपणाचें होईल. नागरिक

या नात्यानें फ्रेंच कामगारांनीं आपलें कर्तव्य केलें पाहिजे. कामगारांनीं संपादिलेल्या नूतन लोकसत्ताक स्वातंत्र्याचा कामगारांची संपूर्ण संघटना घडवून आणण्याच्या कामीं शक्य तेवढा उपयोग करून घ्यावा. यायोगें दलितांचा उद्धार व फ्रान्सचा पुनर्जन्म घडवून आणण्याजोगें राक्षसी सामर्थ्य कामगार वर्गांत संचरेल. परंतु मार्क्सच्या या उपदेशाकडे कामगारांनीं लक्ष दिलें नाहीं. कारण भूक व बेकार यांनीं भडकलेला फ्रेंच कामगारवर्ग नवीन हंगामी सरकारची राजसत्तेकडे असलेली मनःप्रवृत्ती पाहून खवळला. त्यानें लगेच १८ मार्च १८७१ रोजीं क्रांतीचें निशाण उभारलें व साम्यवादी प्रजासत्ताक राज्य प्रस्थापित केल्याचें जाहीर केलें. फ्रान्समधील ही कामगारक्रांतीची चळवळ ' पॅरिस कम्यून ' या नांवानें प्रसिद्ध आहे. परंतु सात आठवड्यांतच हें कामगार राज्य उडवून देण्यांत आलें. मार्क्सनें विरुद्ध उपदेश केला होता तरी कामगारांच्या क्रांतिविषयक कार्याचें त्यानें मोठ्या उत्साहानें समर्थन केलें आहे.

## पहिल्या आंतरराष्ट्रीय संघाची इतिश्री.

फ्रेंच राज्यक्रांतीचा निःपात झाल्यानंतर कांहीं काळ आंतरराष्ट्रीय संघास कोणतेही व्यावहारिक कार्य करण्यास क्षेत्र नाहींसें झालें. तदंतर्गत सांप्रदायिक आणि क्रांतिकारक कटांना मात्र भरपूर ऊत आला. संघाचा सामान्य चिटणीस मार्क्स याचा दिवसेंदिवस कामाचा व्याप वाढू लागल्या-मुळें व त्याला आपला ग्रंथराज कॅपिटल लिहून संपविण्याची अत्यंत जरूरी भासूं लागल्यामुळें संघाची कचेरी न्यूयार्क येथें नेण्याबद्दल त्यानें सूचना केली; व ती सूचना १८७२ सालीं हेग येथें भरलेल्या परिषदेंत बहुमतानें मंजूरही झाली. या हेग परिषदेंत कामगार क्रांतीच्या कार्यपद्धतीविषयीं त्यानें जे भाषण केलें ते अत्यंत चिरस्मरणीय असून आपल्या देशासही मार्गदर्शक होण्याजोगें आहे. मार्क्स ह्मणतो:—

"The worker must one day capture political power in order to found new organistion of labour. But we do not assert

that the way to reach this goal is the same everywhere. We know that the institution, the manners and customs of various countries must be considered, and we do not deny that there are countries tike England and America, I might even add Holland, where the worker may attain object by peaceful means.'

'नूतन कामगारसंस्था स्थापन करण्यासाठीं कामगारांनी शेवटीं राजकीय सत्ता काबीज केली पाहिजे ही गोष्ट जरी खरी असली तरी, हें ध्येय गांठण्याची कार्यपद्धति सर्वत्र एकसारखीच असणार असें आमचें ह्मणणें नाहीं. निरनिराळ्या देशांतील संस्था, आचारविचार, चालीरीती हीं ध्यानांत घेतली पाहिजेत. इंग्लंड, अमेरिका किंबहुना हॉलंड या देशांत कामगारांना शांतताप्रधान मार्गांनीं आपलें उद्दिष्ट प्राप्त करून घेता येईल हें आम्हीं नाकबूल करीत नाहीं.' यावरून हिंदुस्थानची परिस्थिती लक्षांत घेऊन शांततेच्या मार्गानीं येथें साम्यवाद स्थापन करणें अशक्य नाहीं हें स्पष्ट होतें. असो, संघाची कचेरी न्यूयॉर्कला गेल्यानंतर २।४ वर्षें संघ कसाबसा कालक्रमणा करीत असता त्याची १८७६ मध्यें इतिश्री झाली!

## गोथा कार्यक्रम

याप्रमाणें आंतरराष्ट्रीय संघ अंतर्धान पावल्यानंतर मार्क्सनें आपला लेखन-व्यवसाय पुनः हातीं घेतला. १८७५ मध्यें त्यानें लासलेच्या गोथा कार्यक्रमावर टीकाग्रंथ लिहिला. या ग्रंथांत समाजाचें भांडवलशाही युगांतून समाजसत्ताक समाजरचनेंत स्थित्यंतर होण्याचे वेळीं संक्रमणावस्थेंत 'श्रमजीवी वर्गाचें सर्वाधिकारित्व' (The dictatorship of the poletariat) अस्तित्वांत येणें कसें जरूर आहे याचें दिग्दर्शन केले आहे. त्यानें सूचित केलेल्या या छोट्याशा मजकुरावर पुढें अनेक भाष्यें झाली असून त्याच्या सूचनेनुसार सांप्रतच्या रशियाच्या संक्रमण काळांत श्रमजीवी वर्गाचे आधिराज्य अंमलांत आलें आहे. लेनिन व स्टॅलिन हे अनुक्रमें सर्वाधिकारित्व पदावर विराजमान झालेले आहेत ही गोष्ट जगद्विख्यात आहेच,

## समाजसत्ताक समाजरचनेंत श्रमाचा मोबदला

पुढें याच ग्रंथांत समाजसत्ताक समाजपद्धतींत कोणत्या तत्त्वावर श्रमाचा मोबदला अगर वेतन देण्यांत येईल याबद्दल मार्क्स ह्मणतो:-

With the development of all the faculties of the individual, the productive forces have correspondingly increased, and all the springs of social wealth flow more abundantly. Only then may society inscribe on its banners: 'from every one according to his faculties, to every one according to his needs'

समाजातील व्यक्तींच्या सर्व शक्तीचा विकास होऊन तदनुरोधानें उत्पादनशक्ती आपोआपच संवर्धित झाल्यानंतर साहजिकच सामाजिक संपत्तीचे झरे चहूंकडून तुडुंब वाहू लागतील. अशाच वेळीं प्रत्येकाला त्याच्या श्रमाचा मोबदला त्याच्या शक्तीनुसार देण्याऐवजी त्याच्या गरजा पाहून द्यावा हें तत्व प्रचारांत आणण्यास समाजाला कोणत्याही प्रकारची दिक्कत वाटत नाहीं.

१८७५ पासून १८८३ पर्यंत मार्क्स हा अनेक रोगांनीं ग्रस्त झाला होता. तथापि अशा परिस्थितींतही त्यानें अमेरिका व रशिया येथील शेतींची स्थिति कशी आहे हे समजून घेण्यासाठीं स्वतंत्र अध्ययन केलें. व्याधींनीं गांजलेले मन त्यानें अनेक अन्य विषयांत गुंतवून सोडले. १८७७-७८ मध्यें आपली प्रकृती सुधारण्याकरतां तो कार्ल्सबाद येथें जाऊन राहिला. या ठिकाणीं त्यानें 'भांडवल' ग्रंथाचा दुसरा विभाग लिहिण्याकरतां सर्व सामुग्री गोळा केली. तेथून दूषितजंतुविनाशक पाणी असलेल्या अनेक ठिकाणीं, त्यानें स्थलांतर केलें. पण कांहीं केल्या त्याच्या प्रकृतीला आराम वाटेना, व अखेर १४ मार्च १८८३ रोजीं त्याचे प्राणोत्क्रमण झाले. १७ मार्च १८८३ शनिवार रोजीं हायगेट सिमेट्रीत त्याच्या प्रेताचें दफन करण्यांत आलें.याप्रसंगीं एंजल्स व लिब्कनें यांचीं अत्यंत कळकळीची भाषणें झालीं.

## ६. मार्क्सचें जीवित-कार्य.

मार्क्सच्या कार्याचें थोडेसें दिग्दर्शन आरंभींच्या प्रकरणांत केलें आहेच. मार्क्स हा जातिवंत क्रांतिवादी होता. आकाश कोसळून पडलें तरी विरुद्ध पक्षांशीं त्यानें कधींही तडजोड केली नाहीं, किंवा त्या पक्षाला कोणतीही सवलत दिली नाहीं. त्यानें कोणापुढें कधींही मान तुकविली नाहीं. कितीही निराशामय वातावरण असो, प्रतिपक्षीयांचा कितीही जोराचा विरोध असो, कोणत्याही गोष्टीची दिक्कत न बाळगतां, सरळपणें, निधड्या छातीनें आपल्या ध्येयसिद्धीचा कंटकमय मार्ग आक्रमणारा मानवी विचारक्रांतीच्या इतिहासांत मार्क्सप्रमाणें एकादा तरी धीरोदात्त निपजला असेल किंवा नाहीं याची शंका येते ! लोक-निंदेची त्यानें कधींच पर्वा बाळगिली नाही. त्यानें आपल्या हृदयांत कोण-त्याही कमकुवत भावनेला अगर हळुवार वृत्तीला केव्हांही थारा दिला नाहीं. दलितांचे हित उरांशीं बाळगून कोणत्याही संकटास न जुमानतां त्याला जें कांहीं सत्य म्हणून वाटलें त्याची अखंड सेवा करण्यांत त्यानें आपलें अमूल्य आयुष्य कंठिलें; ही एकच गोष्ट त्याच्याशी संपूर्ण मतभेद असणाऱ्यांच्या अंतःकरणांतही त्याजविषयीं अत्यंत आदर उत्पन्न करण्यास पुरेशी आहे. त्याच्या मनाची तळमळ,त्याचे धैर्य,त्याची निःस्वार्थ वृत्ती, हद्दपारीच्या हला-खीने, दारिद्र्याच्या दगदगीने, आणि लोकापवादाच्या भीतीनें न ढळणारी त्याची कार्यनिष्ठा ही सर्व अलौकिक होत ! अचाट कार्यशक्ती व अजस्र

विवेकशक्ती या निसर्गदत्त देणगीच्या बळावर प्राशियांतली कोणतीही उच्च पदवी त्याला सहज पटकाविता आली असती ! परंतु घरीं चालत येणाऱ्या मानपानाच्या लक्ष्मीला लाथाडून त्यानें वैज्ञानिक साम्यवादाचा ( Scientific socialism ) प्रणेता, कामगारांच्या चळवळीचा पुरस्कर्ता या दुहेरी नात्यानें आपल्या आयुष्याची थोडीथोडकी नव्हे तर चाळीस वर्षे कष्टमय वनवासांत व कंटाळवाण्या अज्ञातवासांत काढिलीं,ही गोष्ट कांहीं लहानसहान नव्हे ! अगाध विद्वत्ता, खोल तात्त्विक दृष्टि आणि जोमदार लेखनशैली या तीन अत्युच्च गुणांमध्यें त्याचा हात धरणारा त्याच्या तोडीचा एकादा तरी अर्थशास्त्रज्ञ १९ व्या शतकांत निपजला असेल किंवा नाहीं याची वानवाच आहे ! अर्थशास्त्रावरील सर्व ज्ञान त्यानें केवळ हस्तगत केले होतें इतकेंच नव्हे तर तें ज्ञान त्याला आपल्या सिद्धांताच्या प्रस्थापनार्थ हव्या तितक्या कुशलतेनें सहज खेळविता येत असे. पण त्याच्या स्वतंत्र बुद्धीची चमक त्यानें शोधून काढलेल्या सामाजिक विकासाच्या बुडाशीं भौतिक परिस्थिती व आर्थिक कारणें असतात या त्याच्या प्रमुख सिद्धांतांत प्रतीत होतें. भांडवलशाही युगाचा तात्त्विक मीमांसक या नात्यानें त्यानें केलेलें कार्य अत्यंत महत्वाचें आहे. इतिहास हा अविरत घटनांची मालिका असून एका युगांतील सामाजिक व राजकीय घटना या त्याच युगापुरत्या प्रगतिपर व त्याच युगांतील सामाजिक जीवन खुलवून दाखविणाऱ्या असल्या, तरी पुढील युगांतील सामाजिक जीवनाभोवती प्रगतिप्रतिबंधक शृंखला बनतात हा मार्क्सचा प्रमुख क्रांतिकारक सिद्धांत आहे. हा सिद्धांत भांडवलशाही युगास लावून त्यानें असें दाखवून दिलें आहे कीं, सांप्रतच्या युगांतल्या ज्या घटनांनीं एकेकाळीं सामाजिक जीवनाच्या विकासाची अपूर्व कामगिरी केली, त्याच घटना आतां सामाजिक जीवनाचा कोंडमारा करीत आहेत. कारण सांप्रतच्या युगांतील प्रभावी वृत्तींचा कल नूतन उच्च श्रेणीवरच्या व व्यापक स्वरूपाच्या अशा आर्थिक व सामाजिक घटना बनविण्याकडे ह्मणजे समाजसत्तावादाची प्रस्थापना करण्याकडे झुकतो आहे. जसजसा

रशियांत मार्क्सवादाचा चालू असलेला प्रयोग यशस्वी होत जाणार तसतसा मार्क्सवादाला अधिकाधिक तजेलो चढत जाणार ही गोष्ट निःसंशय आहे. पण पं. जवाहरलाल नेहरू यांनीं आत्मचरित्रांत ह्मटल्याप्रमाणें कोणत्याही अन्य कारणांनीं रशियांतील मार्क्सवादाचा प्रयोग निष्फळ झाला, तरीसुद्धां मार्क्सवादाची महती स्वयंसिद्ध आहे. मार्क्सनें सामान्य जनतेच्या भवितव्याच्या प्रश्नाला अर्थशास्त्रांत, सामाजिक विचारांत पहिल्या दर्जाचें स्थान प्राप्त करून दिलें. अनेक दुःखांनीं व्याप्त अशा निराशामय वातावरणांत आशेचे किरण सोडून मानवी जीवन सुखमय करणें मानवांच्या स्वाधीनतेचे आहे असा दिव्य संदेश त्यानें दिला. इतकेंच नव्हे तर या पृथ्वीतलावर जेथें जेथें ह्मणून सामाजिक उत्क्रांतीचा प्रश्न निघेल तेथें मार्क्सवाद हा स्फूर्ति निर्माण करून भवितव्याचा मार्ग चोखाळण्याच्या कामीं अत्यंत उपयोगी पडेल यांत शंका नाहीं. त्यानें केलेल्या क्रांतिकालाच्या आगमनाच्या गतीचा अंदाज चुकीचा ठरला, तरी तिचें स्वरूप व दिशा हीं त्यानें अलौकिक दूरदर्शित्वानें आगाऊ व हुबेहूब ताडिलीं ही गोष्ट कौतुकास्पद आहे. त्याच्या कार्याचें व तत्वज्ञानाचें सामान्य स्वरूप येथे अनुषंगतः दिग्दर्शित केलें आहे; त्यांच्या बुडाशीं असलेल्या तात्त्विक भूमिकेचा विचार विस्तृतपणें पुढील विभागांत करूं.

## मार्क्स-चरित्रावर नवप्रकाश.

अगदीं अलिकडे मार्क्स आणि मार्क्सवाद यावर आणखी कांहीं पुस्तकें प्रकाशित झालीं. त्यांतील अत्यंत महत्वाचा भाग या ठिकाणीं देणें अप्रस्तुत होणार नाहीं.

एके प्रसंगीं अंगांत घालावयाला कोट व पायांत चढवायला बूट नसल्यामुळें मार्क्सला घरांतच बसून राहणें भाग पडलें. आणखी एका प्रसंगीं लिहिण्याचा कागद अगर वृत्तपत्र घ्यावयाला त्याच्याजवळ पैसा नव्हता, यानंतर आणखी एका प्रसंगीं एका प्रकाशकाजवळ हस्तलिखित पाठविण्यासाठीं पोस्टाची तिकिटें उसनी घ्यावी ह्मणून आपल्या परिचित

गृहस्थाकडे खेपा घालीत असतां तो दृष्टीस पडला! शरीरसंरक्षणार्थ अत्यंत अवश्य अशा वस्तू उदार घेतल्या असतां त्यांची किंमत वेळच्यावेळीं देण्याची त्याची ताकद नसल्यामुळें त्याचा वाण्याशी व लहानसहान दुकानदारांशीं नेहमीं वाद होत असे. त्याच्या राहत्या घरचा मालक तर नेहमीं त्याला बेलीफचा धाक घालीत असे. कसेंबसें जीवनसंरक्षण करण्यासाठीं जें कांहीं अल्पस्वल्प तो मिळवीत असे तेंही गहाणवटदारांच्या भक्ष्यस्थानीं पडत असे.

कधीं कधीं आपल्या प्रिय पत्नीच्या तक्रारी ऐकून तो थोडासा चिडत असे. पण अमळशानें शांत होऊन त्या तक्रारी तो योग्य व समर्थनीय मानीत असे. कारण, त्याला असें खात्रीनें वाटत कीं शास्त्रीय प्रयोगशाळांतील आनंदाचा आस्वाद घेण्याचे सुख त्याच्याप्रमाणें तिच्या नाशिबीं नसतां, सांसारिक दुःखे, अपमान, चिंता आदिकरून हाल मात्र तिच्या कपाळीं आहेत.

खरोखर त्याचे हाल इतके अमर्याद होतें कीं त्याच्या मदतीला त्याचा सदैव पाठीराखा सहकारी एंजल्स उभा नसता तर त्याची अतुल इच्छा सांसारिक दगदगींच्या आगींत वितळून जाण्याचा संभव होता. या उभयतांच्या स्नेहसंबंधाला जगांत दुसरी उपमा आढळून येत नाहीं. तिची अधिष्ठापना ठिसूळ अशा कोमल भावनावर झालेली नसून दोन सूक्ष्म बुद्धीच्या थोर पुरुषांनीं हातीं घेतलेल्या एकमेव सामाजिक साध्याच्या बळकट खडकावर झाली होती.

'वयाच्या अठराव्या वर्षी मार्क्सची जेनीशी प्रथम भेट झाली. पुढें कांहीं दिवसांनीं जेनीचें आपल्यावर प्रेम जडलें आहे असें मार्क्सला दिसून आलें. पुढें या उभयतांच्या प्रेमाची हकीकत मार्क्सच्या बापाला कळली. जेनीसारखी सौंदर्याची खाण मार्क्ससारख्या कुरूप माणसावर फिदा व्हावी याचें मार्क्सच्या बापाला आश्चर्य वाटलें; तिच्या खाजगी वर्तनाबद्दल संशय आला. नंतर त्यानें सहा महिनेपर्यंत जेनीच्या वागणुकीची कठोर परीक्षा

घेऊन तिचें मार्क्सवरचें प्रेम शुद्धस्वरूपाचें आहे हें मार्क्सला विदित केलें. मार्क्सचा बाप मार्क्सला लिहतो:—'जेनीला एकादा राजपुत्रही भुरळ घालू शकणार नाहीं; याबद्दल माझी खात्री झाली आहे. तिनें आपलें सर्वस्व तुला अर्पिलें आहे; इतकेंच नव्हे तर ती तुझ्यासाठीं जो स्वार्थत्याग करीत आहे,तो करण्याची ताकद बहुतेक मुलींत नसते.एवढी बाब तूं विसरूं नको.'

## मार्क्सबद्दल शिक्षकाची भविष्यवाणी.

मार्क्सचा पहिला लेख वाचून एका प्रोफेसरानें असे उद्गार काढले कीं, 'अखख्या जर्मनीचे डोळे तो आपल्याकडे वेधून घेईल. तत्त्वज्ञानाचें सखोल ज्ञान व मर्मभेदक उपरोध यांचा आश्चर्यकारण मिलाफ त्याच्या लिखाणांत आढळेल. रूसो, व्होल्टेअर, हॉलबॅक, लेसिंग, हेनि या सर्वांना एकत्र करा—म्हणजे त्यांचा समन्वय करा, नुसती मोट बांधू नका!—आणि तुह्माला डॉ. मार्क्स ही काय चीज आहे याची कल्पना येईल!" -यावेळीं मार्क्सचें वय अवघें वीस वर्षांचें होतें.

## ज्यूरीतर्फे आभार

ब्रुसेल्स येथें अधिकाऱ्यांचा अपमान करण्याबाबत व लोकांना करबंदीचा मार्ग सुचविण्याबद्दल त्याला कोर्टांत खेचण्यांत आलें. त्यावेळीं त्यानें ज्यूरीला एक लांबलचक व्याख्यान देऊन त्यांत कायद्याचा कीस व राज्यघटनेचे वाभाडे काढले. ज्यूरीनें त्याला सोडून दिलें; इतकेंच नव्हे तर तिच्या म्होरक्यानें मार्क्सचे स्वतःतर्फे व सहकाऱ्यातर्फे "हें अतिशय माहितीपूर्ण व्याख्यान दिल्याबद्दल" आभार मानले!

मार्क्सनें एकदां रेल्वेंत कारकुनाच्या जागेसाठीं केलेला अर्ज त्याच्या भिकार हस्ताक्षरामुळें केराच्या टोपलींत तुकडे होऊन कसा पडला, कांहीं नोकरी धंदा मिळेना ह्मणून तो ब्रिटिश म्युझियमध्यें वाचायला कसा जाऊं लागला, 'Thank God; I am not a Marxist!' हें सुप्रसिद्ध उद्गार त्यानें कां काढले इत्यादि हकीकती Karl Marx-Man and Fighter या निकोलव्हस्कीच्या नवीन ग्रंथात आढळून येतात.

## ७. विरोध-विकासवाद.

जगांत आजपावेतों होऊन गेलेल्या तत्त्ववेत्त्यांचे एकंदरींत दोन प्रमुख संप्रदाय पडतात. एक जडवाद्यांचा ( Materialists ) व दुसरा हेतुवाद्यांचा ( Idealists ). जडवादी अगर भौतिकवादी ह्मणजे ' खाना पिना सुखसे सोना, ' ' ऋणं कृत्वा घृतं पिबेत ' या मताचे पुरस्कर्ते अर्थात गीतेच्या १६ व्या अध्यायांत वर्णिलेले असुरी संपत्तीचे लोक होत, अशी चुकीची कल्पना समाजांत रूढ आहे. त्याचप्रमाणें अध्यात्मवादी अगर हेतुवादी ह्मणजे सर्व सद्गुणांचे पुतळे अतएव गीतेतील त्याच अध्यायांत वर्णिलेले दैवी संपत्तीचे लोक होत, असा भ्रामक समज समाजांत प्रचलित आहे. तेव्हां या द्विविध वादाचे खरें स्वरूप काय आहे ते आतां पाहूं.

### हेतुवादी किंवा आत्मवादी ( Idealists )

हेतुवाद्यांची विचारसरणी अशी आहे कीं, ' आत्मनः आकाशः संभूतः आकाशाद्वायुः वायोरापः ' इत्यादि अनुक्रमानें चराचर सृष्टी निर्माण झाली आहे. ती घडवून आणण्याच्या बुडाशीं सनातनी आत्म्याचा कांहीं विशिष्ट हेतु असून तदनुरूप विश्वाचे सर्व व्यापार चालले आहेत. संध्येंत ह्मटल्याप्रमाणें ' धाता यथापूर्वमकल्पयन् ' या न्यायानें पूर्वक्रमानुसार विश्व निर्माण केले आहे; व त्यांतील व्यवहारही पूर्ववत् चालू राहावयाचे. विश्वाचे हें रहाटगाडगे त्याच त्याच पद्धतिनुसार चालू ठेवण्यांत विश्वाच्या बुडाशीं असलेल्या आत्मशक्तीचा कांहीं तरी हेतु असला पाहिजे. जगांतील समाज

हा निसर्गतः विकास पावत नसून त्या आत्म्याच्या इच्छेनुसार ' नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण ' या न्यायानें हेलकावे खात असतो. याच चक्रनेमिक्रमानें इतिहासाचा विकास न होतां पुनरावृत्ति होत असते. या विचारसरणीला प्रमुखतः श्रद्धेचें अधिष्ठान असतें. थोडक्यांत सांगावयाचें ह्मणजे हेतुवाद्यांची विचारसरणी श्रद्धाप्रधान असते तर जडवाद्यांची बुद्धिप्रधान असते.

## जडवादी अगर भौतिकवादी.

जें बुद्धीला पटत नाहीं त्याचा जडवादी कधींच विचार करीत नाहींत. बुद्धीच्या मुशींतून तावून सुलाखून जे तत्त्व बाहेर पडतें तेंच सत्य असे जडवादी मानतात. जें आत्मतत्त्व बुद्धीला आकलन होत नाहीं असे आत्मवादी ह्मणतात, तें जडवादी गृहीतच धरीत नाहींत.त्यांची विचारसरणी अशी कीं विश्व हें कोणी निर्माण केलेलें नसून तें सहजगत्या आपोआप विकास पावलेले आहे व पुढें पुढें अधिकाधिक विकास पावत जाणार. जग हें आत्मशक्तीनें तयार वस्तूंचा घडविलेला संयोग नसून अविरत घटनांची मालिका आहे. या घटनाद्वारें एकांतून अनेक वस्तू निर्माण होत असतात. कांहीं काळ त्यांचे अस्तित्व टिकतें, पण पुढें त्यांचा विलय होऊन उच्च श्रेणीवर त्यांचें रूपांतर झालेलें दृष्टोत्पत्तीस येते. या सर्वांत बदल हा अमर्याद आहे. शाश्वत अगर सनातन असें जगांत कांहींच नाहीं. विश्वाचें आदिकारण जड असून विश्वाला गति आहे. त्यांतूनच त्याची प्रगति होत असते. क्रांति हाच विश्वाचा धर्म आहे. जडवादी असें मानतो कीं, मानवी समाजाचें पाऊल हे केव्हांही भविष्यांतच पडणार, भूतकालांत नव्हे. मधून मधून परागती झाल्याचा भास होईल; पण विशाल कालखंडाकडे पाहतां जग एक पाऊल पुढें गेल्याचें आढळून येईल. विश्वांतीला हा बदल केव्हांही प्रगतीकरतां असतो. बीजाला अंकुर फुटतो. त्यांतून वृक्ष निर्माण होतो. त्या वृक्षाला पुनः बीज येतें, आणि हें बीज संख्येनें फार मोठें असते. निसर्ग अगर विश्व यांच्यांतील विकासात्मक स्थित्यंतराप्रमाणेंच मानवी

समाजाच्या इतिहासांत ही प्रगतिपर स्थित्यंतरें घडून आलीं आहेत. कुटुंब राजसत्ता, उत्पादन, धर्म, कायदा इत्यादिविषयक कल्पना याच अनुक्रमानुसार विकास पावल्या आहेत. विज्ञानशास्त्राचा विकास होऊन तत्त्ववेत्त्यांची तर्कप्रतिष्ठित शास्त्रीय दृष्टि जसजशी विकसित होऊं लागली, तसतसें जुनें-पुराणें सामान्य तर्कशास्त्र अपुरें पडूं लागून १९ व्या शतकारंभीं हेगेलच्या नवीन तर्कशास्त्राचा उदय झाला. हेगेल हा आत्मवादी. तथापि इतर आत्मवाद्याप्रमाणें आत्म्यापासून चराचर विश्वाची उत्पत्ति कशी झाली एवढें दाखवून स्वस्थ बसला नाहीं, तर आपल्याकडील कपिलसांख्यांच्याप्रमाणें अखिल विश्वाचा विकास कसा झाला यांच्या नियमांचें संशोधन हेगेलनें केलें आहे. सांख्यांचा प्रकृतिवाद व पाश्चात्य जडवाद यांत बहुतांशीं साम्य असलेले आढळून येईल. सांख्यांच्या प्रकृतिवादांतील कांहीं दोषास तत्कालीन विज्ञान विचाराची (Scientific Thought) अर्भकावस्था हीच जबाबदार धरली पाहिजे. आतां हे नूतन तर्कशास्त्र कोणतें तें पाहूं:—

विश्वाचा विकास हा विरोधात्मक—संघर्षणात्मक असतो; ह्मणजे दोन विरोधी वस्तूंच्या झगड्यांतून होत असतो. विश्व हें दिवस-रात्र शीत-उष्ण, जड-चेतन, सुख—दुःख,राग—द्वेष, कोमल—कठोर, सधनता-निर्धनता इत्यादि द्वंद्वांनीं व्यापिलेलें आहे. त्याच्या विरोधी शक्तींत विग्रह चालू असतो. आणि एक वेळ अशी येतें कीं या दोन्ही शक्ती एके ठिकाणीं नांदणे अशक्य होऊन त्यांचा स्फोट होतो, त्या स्फोटालाच क्रांति असें नांव दिलें आहे. या क्रांतीतूनच विकास होत असतो. परंतु या विरोधी वस्तूंमध्यें योग्य प्रमाणांत लढण्याचे सामर्थ्य असलें पाहिजें. नाहींतर एक वस्तु दुसऱ्या वस्तूला गिळंकृत करील. हेगेलच्या तर्कपद्धतिनुसार दोन विरोधी वस्तूंच्या विग्रहातून विकासात्मक बदल घडून येतो; व त्या दोन वस्तूंच्या समीकरणामुळें नूतन पण विकासात्मक उच्चश्रेणीवरची तृतीय वस्तू निर्माण होते. ज्या वस्तूविरुद्ध विरोधी वस्तूंचा झगडा चालू असतो, त्या वस्तूला हेगेलनें Positive ह्मणजे भावात्मक वस्तु असें नांव दिलें आहे. या वस्तूला जें

विरोधी द्रव्य असतें तें अभावात्मक (Negation) होय. हेगेलच्या मताप्रमाणें हा विरोध अगर अभाव हेंच सर्व चळवळींचें व जीवनाचें उगमस्थान होय. कोणत्याही वस्तूंत ज्या प्रमाणांत विरोधी द्रव्याचे अस्तित्व असतें त्यामानानें तींत चलनवलन, शक्ती व परिणति हीं दृग्गोचर होतात. या अभावात्मक (Negation) वस्तूच्या सतत चालू असलेल्या विरोधाच्या योगानें अभावाच्या अभावाची (Negation of negation) व त्यांतून समभावाची (synthesis) निष्पत्ति होते.

सर्व सामाजिक घटनांचा विचार करीत असतां या हेगेलच्या तर्कपद्धतीचा मार्क्सनें सर्वस्वी अवलंब केला आहे. सामाजिक घटनांच्या विकासांत विरोधाचें मूळ शोधून काढण्यासाठीं मार्क्स धडपडत असे, कारण विरोधाच्या प्रादुर्भावाचें पर्यवसान प्रगतींत होतें अशी त्याची ठाम समजूत होती. 'होली फॅमिलिज्' नांवच्या आपल्या पुस्तकांत त्यानें हेगेलच्या विरोध-विकास पद्धतीच्या अनुरोधाने वर्गकलहाचा उलगडा करून दाखविला आहे तो असा:-खाजगी मालमत्ता ही भावात्मक वस्तू विरुद्ध याला विरोधी अभावात्मक वस्तू-दलितवर्ग=( या दोन वस्तूंच्या विग्रहांतून ) नवीन समाजाची निष्पत्ति ही समभावात्मक वस्तू. या समभावात्मक वस्तुस्थितींत ह्मणजे नवीन निर्माण होणाऱ्या समाजांत खाजगी मालमत्ता व दलितवर्ग या दोघांचाही लय होतो. थोडक्यांत आहे-नाहींच्या झगड्यांतून सर्वांना सारखे देणारा समाज निर्माण होतो. असो, या विरोधविकासपद्धतीच्या मदतीनें सामाजिक घटनांचे कार्यकारणभावावर धागेदोरे पृथक करून मार्क्सनें सामाजिक विकासाच्या नियमांचेही संशोधन करून ठेविलें आहे. या पद्धतीच्या अनुरोधानें मार्क्सनें मानवी इतिहासाची भौतिक मीमांसा कशी केली आहे व त्यांत वर्गकलह कसे दाखवून दिले आहेत हे आतां आपण पाहूं.

## इतिहासाचें आधिभौतिक प्रकटीकरण.

या सिद्धातांचा मथितार्थ हा कीं, कोणत्याही युगांत समाजाचे आर्थिक संबंध हेच-ह्मणजे मानवी प्राणी आपल्या गरजा भागविण्याकरतां

अवश्य असलेल्या वस्तूचे उत्पादन, विभाजन व विनिमय ज्या साधनांच्या योगानें करतो अशा तऱ्हेची साधनें–समाजाचा विकास घडवून आणण्यांत व राजकीय, सामाजिक, बौद्धिक, नैतिक इत्यादि समाजाचे संबंध विणण्यांत अत्यंत प्रभावी कार्य करीत असतात. मार्क्सपूर्वकालीं समाजाच्या ऐतिहासिक स्थित्यंतरांना थोर व्यक्ती, कल्पनांचा विकास, धार्मिक वचनें, राजपद्धतींतील उलथापालथ किंवा हवापाणी, भूमि इत्यादि भौतिक परिस्थिति हींच कारणीभूत असतात असा समज समाजांत रूढ होता. इतिहासाच्या आर्थिक विवेचनाच्या सिद्धांताचे अस्पष्ट दिग्दर्शन सत्ययुगवाद्यांच्या ( Utopian writers ) लिखाणांत मधून मधून दृग्गोचर होते. परंतु या सिद्धांताचें खोल संशोधन करून त्याचा पडताळा मानवी समाजाच्या ऐतिहासिक स्थित्यंतरांत पाहून त्याची पद्धतशीर विज्ञानशुद्ध ( Scientific ) मांडणी प्रथम केल्याबद्दलचें श्रेय मार्क्सलाच दिलें पाहिजे. फ्युअरबॅशचा निसर्गवाद व हेगेलचा विरोधविकासवाद यांचा त्याचा मनावर अतिशय परिणाम झाला होता.या दोन वादाच्या साहाय्यानें सर्व सामाजिक घटनांच्या बुडाशीं कोणताही परमेश्वरी हेतू नसून, त्या भौतिक जीवनात्मक परिस्थितीनें घडवून आणलेल्या प्रगतीमुळें प्रादुर्भूत झाल्या आहेत हें त्यानें शोधून काढले.

'अर्थशास्त्राचे परीक्षण', 'तत्वज्ञानें दारिद्र्य' व 'कम्यूनिस्ट जाहीरनामा' या ग्रंथांत ठिकठिकाणीं मार्क्सनें हा सिद्धांत विशद करून मांडला आहे. अर्थशास्त्रावरील परीक्षण या ग्रंथांत मार्क्स ह्मणतो:– 'सामाजिक उत्पादन करीत असतां मानव प्राणी हा आपल्या इच्छेच्या विरुद्ध कांहीं आवश्यक असें निश्चित संबंध निर्माण करतो. हे संबंध ह्मणजे मानवाच्या भौतिक उत्पादन शक्तीच्या विकासाची ठराविक पायरी होय. हे उत्पादनविषयक सर्व संबंध ह्मणजेच समाजाची आर्थिक घटना–समाजाचा भरभक्कम पाया कीं ज्यावर राजकीय, धार्मिक, सामाजिक सांस्कृतिक इत्यादि अन्य मनोरे रचिले जाऊन तदनुरूप सामाजिक प्रगतीचें निश्चित स्वरूप दृग्गोचर होते. तात्पर्य समाजाच्या भौतिक जीवनांतील

उत्पादनपद्धती हीच मानवी जीवनाची सामाजिक, राजकीय संस्कृति निश्चित करीत असते. मार्क्सनें 'तत्वज्ञानाचें दारिद्य' या ग्रंथांत हेंच सोदाहरण दाखविलें आहे. मार्क्स ह्मणतो:–

'उत्पादनपद्धति बदलत असता मनुष्यजात आपले सर्व सामाजिक संबंधही बदलत असते. हस्तव्यवसाय सरंजामी समाज निर्माण करतो; बाष्पचक्की यंत्रप्रधान भांडवलशाही समाज निर्माण करते. जे लोक आपल्या भौतिक उत्पादनानुरोधानें सामाजिक संबंध प्रस्थापित करतात, तेच लोक आपल्या सामाजिक संबंधानुरोधानें तत्वें, कल्पना व सिद्धांत निर्माण करतात. ह्मणून या सर्व कल्पना व संघ अस्थिर स्वरूपाच्या असून त्यांचे केवळ ऐतिहासिक दृष्टया महत्व असतें.'

मार्क्स व एंजल्स यांनीं १८४८ मध्यें प्रसिद्ध केलेल्या जाहीर–नाम्यांत सुखवस्तू वर्गानें उत्पादन–साधनांत क्रांति घडवून आणित असतां समाजाचें स्वरूप कसें आमूलाग्र बदलून टाकिले,याचे सविस्तर विवेचन केलेलें यापूर्वी आले आहेच. जाहीरनाम्यानंतर हा सिद्धांत तत्कालीन राजकीय परिस्थितीला लावून दाखविण्याचें मार्क्सनें अनेक प्रयत्न केले. १८६७ सालीं प्रसिद्ध केलेल्या आपल्या 'भांडवल' ग्रंथांत त्यानें या सिद्धांताचे विवरण केलेले नसून तो गृहीत धरूनच ग्रंथांतील इतर विषयांचे त्यानें प्रतिपादन केलें आहे. या सिद्धांताचें स्वरूप मृगया, गुलामगिरी, सरंजामी व भांडवलशाही इत्यादि विविध युगांत कसें प्रतीत होतें तें पाहू:—

मनुष्य प्राणी आपल्या विकासाच्या अगदीं प्रारंभीं मृगया करून आपला चरितार्थ चालवीत असे. अर्थात् त्याला कळप अगर टोळी करून राहावें लागे. शिकारीच्या कामीं टोळींतल्या सर्व लोकांना भाग घेणें अवश्य पडे.सर्वांनीं मिळून केलेल्या शिकारीवर साहाजिकपणें सर्वांचा सारखा हक्क असे व ती सर्वांना सारखी वाटून देण्यांत येई. याप्रमाणें निर्वाहाचें साधन जोपर्यंत केवळ मृगया हेंच होतें, तोपर्यंत समाजरचना सामुदायिक स्वरूपाची ह्मणजे समाजसत्ताक ( Primitive communism ) अशी होती.

## खासगी मालमत्ता व दास्ययुग.

पुढें मानवांची संख्या जसजशी वाढूं लागली तसतसें उदर निर्वाहार्थ केवळ मृगयेचें साधन त्यांना अपुरे पडूं लागले. तेव्हां मनुष्य प्राण्याला शेतीची कांस धरणें भाग पडलें. मानवानें पुढें शेतीची ओबडधोबड हत्यारे निर्माण केली, व जमीनीच्या लहानसहान तुकड्यावर मेहनत मशागत करून तो आपला चरितार्थ चालवूं लागला. अर्थातच तो हळुंहळूं धान्याचा संग्रह करून पुढील वर्षाची तरतूद करून ठेवूं लागला. या परिस्थितींतूनच कुटुंब पद्धति व मालमत्ता यांचा उदय झाला. धान्यसंग्रहाच्या प्रवृत्तीबरोबरच धान्योत्पादक जमीनीच्या संग्रहाची मानवाला जरूरी भासूं लागली. अर्थात जास्त जमीनींतून पीक काढावयाचें असल्यास कुटुंबाखेरीज इतर माणसांची गरज उत्पन्न झाली. यापासूनच पुढें दुसऱ्यास राबायला लावून त्याच्या राबणूकीचा अंशतः फायदा घेण्याच्या पद्धतीचा प्रघात सुरू झाला. ही पद्धतच सरंजामी युगाचा मूलभूत पाया आहे. प्राचीन काळीं निरनिराळया टोळया व संघ मृगया युगांत निर्माण झाले होते हें वर दिलेंच आहे. या संघाच्या पुढाऱ्यांना दुसऱ्या संघाच्या जमीनी, गुरेढोरें आदिकरून उत्पादनाची साधनें जबरदस्तीनें काबीज करणें संख्येने वाढत्या अशा आपल्या संघाच्या हिताचें आहे असें वाटूं लागलें. त्याचप्रमाणे संघाच्या इच्छा व गरजा याही वाढूं लागल्या, साहजिकच निरनिराळया संघांत युद्धे सुरू झाली. राज्यें निर्माण झाली. युद्धसामुग्री निर्माण करावी लागली. शिस्तीची गरज भासूं लागली. अधिकारी वर्ग निर्माण करावा लागला. शासनपद्धति प्रादुर्भूत होऊं लागल्या. युद्धांतीं जेत्यांनी जित लोकांना त्यांची बायकामुलें, हत्ती, घोडे, गुरेढोरें इत्यादिसह वर्तमान आपल्या प्रांतांत नेऊन गुलाम बनवून त्यांना राबवून आपली सुखसमृद्धि करण्याची प्रथा पाडली. याप्रमाणें गुलामगिरी युगाला प्रारंभ झाला. हिंदुस्थानांतही आर्यांनी अनार्यांना जिंकल्यानंतर द्विज व अद्विज या गुलामगिरीच्या तत्त्वावर वर्णव्यवस्था अमलांत आली. ब्राह्मण

क्षत्रिय वैश्य हे एका बाजूला व शूद्र व अत्यंज हे दुसऱ्या बाजूला अशीं वस्तुस्थिती प्रचलित झाली. आपल्याला अनुकूल असे द्विजहक्कप्रतिपादक कायदे ब्राह्मणांनी करावे, क्षत्रियांनीं त्याच हक्काचें संरक्षण करावें. वैश्यानी अर्थोत्पादन करावे; या त्रिवर्णात्मक द्विजांनीं शूद्र व आतिशूद्र यांना राबण्यास लावून आपला कार्यभाग साधून घ्यावा. या तत्त्वावर आर्यांच्या विविध संस्था अस्तित्वांत आल्या. यांतूनच पुढें निरनिराळया धंदे करणाऱ्या जाति निर्माण झाल्या. याप्रमाणें आर्यांच्या वर्णाश्रम व्यवस्थेला व तदुद्भूत जातिभेदात्मक हिंदु समाजरचनेला मूलभूत पाया आर्थिक आहे हें सिद्ध होतें.

## सरंजामी युग आणि ग्रामोद्योग.

निरनिराळे संघ परस्पराशी लढू लागून संपत्तीचे हरण करतां करतां शासनसत्तेचा प्रादुर्भाव झाला ह्मणून वर कथन केलेंच आहे. राज्य कमविण्याचे क्षेत्र जसजसें वाढूं लागले तसतसा निराळा क्षत्रियांचा अगर सरदारांचा स्वतंत्र वर्ग निर्माण होऊन तो समाजावर आपली सत्ता गाजवूं लागला. सरदारांनीं जिंकून आणिलेला गुलामवर्ग ह्मणजे अठरा धान्याचे कडबोळें होतें. त्याजकरवीं नवीन नवीन संपादिलेल्या विस्तृत भूमीची चांगली व्यवस्थित मशागत होईनाशी झाली. यामुळें कृषिकामांत कसलेला असा शेतकरीवर्ग निर्माण होणें अवश्य झालें. सरदारवर्ग सत्ताधीश असल्यामुळें खंडरूपानें शेतकऱ्यांच्या श्रमाचा तो फायदा घेऊं लागला. युद्धप्रसंगीं शेतकऱ्यांची सेना बनवून आपल्या महत्त्वाकांक्षा सफल करून घेण्याकरतां त्या सेनेचा तो उपयोग करून घेऊं लागला. याप्रमाणें जमीनदार व जमीनीवर राबणारी कुळें असा द्विवर्गप्रधान समाज निर्माण झाला. पुढें जमीनदारांत जो सर्वांत प्रबळ तो राजा अशी वस्तुस्थिति प्राप्त होऊन एकतंत्री राज्यपद्धतीचें महत्त्व प्रस्थापित झालें. केवळ शेतीवर अवलंबून मनुष्याच्या सर्व गरजा भागण्यासारख्या नव्हत्या. ह्मणून शेतीच्या जोडीला निरनिराळे धंदे मध्ययुगांत निर्माण झाले. हे धंदे कौटुंबिक स्वरूपाचे

असून कुटुंबातील माणसांनीं फार फार तर आपल्या आप्तइष्टांच्या मदतीनें चालविलेले असे, असत. याप्रमाणें लोहार, सुतार, सोनार, विणकरी इत्यादि कारागीरांचा मध्यमवर्ग अस्तित्वांत आला, परंतु समाजांत यांचे विशेष महत्त्व नव्हते. उत्पादनाचें प्रधान साधन जे जमीन तिचे मालक जमीनदार यांचे प्रस्थ या मध्यमयुगांत विशेष होते. जमीनदारांच्या अनुरोधानेंच कारागिरांना वर्तन करणे भाग पडे. धंदेवाल्यांचे निरनिराळे संघ अस्तित्वांत आले. हे धंदेही वैयक्तिक स्वरूपांत चालत नसून सांघिक स्वरूपांत चालत असत. हिंदुस्थानांत याच नमुन्याच्या बारा बलुतेदारांची ग्रामसंस्था, व्यापाऱ्यांची श्रेणीसंस्था इत्यादि संस्था प्रादुर्भूत झाल्या. निरनिराळ्या धंदेवाईकांच्या विशिष्ट स्वरूपाच्या जाति अस्तित्वांत आल्या. या भारतीय संस्थांच्या बुडाशीं उच्च नैतिक तत्त्वें व उदात्त भावना ही प्रतीत होत नसून अर्थोत्पादनार्थ संघटना या तत्वाचाच अंमल दिसून येतो. सारांश, सरंजामीपद्धतींत नांगर, चरखा, ग्रामोद्योग इत्यादिवर समाजमंदिर रचिले गेले होते व जमीनदारवर्गाच्या हातांत सर्व सत्ता होती.

## फ्रेंच राज्यक्रांति व भांडवलशाहीचा प्रादुर्भाव

१८ व्या शतकाच्या अखेरीस उत्पादन साधनें व पद्धति यांत अपरिमित बदल घडून येतो. बाष्पशक्तीचा शोध लागून यांत्रिक युगाचा उद्भव होतो. मालाच्या उत्पादनांत व व्यापारी क्षेत्रांत क्रांति घडून येते. लहान लहान धंदे नष्ट होऊन प्रचंड कारखान्यांची उभारणी होते. याबरोबर समाजरचनेंतही क्रांति घडून येते. जमीनदारवर्ग मागे पडून प्रचंड कारखाने चालविणारा भांडवलदार वर्ग पुढें सरसावू लागतो. भांडवलदाराचे वर्चस्व राजेलोक व सरदार–जमीनदार यांना सहन होत नाहीं. सत्ताधारी वर्गाकडून धंद्याच्या वाढीला अडथळा होऊ लागतो. फ्रान्स देशांत राजे व सरदार जमीनदार यांच्या जुलुमाने शेतकरी व सामान्य जनता गांजून जाते. या परिस्थितीचा अखेर फायदा भांडवदारवर्ग घेतो. सारांश आर्थिक सत्ता एका वर्गाच्या हातांत पण राजकीय सत्ता दुसऱ्याच्या ताब्यांत अशी वस्तुस्थिति

निर्माण झाल्यावेळी समाजाच्या गर्भात चाललेल्या या खळबळींतून, ह्मणजे एकाबाजूला सरंजामदार वर्ग तर दुसऱ्या बाजूला शेतकरी, सामान्य जनता व बडे कारखानदार यांच्या झगड्यांतून राजकीय सत्ता भांडवलदार वर्गाच्या हातांत जाते. कारण उत्पादन–साधनें भांडवलदाराच्या मालकीची असतात. या झगड्याचें प्रचंड स्वरूप ह्मणजे १७८९ झाली झालेली फ्रेंच राज्यक्रांति! या क्रांतीमुळे फ्रान्समधील एकतंत्री सत्ता नष्ट होऊन भांडवलशाहीप्रधान लोकसत्ता प्रस्थापित होते. यापुढें भांडवलशाही कोणती अपूर्व कामगिरी बजावते, दलिताची संघटना कशी होते, अखेर दलित वर्गाची संख्या वाढत जाता जाता तो क्रांतींत विजय कसा संपादन करणार व समाजसत्ता कशी प्रस्थापित करणार यासंबंधी मार्क्सने वर्तविलेलें भविष्य यापूर्वी कम्युनिस्ट जाहिरनाम्यांत येऊन गेलेंच आहे. त्याची येथे पुनरुक्ति नको. तात्पर्य, उत्पादनसाधनें जसजशी बदलू लागतात तसतसे माणसांचे सामाजिक संबंध, त्यांची मने, भावना व इच्छाही बदलू लागतात. उत्पादनपद्धतीनुसार उपस्थित झालेल्या भिन्न भिन्न परिस्थितींत भिन्न भिन्न चालीरीती, आचार, विचार, कायदे व संस्था निर्माण होतात. त्याचप्रमाणें समाजांतील ऐतिहासिक स्थित्यतरें व राज्यक्रांत्या यांच्या बुडाशीं उत्पादनसाधनावरील सत्ता हेंच कारण असते. ही सत्ता काबीज करण्याकरतांच मानवी युद्धें घडून आली आहेत. ही सत्ता ज्या वर्गाच्या हातांत त्याच्या हातांत, राजकीय सत्ता प्राप्त होते. राजसत्ता कायम ठेवण्याकरितां हा वर्ग राजकीय संस्था निर्मितो, कायदे करतो, धर्मसंस्था आपल्या हुकूमीं वागवितो. त्याचप्रमाणें खासगी मालमत्तेवरील सत्ता कायम राहण्याकरतां, ती आपल्या मुलाला मिळावी ह्मणून तदर्थ वंश शुद्ध रहावा ह्मणून अनुकूल असे वारसा हक्काचे, घटस्फोट मनाईचे, पातिव्रत्याचे विविध कायदे व धार्मिक बंधने तो वर्ग समाजांत करतो. सारांश, सर्व नैतिक, धार्मिक, व्यक्तिस्वातंत्र्याविषयक कल्पना, कायदे, रूढी, सामाजिक संस्था यांचा पाया आर्थिक असून समाजाचा विकास होण्यास उत्पादन–साधनेंच कारणीभूत होत असतात.

## वर्गयुद्ध व क्रांति.

कम्युनिस्ट जाहीरनाम्यांत कथन केल्याप्रमाणें धनी व गुलाम, श्रीमंत व गरीब, जमीनदार व कूळ, कारखानदार व मजूर, एका शब्दांत सांगावयाचें ह्मणजे पिळणारा व पिळला जाणारा अशा दोन्ही वर्गांत कधीं गुप्तपणें तर कधीं उघडपणें सारखे झगडे चालत आले आहेत. या परस्पर झगड्यामुळें क्रांति होऊन कधीं समाजाची पुनर्रचना झाली आहे तर कधीं दोन्ही वर्गांचा नाश झाला आहे. रोमन सरदार व गुलाम यांच्या झगड्यातून सरंजामी समाज निर्माण झाला, सरंजामदार व शेतकरी यांच्या झगड्यांतून भांडवलशाही समाज निर्माण झाला व अखेर भांडवलदार व मजूर यांच्या झगड्यांतून विषमताविहीन समाज निर्माण होणार. हिंदुस्थानांत आर्य–अनार्य यांच्या झगड्यांतून कृषिजीवि वर्णाश्रमव्यवस्था अस्तित्वांत आली. पुढें वर्णाश्रमी ब्राह्मण व दलितांचे पुरस्कर्ते बौद्ध यांच्या झगड्यांतून सांप्रतचा जातिभेदात्मक सरंजामी समाज निर्माण झाला. उत्पादन साधनांत क्रांति झाली कीं सामाजिक क्रांति होऊन नवीन समाजरचना अस्तित्वांत येते, व ज्याच्या हातांत उत्पादनाच्या साधनावर सत्ता तोच वर्ग सर्वसत्ताधीश बनून क्रांतींत विजय मिळवितो. मृगया–युगांत उत्पादनाचें साधन जी शिकार ती सामुदायिक स्वरूपाची होती. त्यामुळें शिकारीवर सामाजिक सत्ता प्रस्थापित होत होती. त्यामुळें बाल्यावस्थेंतला समाजसत्तावाद अंमलांत आला. पुढें गुलामगिरी युगांत व सरंजामी युगांत अनुक्रमे धनी व सरंजामदार यांची उत्पादनाचें प्रमुख साधन जी जमीन तिजवर सत्ता होती ह्मणून हा वर्ग सत्ताधीश बनला होता. सरंजामी व गुलामगिरी युगांत उत्पादन वैयक्तिक अगर फार फार तर कौटुंबिक स्वरूपाचें असे. त्यामुळें उत्पादन–साधनें व उत्पादित माल यांचेवर व्यक्तिगत अगर कौटुंबिक मालकी असणें साहजिक व अकृत्रिम होतें. त्याचप्रमाणें लहान लहान कुटुंबांतील माणसांनीं चालविलेल्या हातमागासारख्या धंद्यावर व त्यांत निर्माण झालेल्या मालावर कुटुंबाची अगर

कुटुंबातील मुख्याची मालकी असणें निसर्गनियमास धरूनच आहे. किंबहुना गुलामगिरी व सरंजामी या दोन युगांत खासगी मालमत्तेची संस्था हीच समाजाचा पाया असून तींतूनच सामाजिक उत्पादन व विकास हीं घडून आलीं आहेत. पण पुढें औद्योगिक क्रांति होऊन ज्यावेळीं उत्पादनाचें स्वरूप सामुदायिक झाले, त्यावेळीं खासगी मालमत्तेच्या संस्थेला कृत्रिम स्वरूप येत चाललें. क्रांतीनंतर मोठमोठे कारखाने गिरण्या या कुटुंबावर चालणें अशक्य होऊन शेंकडोगणती कामगारांची जरूरी भासूं लागली. अर्थात् उत्पादनाला सामुदायिक अगर सामाजिक स्वरूप प्राप्त झाले. परंतु उत्पादन सामाजिक व उत्पादित मालावर हक्क मूठभर गिरणीमालकांचा ही कृत्रिम स्थिति निर्माण झाली. वैयक्तिक नफेबाजीला महत्व आले. कारखानदार व भांडवलदार यांच्यांत परस्पर स्पर्धा सुरू झाली. बहुजन समाज बेकार होत चालला. माल तुंबून राहूं लागला. मोठे धंदे लहान धंद्यांना गिळूं लागले. मोठे कारखानदार लहान कारखानदारांना पचवूं लागले. या आरिष्टांना कारण खासगी मालमत्ता, तिच्या संरक्षणार्थ केलेले कायदे, त्या संस्थेस अनुसरून प्रचलित असलेल्या चालीरीति, नीति–कल्पना व अन्य संस्था हीं होत. या कृत्रिम वस्तुस्थितीचा ज्यावेळीं अतिरेक होतो त्यावेळीं दलित वर्ग संघटित बनत जातो, व खासगी मालमत्तेच्या कल्पनेवर उभारलेली समाजपद्धति नष्ट करण्याच्या मार्गास लागतो. सामाजिक उत्पादनाबरोबर उत्पादन साधनें व उत्पादित माल यांवर सामाजिक मालकी असली पाहिजे. तदनुरूप शासनसंस्था निर्माण झाल्या पाहिजेत. सामाजिक उत्पादनावर कोणताही वैयक्तिक हक्क असतां कामा नये. समाजांतील सर्व श्रमजीवि घटकांचें हितसंरक्षण होईल अशाच रीतीनें शासनसंस्थेची रचना असली पाहिजे. मजूर–वर्ग संघटित होऊन अशा तऱ्हेच्या मागण्या करूं लागतो. अखेर भांडवलदार व मजूर यांच्या वर्ग–युद्धाचें पर्यवसान क्रांतींत होऊन कामगारवर्ग विजयी होणार. हीं परिस्थिती ऐतिहासिक भौतिक नियमानुसार प्राप्त होणारी आहे. या विजयाचे बीज मजूरांच्या

संघटनेंत आहे, व भांडवलशाही युगांत कामगार संघटना ही निसर्गसिद्ध आहे. सारांश अखेर समाजसत्तेची जी प्रस्थापना होणारी आहे ती मानवांतील सद्गुण अगर उदात्त भावना यायोगें होणारी नसून निसर्गाच्या नियमानुसार होणारी आहे. ती आपोआप होणारी आहे ह्मणून तटस्थ न राहतां ती तावडतोब घडवून आणण्याबद्दल मानवांनी अटोकाट प्रयत्न केले पाहिजेत. या आधिभौतिक नियमांना मानवी इच्छाशक्ती व ज्ञानशक्ती यांनी चालना दिल्याशिवाय समाजाची कार्य-प्रगति होणार नाही असें मार्क्सचें ठासून सांगणें आहे. हेंही येथें विसरता कामा नये.

आतापर्यंत केलेल्या इतिहासाच्या आधिभौतिक मीमांसेतील निष्कर्ष हा कीं, ( १ ) समाजाचा मूलभूत पाया आर्थिक आहे. ( २ ) वर्गविरोधांतून समाजाचा विकास होतो. परंतु विकासाच्यापूर्वी समाजाला क्रांतीचा टप्पा गांठावा लागतो.( ३ ) उत्पादनाची साधनें ज्याच्या हातांत, तोच वर्ग क्रांतीमध्यें विजय संपादन करतो. ( ४ ) सांप्रत समाजाचा विकास होता होता अशी वस्तुस्थिति येऊन ठेपली आहे कीं कामगारवर्ग हा क्रांतींत यश संपादन करून विग्रह-विहीन समाज प्रस्थापित करणार.

समाजाच्या विकासास अर्थव्यतिरिक्त कोणतीही कारणें नाहींत असा अर्थ ऐतिहासिक जडवादाच्या सिद्धांतात ध्वनित होतो, असा कांहीं जणांनीं विपर्यास केला आहे. याबद्दल एंजल्स ह्मणतोः-" आर्थिक परिस्थिति ही ऐतिहासिक घटना व सामाजिक विकास यांचा पाया असला तरी आर्थिक परिस्थितींतून निर्माण झालेली कला, विज्ञान, धार्मिक मतें, तत्वज्ञानात्मक विचार, ज्ञानलालसा, कायदा, शासनसंस्था हीं देखील ऐतिहासिक घटना व सामाजिक विकास घडवून आणण्याच्या कामीं आपापल्यापरी कार्य करीत असतात हे मार्क्स यानें कधींही नाकबूल केलें नाहीं.

## ८. अतिरिक्त मूल्य.

कोणत्याही पदार्थाचे मूल्य कसें बनतें यासंबंधीं अर्थशास्त्रामध्यें दोन मोठे सांप्रदाय पडलेले दिसून येतात. एक उपयुक्ततावाद्यांचा व दुसरा श्रमवाद्यांचा! ज्या प्रमाणांत वस्तूंची गरज अगर उपयोग असतो त्या प्रमाणानें वस्तूचें मूल्य बनतें असे उपयुक्ततावाद्यांचे ह्मणणं आहे. यावर श्रमवाद्यांचे असें ह्मणणें आहे कीं, हवा व पाणी हीं मानवी प्राण्याला अत्यंत अवश्यक अशीं आहेत. पण त्यांना खेडेगावांत तर मूल्यच नाहीं व शहरांतही फारच थोडें मूल्य पडतें. तसेंच हिरे, माणकें, सोने यांचा उपयोग लोखंडापेक्षा किती तरी पटीनें कमी असून त्यांना लोखंडापेक्षां किती तरी पटीनें किंमत जास्त पडते. याला उपयुक्ततावादी अशी पुस्ती जोडतात कीं कोणताही पदार्थ केवळ उपयुक्त असला ह्मणजे त्यावर मूल्य ठरत नाहीं, तर तो पदार्थ उपयुक्त असून कितपत सुलभ अगर दुर्मिळ आहे यांवर कम-जास्त मूल्य बनत जातें. उदाहरणार्थ लोखंड हें पुष्कळ उपयुक्त असले तरी सुलभ आहे. पण सोनें हें कमी उपयुक्त असलें तरी दुर्मिळ आहे. याला श्रमवाद्यांचें उत्तर असें आहे कीं कोणतीही वस्तू सुलभ अथवा दुर्लभ कर-ण्यास मानवी श्रम हेच कारणीभूत असतात, तेव्हा वस्तूंचे मूल्य ठरविण्याला ती वस्तू उत्पन्न होण्यास व तिची नेआण करण्यास जे श्रम लागतात ते श्रमच खरे कारण होत. उदाहरणार्थ, हवापाणी उत्पन्न करण्यास मनुष्यांना कांहींच श्रम पडत नाहींत ह्मणून त्याना कांहींच किंमत नसते. उलट सोनें

संपादन करण्यास लोखंडापेक्षा पुष्कळ मेहनत पडते, ह्मणून सोन्याची किंमत जास्त असते. कार्ल मार्क्स हा या श्रमसिद्धांताचा पुरस्कर्ता असून या सिद्धांतावरच त्यानें आपल्या सुप्रसिद्ध 'अतिरिक्त मूल्या'चें विवेचन केलें आहे.

मार्क्सच्या पूर्वीच्या दीडशें वर्षांच्या कालावधींत वुइल्यम, पेटी, बॉइसकिल्बर्ट, रिकार्डो, सिसमंडी आदिकरून इंग्लिश व फ्रेंच अर्थशास्त्रज्ञांच्या लिखाणांतून हा श्रमसिद्धांत अनुक्रमानें विकसित झालेला आढळून येतो. या सिद्धांतांचेंच पुढें मार्क्सनें साद्यंत विवेचन केलें आहे. त्याची संक्षिप्त रूपरेषा अशी:—विक्रीच्या सर्व पदार्थांत एक सामान्य 'वस्तू' आढळून येते किंवा एका सामान्य 'वस्तू'मुळेंच सर्व पदार्थ निर्माण झालेले असतात व ती ह्मणजे सामाजिक श्रम ही होय. किंबहुना हे पदार्थ सामाजिक श्रमाचें दृश्य स्वरूपच असल्यामुळें त्याला किंमत असते. पदार्थांची लहान, मोठी किंवा सापेक्ष किंमत ही त्या सामाजिक श्रमाच्या कमजास्त प्रमाणावर अवलंबून असते ह्मणजेच श्रमशक्तीवरच पदार्थांचें मूल्य अवलंबून असते.

मार्क्स पुढें ह्मणतो कीं, अमुक एक पदार्थ निर्माण होत असतांना लागणाऱ्या श्रमाचाच केवळ विचार करून भागावयाचें नाहीं. तर कच्चा माल तयार होत असतां पदार्थ निर्माण करण्यास जरूर असलेलीं हत्यारें बनवितांना, यंत्रसामुग्री घडवितांना, फॅक्टरीची इमारत उठवितांना वगैरे वेळोवेळीं पडणारे श्रम हेही ध्यानांत घेतले पाहिजेत. उदाहरणार्थ, एखाद्या सुताच्या गुंडाळ्याच्या मूल्याचा अंदाज बांधावयाचा असल्यास कापसाचें सूत बनवितांना, कापूस निपजवितांना, यंत्रसामुग्री निर्माण करतांना, फॅक्टरीची इमारत बांधतांना, यंत्र चालू करण्यासाठीं दगडी कोळसा, तेल इत्यादि अन्य अवश्यक जिन्नस संपादन करतांना वगैरे वेळोवेळीं घडलेल्या श्रमांच्या गोळाबेरीजेचा विचार करणें अवश्य आहे.

यावरून कोणालाही असें वाटणें साहजिक आहे कीं, कोणत्याही आळशी अगर सुस्त कारागीरास कोणताही पदार्थ निर्माण करण्यास

कुशल कारागिरापेक्षा जास्त वेळ लागतो ह्मणून कुशल कारागिरानें बनविलेल्या पदार्थापेक्षां सुस्त कारागीरानें तयार केलेल्या त्याच पदार्थाचें मूल्य जास्त ठरेल. पण तें बरोबर नाहीं. मार्क्सचें ह्मणणें असें आहे कीं, श्रमाच्या मूल्याचा विचार करतांना सामान्य माणसाची कुशलता, देशकालपरिस्थिति, प्रचलित उत्पादनाची साधनें इत्यादि गोष्टी ध्यानांत धरल्या पाहिजेत. ह्याच सिद्धांत मार्क्स खालीलप्रमाणें विशद करतो:–

' In saying that the value of a commodity is determined by the quantity of labour worked up or crystalized in it, we mean the guantity of labour necessary for its production in a given state of society, under certain social average conditions of production, with a given social average intensity and average skill of the labour employed. '

यांतील मथितार्थ हा कीं:–कोणत्याही पदार्थाचे मूल्य ठरवितांना ज्या पदार्थाकरितां श्रम करावयाचे तो पदार्थ समाजाला अवश्यक आहे काय , समाजाची औद्योगिक परिस्थिति कशी आहे, समाजांत कोणती उत्पादनाची साधनें प्रचलित आहेत, समाजांतील सामान्य कारागीराची कुशलता कशी आहे, वस्तु निर्माण करण्याची सामान्य पद्धत कशी आहे इत्यादि गोष्टींचा विचार होणें अवश्य आहे. अशी कल्पना करा कीं, यंत्रसामुग्रीच्या बळावर कापडाच्या उत्पादनाला जो आतां वेळ लागतो त्याच्यापेक्षां चौपट वेळ चरखा हातमागावर तितकेंच कापड बनविण्यास लागतो. ह्मणून एकाद्या विणकऱ्यानें एकवार कापड चरखा व हातमागावर मिळून पांच तासांत विणलें तर त्या वार कापडाचें आजचें मूल्य यंत्रपूर्वकालीन चरखा हातमागावर तितक्याच तासांत विणलेल्या तितक्याच कापडाच्या मूल्याच्या $\frac{1}{4}$ भरेल, कारण त्यावेळीं चरखा व हातमागावर सूत कातण्याच्या व विणण्याच्या यंत्राबरोबर स्पर्धा करावी लागत नव्हती. असो, तात्पर्य कोणत्याही वस्तूचें मूल्य तोलतांना ती उत्पादन करण्यास देशकालपरिस्थितीच्या मानानें ह्मणजे ' सामाजिक दृष्ट्या अवश्य

श्रम ' (socially necessary labour) किती पडतात हें पाहिलें ह्मणजे त्या श्रमाच्या मानावरून त्या वस्तूचें मूल्य काढतां येते.

## मूल्य आणि किंमत

येथें मूल्य, किंमत आणि बाजारी किंमत यांतील फरक स्पष्टपणें ध्यानांत घेणें जरूर आहे. मूल्य जेव्हां पैशाच्या रूपानें गणिलें जातें तेव्हां त्याला ' किंमत ' हें नांव आहे.किंमत ही जेव्हां निव्वळ मूल्याची निदर्शक असते तेव्हां तिला स्वाभाविक किंमत ( natural price ) असें ह्मणण्याचा प्रघात आहे. मूल्याप्रमाणेच स्वाभाविक किंमतही स्थिर असते, परंतु बाजारी किंमत ही नेहमीं बदलत असते. मागणी–पुरवठ्याच्या चलविचल-तेप्रमाणें बाजारी किंमत ही स्वाभाविक किंमतीच्या कधीं कधीं वर चढत असते तर कधीं कधीं ती खालीं उतरत असते.स्वाभाविक किंमतीला अॅडम स्मिथ हा ' मध्यवर्ति किंमत ' असें संबोधित असून वस्तूंच्या बाजारी किंमती ह्या मध्यवर्ति स्वाभाविक किंमतीकडे नेहमीं ओढ घेत असतात असें तो ह्मणतो.

ज्यावेळीं मागणी पुरवठ्यांचे प्रमाण सम असते त्यावेळीं स्वाभाविक किंमत व बाजार किंमत हीं एकरूप होतात. सांप्रतच्या विषम समाजरचनेंत समाजाचे आर्थिक व्यवहार असंघटित असल्यामुळें कांहीं वस्तूंचे वाजवीपेक्षां फाजील उत्पादन तर कांहीं वस्तूंचे जरूरीपेक्षां कमी उत्पादन होत असते. याचा परिणाम असा होतो कीं, समुद्राच्या लाटाप्रमाणें वस्तूंच्या किंमती वर–खालीं होत असतात, ह्मणजे कोणत्याही पदार्थाची समाजाच्या गरजे-पेक्षां फाजील निर्मिति झाली कीं, त्याची बाजार किंमत त्या पदार्थाच्या स्वाभाविक किंमतीच्या खाली येते; त्याच पदार्थाचे उत्पादन समाजाच्या मागणीपेक्षां कमी होऊं लागलें ह्मणजे त्याची बाजार किंमत त्याच्या स्वाभाविक किंमतीच्या वर जाऊं लागते. तथापि समुद्राच्या लाटा जशा सर्वसामान्यपणें समुद्राच्या पृष्ठभागासच चिकटून असतात तशा वस्तूंच्या बाजारी किंमती सरसकट त्यांच्या मूल्याच्या नजीकच ह्मणजे त्या वस्तूंच्या स्वाभाविक किंमतीच्या आजूबाजूसच असतात.

## श्रमशक्ति व अतिरिक्त मूल्य.

श्रमशक्ति ह्मणजे मजूराची काम करण्याची शक्ति. प्रत्येक वस्तूप्रमाणें श्रमशक्तीलाही मूल्य असते आणि ते मूल्य श्रमाच्या प्रमाणानेंच बसविलें जातें. त्याचप्रमाणें श्रमशक्तीचा क्रयविक्रयही होत असतो. मजूराला आपल्या जीवनाच्या संरक्षणार्थ कांहीं वस्तूंची जरूरी असते. एकाद्या यंत्राप्रमाणें कालांतरानें तो निरुपयोगी होऊन जातो. ह्मणून त्याच्या ठिकाणीं दुसऱ्या मजूराची योजना करणें भाग पडतें. केवळ आपल्याच जीवनाची तरतूद करून त्याला भागत नाहीं, तर त्याला स्वतःच्या मुलाबाळांचे संगोपन करून त्यांना कार्यक्षम करावयाचें असतें; ह्मणून जीवनासाठीं आणखी कांहीं वस्तूंची गरज त्याला लागत असतेच. याप्रमाणें त्याच्या गरजा भागू लागल्या ह्मणजे त्याच्या जागीं त्याची मुलें येऊ शकतात. त्याचा वंशही टिकूं शकतो. त्याचप्रमाणें मजूराला आपली कार्यशक्ति व कार्यकुशलता हीं वाढविण्याकरता कांहीं खर्चही येतो. मजूराच्या श्रमशक्तीचें मूल्य त्याच्या स्वतःच्या श्रमशक्तीचें उत्पादन, वाढ व संरक्षण करण्याकरतां व त्याच्या वंशाच्या अभिवृद्धीसाठीं ज्या वस्तूंची गरज त्याला लागते त्या वस्तूंच्या मूल्यावरून निश्चित होतें. हेंच कार्ल मार्क्सच्या शद्बांत सांगावयाचें ह्मणजेः—'The value of labouring power is determined by the value of necessaries required to prodece, develop, maintain and perpetuate the labouring power'

मजूराकडून घेतलेल्या श्रमाबद्दल त्याला संपूर्ण मूल्य न देतां त्यांतील मूल्याचा जो अंश मालक अपहरण करतो त्याला अतिरिक्त मूल्य असें ह्मणतात. आतां अशी कल्पना करा कीं एकाद्या मजुराला रोजच्या सरासरी वस्तू संपादन करण्यास दररोज सामान्यपणें सहा तास राबावे लागते. त्यांच्या दररोजच्या सहा तासाच्या श्रमाची किंमत १ रुपया भरते, असें आपण गृहीत धरूं. मजूर रोजचें वेतन घेऊन भांडवलदाराला आपले श्रम विकत असतो. भांडवलदार त्या मजूराकडून दररोज केवळ सहा तास राबवून घेऊन दिवशीं

त्याला एक रुपया देईल तर अतिरिक्त मूल्य भांडवलदाराला मिळणार नाहीं, व मजूराला त्याच्या श्रमाचा योग्य मोबदला दिला असें होईल.

परंतु रोजची मजूरी देऊन भांडवलदार मालकानें मजूराच्या श्रमशक्तीवर पूर्ण ताबा मिळविलेला असतो. याचा परिणाम असा होतो कीं मजूराला केवळ सहा तासाचें वेतन देऊन भांडवलदार त्याच्याकडून बारा तासाचें काम चोपून घेतो. वर दिलेल्या दराप्रमाणें दिवशीं बारा तास श्रम केल्याची किंमत २ रु. भरते. पण मजूराला भांडवलदार त्याला वर वर्णिलेल्या अवश्य वस्तू घेण्याकरितां जरूर लागणारें मूल्य एक रुपया किंमतीचें देतो व बाकीचा एक रुपाया तो आपल्या खिशांत घालतो. हा एक रुपया ह्मणजेच अतिरिक्त मूल्याची किंमत होय.

## नफा

कोणतीही वस्तू जेव्हां तिच्या मूल्याला विकली जाते, तेव्हां त्या विक्रयांत नफ्याचा अंतर्भाव होतो. उदाहरणार्थ कापडाच्या गिरणींतील एक मजूर गिरणींत बारा तास काम करून चार वार कापड विणतो.त्या चार वार कापडाचें वरील दराप्रमाणें मूल्य दोन रुपये किंमतीचें होतें. त्यांतील एक रुपया गिरणी मालक मजूराला देतो आणि उरलेला एक रुपया स्वतः घेतो. हा एक रुपया ह्मणजेच कापड विकून झालेला नफा होय. नफ्यांतील कांहीं भाग भाड्याच्या रूपानें इमारतीच्या मालकाला जातो. व गिरणी मालकानें सावकाराकडून भांडवल कर्जाऊ आणले असेल तर त्या नफ्यांतील आणखी कांहीं भाग व्याजरूपानें सावकाराकडे जातो. यानंतर जो कांहीं नफ्याचा अंश राहतो तो औद्योगिक अगर व्यापारी नफा या नात्यानें मालकाकडे रहातो. पण व्याज असो, भाडें असो अगर औद्योगिक नफा असो हीं सर्व वस्तूंच्या अतिरिक्त मूल्याच्याच तीन भागाला दिलेली तीन निरनिराळी नांवें होत. कारण हीं प्राप्त करून घेण्यास कोणतेच श्रम पडत नसतात. सुखासीन राहून इमलेदार ( Landlord ), सावकार ( moneylender ) आणि गिरणी मालक या त्रिवर्गांना ती मिळत असतात. मजूराच्या दृष्टीनें

हे तिथेही सारखेच ! त्याच्या श्रमाचे अतिरिक्त तिथेही गिळंकृत करीत असतात. अन्य वस्तूंत आढळून न येणारा श्रमशक्तीच्या मूल्याविषयीचा आणखी एक विशेष मार्क्सनें दाखवून दिला आहे तो असा:—

श्रमशक्तीला दोन प्रकारची मूल्यें असतात. एक शारीरिक व दुसरें सामाजिक ( physicil and social ). शारीरिक गरजांनींच मजूराचे भागत नाहीं. त्याला सामाजिक गरजाही असतात. या गरजा भागविण्याकरिता ज्या वस्तु त्याला हव्या असतात त्या वस्तूंचें मूल्य ह्मणजेच सामाजिक मूल्य. पूर्वपरंपरेनें निर्माण केलेल्या राहणीच्या दर्जाप्रमाणें समाजांत मजूराला आपले जीवन कंठावयाचे असतें. या गरजा तो ज्या सामाजिक परिस्थितींत जन्मास येतो व वाढतो त्या परिस्थितीस सापेक्ष अशाच असतात, या सामाजिक गरजा विविध देशांत विविध प्रकारच्या असून निरनिराळ्या युगांत निरनिराळ्या तऱ्हेच्या असतात. या सामाजिक गरजा वाढविता येतात, कमी करता येतात किंवा अजिबात नष्टही करता येतात. या सामाजिक गरजांच्या विविध स्वरूपामुळें श्रमशक्तीचें मूल्य हें कधींच स्थिर राहात नसून देशकालपरिस्थितीच्या मानानें बदलत असतें.

नफ्याचें किमान प्रमाण ठरविण्यास अमूक एक ठराविक कायदा आहे असें नाहीं. मजूरीची किमान मर्यादा व मजूरांच्या दररोजच्या शारीरिक श्रमाची कमाल मर्यादा हीं मात्र नफ्याची कमाल मर्यादा निश्चित करूं शकतात. ह्मणजे मजूरांकडून दिवशीं शक्य तो जास्तीत जास्त काम चोपून घेऊन त्यांना शक्य तो कमींतकमी वेतन देऊन नफ्याचें प्रमाण कोणत्या कमाल मर्यादेपर्यंत नेता येते याचा अंदाज लागतो. याप्रमाणें नफ्याच्या दरांत अमर्याद बदल संभवनीय असतो. नफ्याचा नक्की दर भांडवलदार व मजूर यांच्यामध्यें सतत चालू असलेल्या झगड्यानें मात्र निश्चित होत असतो ! भांडवलदार मजूरांचे वेतन शक्य तों कमी करून दिवशीं त्यांचे कामाचे तास शक्य तों वाढविण्यासाठीं धडपडत असतात. तर हेंच पारडें उलटे करण्यासाठीं मजूर हे भांडवलदारावर सतत

दाब आणीत असतात. ज्यांच्याकडे ज्या प्रमाणांत दम जास्त त्यांच्याकडेस त्याच प्रमाणांत हें दराचें पारडें झुकत असतें.

## मागणी व पुरवठा.

वेतन निश्चित करण्याच्या कामीं मागणीपुरवठ्याच्या कायद्याचाही उपयोग होत असतोच. जितक्या प्रमाणांत मजूरांची मागणी जास्त तितक्या प्रमाणांत त्यांच्या मजूरीचा दर वाढत असतो. पण भांडवलशाहींत उद्योग-धंद्याची जसजशी प्रगति होत जाते तसतशी मजूरांची जरूरी कमी भासत जाते. कारण, भांडवलदारांना सतत नफा मिळत असल्याकारणानें त्यांचें भांडवल दिवसेंदिवस वाढत जातें. साहजिकच भांडवलवाल्यांची आशाही बळावत जाते. म्हणून भांडवलाच्या सहाय्यानें उत्कृष्ट यंत्रसामुग्री पैदा करून उत्पादनाच्या कामीं दिवसेंदिवस मजूरांची संख्या कमी कमी लागत जाईल अशी तो योजना करीत असतो. यायोगें अर्थातच कामगारवर्गातील बेकारी दिवसेंदिवस वाढत जाते. कामकऱ्यांना तर गिरणींत काम करण्याशिवाय उदरनिर्वाहाचा दुसरा मार्ग शिल्लक राहिलेला नसतो. सरंजामी युगांत चरखा, हातमागासारखी सुलभ व स्वस्त उत्पादनाची साधनें पैदा करून स्वतंत्ररीत्या उपजीविका करणें मजूरांना सोपे जात असे. सांप्रत भारी किंमतीची यंत्र-सामुग्री पैदा करणें मजूरांना अशक्य असते. ग्रामोद्योगाचा अवलंब करावा तर बाष्पशक्तीपुढें हस्तशक्तीचा टिकाव लागत नाहीं. म्हणून उदरनिर्वाहार्थ यंत्राच्या मालकावर अवलंबून राहण्याशिवाय मजूरांना गत्यंतर नसते. याप्रमाणें कामगारांत बेकारी वाढल्यामुळें त्यांच्यात परस्पर स्पर्धा सुरू होते. कमींतकमी वेतन घेऊन जास्तींत जास्त काम करण्यास त्यांना कबूल होणें भाग पडते. भांडवलदार मजूरांच्या या असहाय्य परिस्थितीचा भरपूर फायदा घेतो. उलट भांडवलदारांच्या नफेबाजीला सारखा ऊत येत असल्यामुळें त्यांच्यांत परस्पर चढाओढ सुरू होते. मग शक्य तों यंत्राची शक्ती वाढवून मजूरांची संख्या कमी करण्याची तजवीज भांडवलदार करूं लागतात. कारण आपला माल बाजारपेठेंत अधिकाधिक स्वस्त विकतां यावा म्हणून

भांडवलदारांची सारखी धडपड चालूं असते. या सर्व गोष्टींचा असा परिणाम होतो कीं मजूरांची बेकारी व निकृष्टावस्था यांची परिसीमा होते. मग वर्गकलहाला तीव्र स्वरूप प्राप्त होऊं लागतें. मजूरवर्ग संघटित होऊन भांडवलदारांच्या हातांतलि सत्ता हिसकावून घेऊन सामाजिक सत्ता प्रस्थापित करतो.

अशी निकृष्टावस्था प्राप्त झाली असतां मजूर वर्गानें भांडवलशाहीच्या आतिक्रमणाचा प्रतिकार न करतां स्वस्थ बसावें असें कांहींजण ह्मणतील. मार्क्स ह्मणतो हें अशक्य आहे. कारण मजूर–वर्ग जर मूग गिळून स्वस्थ बसला तर त्याचा दिवसेंदिवस अधःपात होत जाऊन तो इतक्या नादान स्थितीप्रत प्राप्त होईल कीं, त्याची त्या स्थितींतून सुटका होणेंच अशक्य होऊन कोणतीही मोठ्या प्रमाणावरची चळवळ उठविण्याच्या कामीं तो नालायख ठरेल. मार्क्सचें पुढें ह्मणणें असें आहे कीं, मजूरांनीं आपल्या चळवळी चालू ठेवीत असता हें ध्यानांत धरलें पाहिजे कीं, केवळ वर वर उपचार करून भांडवलशाहीची व्याधि नाश पावणार नाहीं तर तिचें मूळच नाहींसें करून टाकण्याकरितां जालीम द्व्याची योजना करणें अवश्य आहे. भांडवलशाहीचा वृक्ष त्याच्या फांद्या तोडल्या ह्मणून मरणार नाहीं तर त्याच्या मूळावर घाव घातला पाहिजे. ह्मणजे केवळ मामुली प्रतिकाराच्या चळवळींतच गुंतून न राहतां मजूरांना क्रांतिकारक उपायांचा अवलंब करणें भाग आहे, असें मार्क्स ह्मणतो. त्यांनीं कामास योग्य वेतन या पुरातन तत्त्वाचा नाद सोडून देऊन वेतन पद्धतीची हकालपट्टी या क्रांतिकारक गर्जनेचा पुरस्कार केला पाहिजे.

'Instead of the conservative motto 'A fair day's wages for a fair day's work' they ought to inscribe on their banner the revolutionary watchword 'Abolition of the wages system' अखेर आपल्या मूल्य सिद्धांतापासून मार्क्सनें असा निष्कर्ष काढला आहे कीं, ज्या पद्धतीच्या योगानें अतिरिक्त मूल्य निर्माण

होते ती पद्धतच नाहींशी केली पाहिजे. याचाच अर्थ उत्पादन साधनाव-वरील खाजगी मालकी नष्ट झाली पाहिजे.

या सिद्धांताविरुद्ध कांहींची तक्रार अशी आहे की, अतिरिक्त मूल्याचा विचार करतांना मार्क्स हा उद्योगधंदे उठविण्याच्या कामीं लागणाऱ्या भांडवलदारांचे साहस, धाडस, कर्तृत्वशक्ति, व्यवहारकुशलता इत्यादि सद्गुणांच्या मूल्याचा विचार करीत नाहीं. याला मार्क्सवाद्यांचें उत्तर असें आहे कीं, भांडवलशाहीनें या सद्गुणांच्या बलावर अपूर्व कामगिरी करून औद्योगिक क्रांति घडवून आणिली या गोष्टींचें गोडवे मार्क्सनें जाहीरनाम्यांत उघड रीतीनें गायिले आहेत. पण याउपर मात्र भांडवलशाही समाजरचना निरुपयोगी झाली आहे. इतकेंच नाहीं तर याच सद्गुणांच्या जोरावर ती कामगार वर्गांना पिळून काढून दिवसेंदिवस जगांत बेकारीचा कळस करीत आहे. म्हणून ती समाजाच्या प्रगतीच्या मार्गांतली एक मोठी धोंड होऊन बसली आहे. शिवाय भांडवलदारांनीं चालविलेले धंदे सहकारी तत्त्वावर ( Co-operative basis ) सामाजिक मालकीनें चालविल्यास साहस, व्यवहारदक्षता इत्यादि सद्गुणांना संघटित सामाजिक स्वरूप प्राप्त होऊन त्यांचे फारसें महत्त्व राहत नाहीं. उद्योगधंद्याची उठावणी करून त्यांवर देखरेख करण्यास जें मूल्य पडतें तें मजूरांना सहाच्याऐवजीं फार तर सात तास काम करण्यास लावून उगवितां येईल. त्याकरितां भांडवलदारांची उत्पादन साधनावरील सत्ता कायम ठेवून त्यांना अतिरिक्त मूल्य गिळंकृत करूं देण्याचें कांहीं कारण नाहीं.

एंजल्सनें असें म्हटलें आहे कीं, ऐतिहासिक जडवाद व अतिरिक्त मूल्य या दोन मार्क्सप्रणीत सिद्धांतावर अर्वाचीन विज्ञानशुद्ध साम्यवादाची ( Scientific socialism ) उभारणी केली आहे.

## ९. भारतीय समाजाची उत्क्रांति.

भारतवर्षांतील पुराणमतवाद्यांना असें वाटतें कीं भारतीय समाज व त्याची संस्कृति हीं उच्च दर्जाचीं, ईश्वरदत्त, अखिल जगताला ताप-त्रयांतून उद्धारणारीं अशीं आहेत ! ह्मणून भारतीय समाजाला पाश्चात्य समाजविकासाचे नियम लागूं करणें शुद्ध वेडेपणाचें आहे. ही सनातन पद्धतीची विचारसरणी कितपत सत्यास धरून आहे ? आपली प्राचीन संस्कृति व मार्क्सवाद यांचा कसा मेळ जमतो ?

हिंदुस्थान देश हा या भूगोलावरील अनेक देशांपैकीं एक देश असून इतर देशाला जे निसर्गाचे नियम लागू होतात, तेच नियम भारत-वर्षाला लागू झालेच पाहिजेत. ज्याअर्थीं पाश्चात्यांनीं संशोधन केलेल्या पदार्थविज्ञान शास्त्राच्या नियमांचा अवलंब केल्यानें येथेंही तेथल्याप्रमाणेंच आगगाडी तारायंत्र वीज इत्यादी चालू करता येतात, ज्या अर्थीं पाश्चात्य वैद्यकशास्त्र व तंत्र यांचा भरपूर उपयोग येथील रोगी बरे करण्याकरतां करता येतो, ज्याअर्थीं पंचमहाभूतांचे गुणधर्म हे युरोपांत निराळे व भारत-वर्षांत निराळे अशी वस्तुस्थिति नाहीं, ज्याअर्थीं येथील माणसांची शारी-रिक मानसिक व बौद्धिक घडण सामान्यपणें पाश्चात्यांच्याप्रमाणेंच आहे, त्याअर्थीं पाश्चात्यांनीं शोधून काढलेले समाजशास्त्राचे नियम येथील समा-जास कां लागू पडणार नाहींत?

भारतीय समाजानें इतिहासाच्या आरंभकाळीं इजिप्तच्या समाजा-बरोबर मानवी संस्कृतीचा पाया घातला हें खरें आहे. म्हणून पुढें ग्रीक, रोमन, अरब, अर्वाचीन यूरोपियन यांनीं तीच संस्कृति पुढें ढकलून तिचा आज दिसणारा विकास घडवून आणला असतां त्याकडे पूर्ण दुर्लक्ष करून मानवी समाजाचे बाल्यावस्थेतले आचारविचार सांप्रतचे गहन असे सामा-जिक व आर्थिक प्रश्न सोडविण्यास समर्थ आहेत, असें विधान करणें हास्यास्पद आहे. उलट असाही युक्तिवाद लढवितां येईल कीं जो समाज ग्रीक, शक, यवन, पार्थियन, हूण, यूचि, मुसलमान, यूरोपियन आदिकरून समाजाकडून एकसारखें तडाखे खात असतां अद्याप आपलें डोकें वर काढूं शकत नाहीं, तो समाज अगर त्याची संस्कृति जगाचा उद्धार तरी काय करणार? यावरून असें कोणीं समजू नये कीं, भारतीय समाज हा जगांतील इतर समाजापेक्षां कमी प्रतीचा आहे. कोणताही समाज भौतिक परिस्थितीचा बंदा असतो. ज्या भौतिक परिस्थितीमुळें भारतवर्षाला सांप्र-तची निकृष्ट परिस्थिति प्राप्त झाली आहे तीच भौतिक परिस्थिति अखेर भारतीय समाजाचा उद्धार करणार! कोणत्याही समाजाची संस्कृति ही त्याच्या भौतिक परिस्थितीवर अवलंबून असते. समाजाच्या भौतिक परिस्थि-तीबरोबर त्याची संस्कृतीही बदलत असते. स्थिर संस्कृति अशी कोणतीच नाहीं. सांप्रतची आपली संस्कृति कोणी शहाणा मनुष्य स्पृहणीय आहे असें मानणार नाहीं. प्राचीन भारतीय संस्कृतीविषयी म्हणावें तर तिच्यांतील जे कोणते उदात्त विचार बुद्धिवादास व भौतिक विज्ञानशास्त्रांच्या नियमास धरून असतील ते आपोआप टिकून राहतीलच!

## भारतीय समाजाची भौतिक मीमांसा.

मानवी समाजाला विरोध–विकासवाद लावून मार्क्सनें असा प्रमुख सिद्धांत काढला आहे कीं, मानवी समाजाचा इतिहास हा वर्गकलहांचा इतिहास असून धनी–गुलाम, जमीनदार–कुळें, भांडवलदार–मजूर अशा परस्पर–विरोधी वर्गांत कधीं गुप्तपणे तर कधीं उघडपणें सतत कलह चालू

असलेले दिसून येत आहेत. या वर्गकलहांतूनच विविध समाज रचना अस्तित्वांत येतां येतां समाजाचा विकास होत चालला आहे. आपल्या देशांतील पुष्कळ पुढाऱ्यांना असें वाटतें कीं, हें वर्गकलह ह्मणजे थोतांड आहे, वर्गकलह आपल्या समाजांत कधीं नव्हता व अद्यापिही नाहीं, वर्गकलहाचें हें पार्सल समाजवादी रशियांतून आणून नसती गुंतागुंत करीत आहेत ! आपला भारतीय समाज हा वर्गसलोख्यांच्या प्रेमाच्या तत्त्वावर अधिष्ठित झाला असून समाजांतील विविध वर्ग प्राचीन कालापासून सुखासमाधानानें नांदत आले असतां मुसलमान व त्यांच्यानंतर ब्रिटिश यांच्या परचक्रामुळें आपल्या देशांत सर्वत्र हाहाकार उडून येत असलेला दिसून येत आहे. ते परचक्र घालवून दिल्याबरोबर आपला समाज पूर्ववत सुखी होईल.

## आर्यअनार्यांचा झगडा व वर्णाश्रम.

आर्य ज्यावेळीं हिंदुस्थानांत आले त्यावेळीं त्यांनीं अर्थोत्पादनाचें तत्कालीन प्रमुख साधन जी जमीन त्यासाठी अनार्यांशीं युद्ध केले,ते येथे आले त्यावेळीं त्याच्यांत मृगया युगांतील समाजसत्ता अस्तित्वांत होती. त्यांच्यांत वर्णाश्रम व्यवस्था नव्हती हे खालील पुराणांतरीं कृतयुगासंबंधीच्या वर्णनावरून स्पष्ट होतेः—

ब्राह्मणाः पूर्वसृष्टा हि कर्मभिर्वर्णतां गताः ।
वर्णाश्रमव्यवस्थाश्च न तदासन् न संकरः ।

आर्यअनार्य यांच्या लढ्यांतूनच पुढें वर्णाश्रम व्यवस्था निर्माण झाली, व वर्णाश्रम व्यवस्थेंत अनार्यांचा अंतर्भाव करण्यांत आला. अनार्य हे शूद्र व अतिशूद्र अगर अंत्यज गणले गेले व पाश्चात्य देशांतील गुलामगिरीच्या नमुन्याचा दर्जा त्यांना देण्यांत आला. आर्यांनीं जमिनीवर आपली सत्ता प्रस्थापित केल्यामुळें राजसत्ताही त्यांच्याजवळ गेली. आर्यांच्या ह्मणजे त्रिवर्णप्रणीत विविध संस्था अस्तित्वांत आल्या. सर्व अर्थविषयक महत्त्वाचे हक्क आपल्या जवळ ठेवून घेऊन त्याप्रमाणें कायदे

म्हणजे धर्मशास्त्र त्यांनीं निर्माण केलें व समाजांत संस्कृत व असंस्कृत अगर द्विज अगर अद्विज असे दोन प्रमुख भेद पाडिले. तत्कालीन मुख्य धंदे म्हणजे कृषी, गोरक्षण व वाणिज्य हे होत. सामान्य जनसमूहाचा भरणा वैश्य वर्णांत होता हें 'विश्' म्हणजे जनता या शब्दावरून स्पष्ट होते. या विशांतूनच कांहीं बलवान् क्षात्रिय झाले व धर्मशास्त्र म्हणजे कायदेकानू करणारे कांहीं ब्राह्मण पदाला पोहोंचले; व शूद्र आणि अंत्यज हे त्रिवर्णांचे गुलाम बनले. या काळांतील प्रमुख संस्था म्हणजे यज्ञ–संस्था ही होय. तिचा पाया आर्थिक होता हे ' यज्ञाद्भवति पर्जन्यः पर्जन्यादन्नसंभवः' या गीतावाक्यावरून सिद्ध होते. मृगया युगांतील पशुभक्षणाऐवजीं देवांना पशू अर्पण करून त्या योगें पर्जन्य व तद्द्वारा अन्न प्राप्त करून घेण्याची कल्पना आर्योंत निघाली. या कल्पनेचे मूर्त स्वरूप म्हणजेच यज्ञसंस्था होय. ही उत्तर वेदकालीन परिस्थिति होती. वेदकालीन वाङ्मयांत निसर्गाशी झगडत पण त्याचा अनुग्रह प्राप्त करून घेऊन उदरनिर्वाह करणाऱ्या जीवितक्रमाची छटा दिसून येते. तत्कालीन आर्यांची भौतिक मनोरचना त्यांनीं केलेल्या देवतांच्या प्रार्थनांत प्रतीत होते. उदाहरणार्थ, अश्विनीकुमारांची प्रार्थना पाहिली तर त्यांस वनस्पति म्हणजे उद्भिजांचे अधिपति मानले असल्यानें तद्विषयक प्रार्थनांत धान्य मिळविण्याच्या इच्छा उमटलेल्या स्पष्ट दिसून येतात. यामुळें विंटरनित्झ सारखा पंडित वैदिक वाङ्मय भौतिक स्वरूपाचे आहे असें मानतो. यावरून हें विशद होतें कीं वेदकालीन आर्य अर्थोत्पादनार्थ निसर्गाशीं झगडत असतां अर्थोत्पादन पद्धतीनुरूप कल्पना व संस्था त्यांच्यांत निर्माण झाल्या.

## ब्राह्मणकाल व विविध संस्था.

या काळांत कृषिविद्या हस्तगत होत होती; तसतसा मानवाचा निसर्गाशीं जोराचा संघर्ष घडून येत होता. अनार्यांशीं युद्धें होत होतीं, तसेंच आर्य यज्ञ करतात म्हणून त्यांना प्रकाश, प्राणी, धनधान्य, गोधन हीं मुबलक पुरवावीं अशीं अग्न्यादि देवतांचीं स्तवनें रचिलीं जात होतीं.

आर्यांचें वर्चस्व अबाधित राहावें ह्मणून वंशसातत्याची अवश्यकता त्यांना भासूं लागली. अधिकाधिक श्रमशक्ति संपादन करण्याकरतां अनार्य शूद्र अंत्यजांची त्यांना जरूरी वाटूं लागली. वाढत्या व्यापाराची नीट व्यवस्था लागून वेळच्यावेळीं कामें व्हावीं याकरितां श्रमविभागाचें तत्व अमलांत आणणे त्यांना भाग पडलें. याप्रकारें विविध भौतिक गरजा उत्पन्न झाल्याबरोबर त्यांच्या पूर्तीसाठीं यज्ञ, चातुवर्ण्य, कुटुंब, इत्यादि संस्था आर्यांना निर्माण कराव्या लागल्या ! शेतीच्या कामी हुकमी मनुष्य-बलाची गरज उत्पन्न झाली, ती गरज अनेक स्त्रिया करून घेण्यापासून भागवितां येईल ह्मणून बहुपत्नीकत्वाची चाल प्रचलित झाली. स्वतंत्र अर्थोत्पादनाबरोबर खाजगी मालमत्तेच्या कल्पनेचा उदय झाला. त्याच्या रक्षणार्थ गुन्हे, शिक्षा, कायदेकानू यांनीं व्याप्त असें धर्मशास्त्र निर्माण झालें. यावरून हें स्पष्ट होतें कीं आर्यांच्या सर्व संस्थांचा पाया भौतिक अगर आर्थिक आहे. तात्पर्य आर्य–अनार्य यांच्या लढ्यांतून कृषिजीवि वर्णाश्रमप्रधान समाजव्यवस्था अमलांत आली.

## उपनिषत्काल व ज्ञानाची प्रगती

या वर्णाश्रमव्यवस्थेनें प्राचीनकालीं समाजांत ज्ञानाची प्रगती घडवून आणली. पाश्चात्य देशांत गुलामगिरीच्या संस्थेमुळें उच्च वर्गाला फुरसत मिळून विविध ज्ञानाचा विकास झाला ह्मणून अरिस्टॉटल यानें गुलामगिरीचें समर्थन केलें आहे. तद्वतच वैश्य, शूद्र, अतिशूद्रांनीं ब्राह्मणक्षत्रिय वर्णांची सेवा केल्यामुळें ब्राह्मणक्षत्रिय वर्णांना फुरसत मिळून त्यांच्यांत गणित, खगोलविद्या, आत्मानात्मविचार यांचा खल होऊं लागून भारतीय समाज विकास पावूं लागला. नैसर्गिक संपत्तीच्या दृष्टीनें इजिप्त व हिंदुस्थान हे दोन देश समृद्ध असल्यामुळें तेथील मानवजातीला अर्थोत्पादन करूनही सहज फुरसत मिळू लागल्याकारणानें मानवी संस्कृतीचा पाया तेथें घालता आला. भारतवर्षांत तर सृष्टिसौंदर्य, देशाची विशालता, अर्थोत्पादनाची सुलभता याच्यामुळें तेथील लोकांच्या मनांत जगाच्या बुडाशीं आत्मतत्व

असलें पाहिजे अशी कल्पना प्रभाव गाजवूं लागली. तसेंच हिंदुस्थानांत पिकाची विपुलता असल्यामुळें एका वर्गानें दुसऱ्या वर्गावर जुलूम करून त्या वर्गाला शिस्तींत व जरबेंत ठेवून तद्वारा अर्थोत्पादन करण्याची गुलामगिरीची पद्धत प्रचारांत आली नाहीं. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांत निसर्ग देवता सुप्रसन्न व सुंदर असल्यामुळें निसर्ग शक्तींच्या प्रेरक गणल्या गेलेल्या देवता तेथें सौम्य सुखदायी अशा कल्पिल्या गेल्या आहेत. तर ग्रीक देवतांची वर्णनें ग्रीस देशांतील निसर्गानुसार उग्र आहेत. याच नैसर्गिक कारणामुळें हिंदुस्थानची संस्कृति ही सहिष्णुताप्रधान अशी बनून गेली आहे. तात्पर्य, आर्यांच्या विविध संस्था व त्यांचे आत्मानात्मविचार यांचा पाया आर्यावर्तांतील भौतिक पारिस्थिति हाच होता ही गोष्ट निःसंशय सिद्ध होते.

## बुद्धक्रांति व सरंजामी युग.

वर्णाश्रमव्यवस्थेनें समाजाची अवश्यक प्रगति घडवून आण त्यानंतर ती निरुपयोगी होऊं लागली. इतर वर्णांना राबण्यास लावून उच्च वर्ग आत्मविचारांत दंग होऊन निवृत्तिमार्गास लागला. ज्ञानाची प्रगति झाल्यावर यज्ञ संस्थेचें फोल स्वरूप दृग्गोचर होऊं लागलें. याच समयास बुद्धाचा जन्म झाला. बुद्धानें जगांतील ‘ जीवो जीवस्य जीवनं ’ हा न्याय अवलोकन करून जगांतल्या नाडणूकींविरुद्ध बंड उभारलें. या बंडाचे स्वरूप दुहेरी होते. ब्राह्मण सत्तेविरुद्ध राजन् वर्गाचा उठाव, आणि शहराविरुद्ध खेडीं ह्मणजे सावकार वर्गाविरुद्ध नाडल्या गेलेल्या कर्जबाजारी गरीब शेतकरी वर्गाचा उठाव, असें हें द्विविध स्वरूप होतें. बुद्धावतारानें समाज पाखडून त्यांतील खडे दूर काढून टाकले असें पुराणांतरीं बुद्धाचें वर्णन आहे. हे खडे ह्मणजेच दलित दीन दुबळयांचा वर्ग, या दलित वर्गाची कड घेऊन त्यांच्यांत संघटना बुद्धानें घडवून आणली, सर्व ज्ञान पाली भाषेंत आणवून समाजाला जागृत केलें. पुढें बुद्धधर्माचा आशिया खंडभर प्रसार होऊन त्यांतूनच ख्रिस्ताचा व ख्रिस्तधर्मांतून महंमदाचा असे उदय

झाले, समाजाच्या बाल्यावस्थेंत जुन्या जगाला शहाणे करण्याचें काम ह्या तीन धर्मांनीं केलें, परंतु वर्णाश्रमव्यवस्थेंत होत असलेल्या दलितांच्या पिडेतूनच बुद्धाचें तत्त्वज्ञान उद्भवले. बुद्धकालीं विशेष धंद्यांची वाढ झाली नव्हती. होत होते तितकें अर्थोत्पादन समाजाच्या गरजेस अपुरे होते. ह्मणून वासनांचा ( ह्मणजे गरजांचा ) क्षय करतां करतां निर्वाणस्थिति प्राप्त करून घ्यावी असा त्यानें समाजास उपदेश केला. म० गांधींचें तत्त्वज्ञानही याच नमुन्याचे असून ते सांप्रतच्या यांत्रिग युगांत ह्मणजे अर्थोत्पादनाची समाजांत रेलचेल होत असतां प्रतिगामी स्वरूपाचें ठरतें. वासनाक्षय होण्यासाठीं वनांत राहावें या शिकवणीमुळें अनेक बौद्ध भिक्षुनीं वनांत विहार निर्माण केलें, त्यामुळें बुद्धोत्तरकालीं शिल्प कलेचा अनुपम विकास झाला. समाज जागृत झाल्यामुळें दळणवळण व्यापार वाढला अनेक धंदे उदय पावले. चंद्रगुप्त शूद्र असून राजा होऊं शकला. अशोकाचें साम्राज्य इराणपर्यंत पसरलें. बौद्ध भिक्षूंचा आशिया खंडभर संचार सुरू झाला. अर्थात्च औद्योगिक क्रांति घडून आली. जमीन महसूल पद्धति, वाणिज्य, उद्योगधंदे, कायदा व शिक्षापद्धति यांचें प्रतिबिंब कौटिल्याच्या अर्थ शास्त्रांत दृग्गोचर होतें. धंदे वंशपरंपरागत झाल्यानें कार्यक्षमता वाढली. अशा रीतीनें सुतार, लोहार, सोनार, हजाम, विणकर, बुरुड, चांभार अशा बारा बलुतेदारांच्या ग्रामसंस्था खेडोंपाडीं अस्तित्वांत आल्या. धंद्याची दृढ संघटना करण्याकरतां श्रम विभागाच्या तत्त्वावर एकमेकापासून अलिप्त अशा जाति संस्था आस्तित्वांत आल्या. जाति संस्थेला असा भक्कम आर्थिक पाया आहे ह्मणूनच त्या समाजांत बद्धमूल झाल्या, असो,याप्रमाणें ब्राह्मण व बौद्ध यांच्या झगड्यांत कृषिजीवि वर्णाश्रम व्यवस्था नाश पावून जातिसंस्थात्मक सरंजामी युग निर्माण झालें, या बुद्धक्रांतीचा परिणाम इतकाच कीं अर्थविभागणीची विषमता कमी झाली व दलित वर्ग स्वतंत्र झाला. या सरंजामी युगाचा प्रारंभीचा काल भरभराटीचा होता. शिल्प, चित्र, वास्तु, संगीत, नृत्य, काव्य आदिकरून अनेक

प्रकारच्या कलांची या काळांत प्रगति झाली. याचें कारण हिंदुस्थान देशांतील तत्कालीन सुबत्ता व त्यामुळें समाजाला मिळालेली फुरसत. कौटिल्यानें अर्थाचें महत्त्व जनतेला पटवून दिल्यामुळें सामान्य जनतेचा ज्यांत पुष्कळ भरणा होता असा वैश्य वर्ग याला महत्त्व प्राप्त झालें व येथील समाजाचें ऐहिक विषयाकडे लक्ष लागून त्याचा ऐहिक उत्कर्ष झाला हेंही एक कारण विविध कलांचा विकासाच्या मुळाशीं आहे असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं. हा सरंजामी युगाचा भरभराटीचा काळ शिकंद-रच्या स्वारीपासून पेशवाई अखेरपर्यंतचा ह्मणजे जकळजवळ २२०० वर्षांचा होऊन गेला. आर्थिक दृष्ट्या हा काळ साधारणतः हिंदुस्थानाला समाधानाचा गेला. येथेंच कच्चा व पक्का माल तयार होत असून जाति-संस्थेमुळें विविध धंदे संघटित झाले असल्यानें आर्थिक विषमता या काळांत तीव्र भासली नाहीं. समाजांत तीव्र अंतर्विरोध नसल्यामुळें समाजाची प्रगति पुढें खुंटू लागली. पूर्वकर्मवादाच्या अफूच्या गोळीनें होते नव्हते ते विरोध शमविले गेले होते. या काळांत खेडोपाडीं शहरीं सर्वत्र जमिनदार व जहागिर-दार यांचें बडे प्रस्थ होते. कारण उत्पादनाचें प्रमुख साधन जी जमीन तीवर त्यांची संपूर्ण सत्ता होती. इतर वर्ग ह्मणजे ब्राह्मणांचा पुरोहित वर्ग व विविध धंद्याच्या जाति जमिनदारावर अवलंबून होत्या. बुद्धिमान पुरोहित वर्गानें स्वतःच्या वर्गासाठीं व जमिनदारांच्या आर्थिक हितासाठीं शास्त्रें पुराणें रचिलीं व त्यांतूनच आपल्या व जमिनदार वर्गाच्या आर्थिक हितास अनुकूल असे अर्थ पुरोहित ब्राह्मण वर्ग शोधून काढीत असे. जमिनदार रयतेस पिळून त्यांच्या आर्थिक दुःखावर प्राक्तनवाद व पूर्वकर्मवादाची मलमपट्टी ब्राह्मण वर्गाकरवीं लावीत असे. सांप्रतच्या जमिनदारीच्या मोड-कळीच्या काळांत सुद्धां खेड्यामध्यें जमिनदारांचे किती प्रस्थ असतें हें सर्वश्रुत आहेच.

## शिवक्रांति

या सरंजामी युगांत मुसलमानांनीं हिंदूवर स्वाऱ्या करून त्यांचे

राज्य वळकाविलें,तरी त्यायोगें हिंदुस्थानच्या आर्थिक परिस्थितींत बदल आला नाहीं. किंबहुना हिंदू हुशार व व्यापार उद्योगधंद्यांत पटाईत असल्यामुळें त्यांची सांपत्तिक स्थिति मुसलमानी राज्यांत शोचनीय झाली नव्हती, त्यामुळें उत्तर हिंदुस्थानांत हिंदूंचा कितीही छळ झाला, ब्राह्मणांच्या कितीही कत्तली झाल्या, तरी २।३ व्यक्तीखेरीज करून सही हिंदूंनी १२००–१६०० या अवधींत उचल घेतली नव्हती. कारण हिंदूची संघटना घडून येण्यास उत्तर हिंदुस्थानांतील भौतिक परिस्थिति त्यांना अनुकूल नव्हती. परंतु महाराष्ट्राची भौतिक परिस्थिती ( डोंगराळ नापीक प्रदेश ) मुसलमानाविरूद्ध बंड करण्यास अत्यंत अनुकूल होती म्हणून तेथें शिवाजी अवतरून क्रांतिं घडवून आणतां झाला. दिसायला मुसलमानाविरूद्ध शिवाजीचे बंड दिसलें तरी तें सरंजामप्रधान मोंगल पातशाहीविरुद्ध बंड होतें हें शिवाजीच्या वर्तनावरून स्पष्ट होते. शिवाजी सुरत जालना हुबळी सारखी शहरें व तेथील धनाढ्य सावकार हिंदु मुसलमान हा भेद न करतां लुटीत असे.त्यानें शत्रूच्या मुलुखांतील शेतकरी पेशाची गांवें लुटून रयतेस त्रास दिला नाहीं व शेतें व त्यांतील पिकें उध्वस्त केलीं नाहींत किंवा हैदराप्रमाणें खेडींची खेडीं जाळून बेचिराख केली नाहींत. 'सर्वांस अन्न लावणें,' 'सर्वांचा निर्वाह' हें ध्येय शिवाजीनें आपल्यापुढें ठेविल्याबद्दलचे शिवाजीचे उल्लेख आहेत. तात्पर्य वतनदार, जहागिरदार, जमिनदार यांनीं शेतकरी, हेटकरी यांची जी नाडणूक चालविली होती, त्याविरुद्ध शिवाजीचें बंड होतें. शिवाजीनें जहागिरी नष्ट केल्या इतकेच नव्हे, तर स्वतःचे अधिकारी नेमून रयतेशीं प्रत्यक्ष संबंध ठेविला व देसाई देशपांडे देशमुख यांचा रयतेबरोबर असलेला संबंध त्यानें तोडून टाकला. या बंडाची पूर्व तयारी २००।३०० वर्षें चालली होती. तेरा चवदाव्या शतकांत पुरोहित वर्ग संस्कृतातलें ज्ञान मराठींत आणण्यास प्रतिबंध करीत होता. कारण त्यायोगें रयत सज्ञान होऊन आपल्या व जमीनदारांच्या हितसंबंधाविरुद्ध उठेल. ज्ञानेश्वरानें याविरुद्ध बंड उभारलें व संस्कृतातलें ज्ञान मराठींत

उतरविण्याचा पायंडा घातला.

पुढें एकनाथ मुक्तेश्वर, तुकाराम, रामदास आदिकरून संत मंडळींनीं मराठींत काव्यें करून महाराष्ट्रीय समाजास जागृत केलें. या संत मंडळीच्या वाङ्मयांत दलित समाजाबद्दलची मूर्तिमंत तळमळ दिसून येते. १९ व्या शतकात टॉलस्टॉय डोस्टोयव्हस्की चेकाव्ह सारख्या कादंबरीकारांनीं रशियांत ज्या नमुन्याची समाज जागृतीचे कार्य केलें, कांहींसे तशाच प्रकारचें कार्य या संत मंडळीनें केलें, त्यांचें वाङ्मय ईशपर असले तरी दलितांच्या शोचनीय आर्थिक स्थितीचे त्यांत भरपूर वर्णन आहे. समाजाचें वास्तव प्रतिबिंब यांच्या काव्यांत दिसून येते! अशा प्रकारचें वाङ्मय निर्माण होण्यास महाराष्ट्राची भौतिक स्थितिच कारण होय. आर्थिक हलाखीचा अतिरेक सतराव्या शतकांत होऊन दलितांना शिवाजीसारखा असामान्य पुढारी मिळाल्याबरोबर बंड उभारलें गेलें. परंतु सरंजामी युगांत सरंजामदारांचा नाश होणें शक्य नाहीं. शिवाजी नंतर लगेच राजारामाच्या कारकीर्दीत जहागिरी देण्यास सुरवात होऊन जहागिरीचे प्रस्थ पेशवाईत फार वाढले त्या गोष्टीला कोणी व्यक्ति जबाबदार नसून सरंजामी युगांतील उत्पादन पद्धति हीच कारणीभूत आहे. यामुळें दलितोद्धाराचा शिवाजीचा प्रयत्न सिद्धीस गेला नाहीं. दलितोद्धार होण्यास अर्थोत्पादनाची रेलचल करणारें यांत्रिग युगच येण्यास हवें! त्याचप्रमाणें सरंजामी राज्यपद्धति एकतंत्री असते ह्मणून शिवाजीची अष्टप्रधान पद्धति पुढें पेशवाईत न टिकतां तिचें रूपांतर जहागिरीपद्धतींत झाले. लोकसत्तेला प्रारंभ भांडवली युगांत होतो ह्मणून भारतवर्षांत ती उदय पावली नाहीं, याला जबाबदार येथें प्रचलित असलेलें सरंजामी युग हेंच होय.

## मराठे वि० इंग्रज=सरंजामशाही वि० भांडवलशाही.

अठराव्या शतकाच्या अखेर मराठ्यांची इंग्रजाशी टक्कर ह्मणजे हिंदुस्थानांतल्या सरंजामी पद्धतीचा इंग्लंडांत विकास पावत असलेल्या भांडवलशाहीशीं लढा होय. सरंजामी पद्धति मागसलेली ह्मणजे विस्कळित

असल्यामुळें हार पावली. उलट भांडवलशाही भौतिक शास्त्रांत पुढारलेली, संघटित ह्मणून यशस्वी झाली. ब्रिटीशांना येथें विजय मिळण्यास आणखी एक कारण झालें. तें हें कीं येथील प्रजा सरदारांची मुलुखागिरी, जहांगिरदारांची पिळणूक, राजेरजवाड्यांची नाडणूक यांनीं गांजिली गेली होती, त्यामुळें संघटित सुव्यवस्थित आपलें सत्यस्वरूप छपवून जनतेला भूल पाडणाऱ्या अशा भांडवलशाही पद्धतीच्या ब्रिटीश राज्यानें जनमन वेधलें गेलें. याप्रमाणें दोन अडीच हजार वर्षांचा सरंजामी युगाचा विशालकाळ भारत वर्षांत होऊन गेला. त्यापैकीं प्रारंभीच्या काळांत या देशाची भरभराट होऊन समाजाची बरीच प्रगति झाली, परंतु पुढें बौद्धांचा निःपात झाल्यानंतर येथच्या समाजांतील अंतर्विरोध पूर्वकर्म, मोक्ष इत्यादि अध्यात्मप्रवण शिकवणीमुळें स्तब्ध केलें गेल्यामुळें समाजाची प्रगति स्थगित झाली. गुलामगिरीयुग संपल्यानंतर लगेच हजार बाराशें वर्षांत भांडवलशाहीच्या उदयाचीं चिन्हें यूरोपांत दिसूं लागलीं, परंतु हिंदुस्थानांतला सरंजामी युगाचा अंमल दोन अडीच हजार वर्षांचा असूनही येथें भांडवलशाहीचा उदय होऊं शकला नाहीं. यालाही कारण येथील भौतिक परिस्थिति हेंच होय. येथील सुपीक भूमि व जाति, ग्रामपंचायत आदि करून सांघिक संस्था यामुळें येथें भरपूर अर्थोत्पादन होत होतें. त्यामुळें हिंदुस्थानांत जगांतून चहुंकडून द्रव्याचे झरे वाहूं लागून हिंदुस्थान ही सुवर्णभूमि बनली. अर्थोत्पादनार्थ देशाबाहेर पडण्याची येथच्या लोकांना गरजच पडली नाहीं, उलट युरोपच्या लोकांना मात्र उदरनिर्वाहार्थ माय देशाचा त्याग करून वसाहतीशोधार्थ जग धुंडाळणें भाग पडलें. कोलंबसानें अमेरिका खंड शोधून काढिलें. इतर युरोपियनांनीं केप आफ् गुड होप भूशिराला वळसा घालून मोठ्या कष्टानें हिंदुस्थान गांठलें. साहजिकच जगड्व्याळ बाजारपेठ तयार होऊं लागली. तिला माल पुरविण्याकरतां मोठ्या प्रमाणावर यूरोपच्या विशेषतः इंग्लंडच्या लोकांना मोठमोठे कारखानें काढावे लागले. यामुळें भांडवलाला महत्त्व येऊं लागलें. जगाशीं व्यापार सुरू

झाल्यामुळें अधिकाधिक भांडवल कारखानदाराजवळ जमूं लागलें, तथापि वाढत्या बाजार पेठेला माल पुरविणें हस्तशक्तीवर चालविलेल्या मोठ्या कारखान्यांना जड जाऊं लागले. या परिस्थितींतच बाष्प शक्तीचा शोध लागला व भांडवलशाही उत्कर्ष पावूं लागली. सरंजामी युग मोडकळीस आलें. पुढें आर्थिक सत्ता भांडवलदारांच्या हातांत व राजकीय सत्ता सरंजामी राजेसरदारांच्या हातांत ही कृत्रिम वस्तुस्थिति नाहींशी करण्याकरतां भांडवलदारांनीं इंग्लंडांत १६८८ सालीं राजसत्ता हातीं घेऊन राज्यक्रांति प्रथम घडवून आणली व भांडवलशाहीप्रधान लोकसत्ता ( Bourgeois democracy ) प्रस्थापित केली. औद्योगिक क्रांतीमुळें राज्यक्रांति घडून आली. येथील सरंजामी युगांत अशी लोकसत्ता निर्माण होणे कां अशक्य होतें हें वरील विवेचनावरून स्पष्ट होईल. असो याप्रमाणें ब्रिटीशांच्या प्रगतिपर भांडवलप्रधान संस्कृतीनें हिंदुस्थानच्या जुन्या पुराण्या सरंजामी संस्कृतीवर पगडा बसविला ही गोष्ट निसर्गाच्या नियमास अनुसरूनच आहे. तात्पर्य, हिंदुस्थान व इंग्लंड यामध्यें घडून आलेल्या जितजेत्यांच्या संबंधाच्या बुडाशीं न्या० रानडे ह्मणत त्याप्रमाणें ईश्वरी संकेत नसून उपरोक्त दोन भिन्न देशांतील भिन्न भिन्न भौतिक परिस्थिति हीच आहे.

## ब्रिटीश भांडवलशाहीचें कार्य.

ब्रिटीश भांडवलशाहीनें येथील सरंजामी सत्तेला अखेर १८५७ सालच्या बंडांत नामोहरम केलें, तरी पाश्चात्य देशांतील सरंजामी पद्धती-प्रमाणें तिनें येथील सरंजामी पद्धतीचें अजिबात् निर्मूलन केलें नाहीं. इतकेंच नव्हे तर स्वतःचा पाया हिंदुस्थानांत दृढतर करण्याकरतां येथील जमीनदार, जहागिरदार, सरंजामी राजे संस्थानिक यांना कृत्रिम टेकू देऊन जीवंत ठेविलें आहे. शिवाय यांच्या जोडीला नवीन व्यापारी दलाल निर्माण करून येथील सर्व संपत्तीचे झरे आत्मोन्मुख करून सोडले आहेत. तिचें महत्वाचे कार्य हें कीं सरंजामी पद्धतींतील पूर्वकर्मादि अध्यात्मप्रवण फसवणूकीच्या शिकवणीनें, दानधर्माच्या लांचलुचपतीनें व संयुक्त कुटुंब

ग्राम जाति इत्यादि संस्थांच्या अस्तित्वामुळें स्वयंपूर्ण असलेल्या ग्रामपद्धतीनें शमविलेले वर्ग विरोध तिनें जागृत करून भारतीय समाजांत खळबळ उडवून देण्यास प्रारंभ केला. सरंजामी पद्धतींतील संयुक्त कुटुंब, जाति ग्राम जमिनदारी इत्यादि संस्थांवर तिचे हस्ते परहस्ते आघात पडून त्या शिथिल होऊं लागल्या. त्या बरोबर धर्म बुडाला, आर्यसंस्कृति बुडते अशी सरंजामी पद्धतींत सोकावलेले जमिनदार, सावकार, पुरोहित इत्यादि वर्गांनीं सारखी हाकाटी चालूं केली. सरंजामी संस्कृतीला लोकांना भुरळ पाडण्याकरतां आर्यसंस्कृति हे नांव दिले गेले आहे. प्रगत भांडवलशाही संस्कृतीपुढें तिचा आतां टिकाव लागणे शक्य नाहीं. तिच्या संरक्षणार्थ धडपड करणें ह्मणजे नदीच्या वाढत्या प्रवाहाला एकाद्यानें आपल्या करांगुलीनें थोपवून धरण्याचा प्रयत्न करण्याइतकें हास्यास्पद आहे.

पुढें येथची सत्ता ब्रिटीश भांडवलशाहीच्या हातांत गेल्यावर येथील दलित वर्गाच्या श्रमाचा भरपूर फायदा घेण्याकरतां जमिनदारांच्या जोडीस तिनें नूतन व्यापाऱ्यांचा दलाल वर्ग निर्माण केला असें वर सांगितले आहे. या दलालांच्या जवळ व्यापारामुळें जसजसे भांडवल वाढूं लागलें तसतसे हे दलाल हिंदुस्थानांत यंत्रप्रधान विविध उद्योग धंदे उठवूं लागले. पुढें महायुद्धकालीं यांत्रिक उद्योग धंद्याना विशेष चालना मिळाली, तरी सुद्धां हिंदुस्थानांत भांडवलशाहीची वाढ होणें ब्रिटीश भांडवलशाहीच्या नुकसानीचें असल्यामुळें तिनें येथील प्राचीन अर्थोत्पादन पद्धतींत हात न घालतां सरंजामीपद्धति आहे त्या स्थितींत ठेविली आहे. इतकें संरक्षण असून सुद्धां येथील सरंजामीपद्धतीची विशेषतः गेल्या दहा वर्षांत दाणादाण उडून गेली आहे. ती सध्यां मोडकळीस आलेल्या अवस्थेंतच कसाबसा जीव धरून आहे. तात्पर्य हिंदुस्थानांत सरंजामीपद्धतीची अवनतावस्था व भांडवलशाहीची बाल्यावस्था यांचे साहचर्य दृग्गोचर होत आहे. भांडवलशाहीच्या उदयामुळें येथच्या समाजांत सुखवस्तु वर्ग ( Bourgeoisie & Landlords ) मध्यम वर्ग ( Petty Bourgeoisie ) दलित वर्ग

( the oppressed and exploited ) असें तीन विभाग पडलेले आहेत. ब्रिटीश भांडवलशाहीची येथें सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर सरंजामी युगांत जमिनदार सरदार यांना बौद्धिक सहाय्य करणारा ब्राह्मणप्रधान बुद्धिजीवि वर्ग आतां भांडवलशाहीच्या हिंदुस्थानांतल्या सत्तेला मदत करूं लागला व आशाळभूत होत्साता नोकऱ्या, मानमरातब, कौन्सिलांत जागा इत्यादि प्राप्त करून घेण्याकरतां ब्रिटीश सत्तेची स्तोत्रें गावूं लागला. या स्तुतिस्तोत्रांचे खरेंखुरें प्रतिबिंब लोकहितवादींच्या लिखाणांत दिसून येते. त्यावेळीं हा बुद्धिजीवि वर्ग येथील भांडवलशाही सत्तेला भीत भीत, तिची कदर बाळगीत, तिला आळवीत आपला कार्यभाग करून घेऊं पाहात होता. सुखवस्तु वर्ग ह्मणजे नवीन व्यापारी, भांडवलदार, जमिनदार, सावकार इत्यादि वर्ग भांडवलशाहीच्या यांत्रिक उत्पादनामुळें प्राप्त झालेल्या सुखांच्या उन्मादांत तन्मय पावलेला होता. सुखवस्तु वर्गाप्रमाणें मध्यम बुद्धिजीवि वर्ग ब्रिटीश देवतेला आळवून तिजपासून बड्या नोकऱ्या कौन्सिलांत जागा आदि करून संपादन करून सुखवस्तु बनू पाहत होता. ह्मणून यांचे राजकारण निष्प्रभ दीन दुबळे होतें. तरी सामाजिक चालीरीतींत भांडवलशाही समाजसुधारणा घडवून आणण्याकरतां हा वर्ग धडपडत होता. ह्या वर्गाचें राजकारण श्रेष्ठ मध्यम वर्गाचे होते असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं. कारण यांची दृष्टि सुखवस्तुवर्गाकडे असून त्या वर्गाशीं यांचे संबंध निगडित होते. या मध्यम वर्गाच्या राजकारणाचा प्रभाव हिंदुस्थानच्या इतिहासांत १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत होता पण त्याच शतकाच्या अखेरला त्या राजकारणाची इतिश्री झाली. व त्याच्यापेक्षा जोमदार असें लो. टिळकांचे राजकारण पुढें सरसावलें. टिळकांच्या राजकारणांत सरंजामी राज्यपद्धतींतील ह्मणजे शिवशाही व पेशवाई या काळांतील मराठी शौर्याची इंग्रजी विद्येनें संघटित केलेली अशी तडफ होती. टिळकांचे राजकारण कनिष्ठ मध्यम वर्गाचे असून पूर्वकालीं गोखल्याच्या सुखवस्तु राजकारणाला ते प्रतिक्रियात्मक उत्तर होतें. परंतु

समाजकारणांतही याच प्रकारची प्रतिक्रिया झाली व टिळक, चिपळूणकर, विवेकानंद, रामतीर्थ हे भांडवलशाही संस्कृतीपेक्षा अध्यात्मप्रवण आर्य संस्कृतीच्या नांवाखाली मोडणाऱ्या सरंजामी संस्कृतीला प्राधान्य देऊं लागले. तेव्हां १९०० पासून १९२० च्या चळवळींचा पाया सरंजामी संस्कृति हा होता, तरी ती पूर्वोक्त गोखल्याच्या चळवळीप्रमाणे परावलंबी नसून स्वावलंबनावर अधिष्ठित झाल्याकारणानें ती चळवळ एकंदरींत जोमदार व प्रगतिपर होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु १९१९ सालीं कौन्सिलांत भरपूर जागा, दिवाणगिऱ्या मोठ्या नोकऱ्यांत अधिकाधिक प्रवेश यांची सोय मॉंटेग्यू सुधारणाकायद्यानें करून दिल्यामुळें मध्यमवर्गाच्या आकांक्षा तृप्त होऊन त्याचें राजकारण संपुष्टांत येऊं लागलें.

मध्यंतरी महायुद्धांत शेतकरी कामकरी आदिकरून दलित वर्गाची बरीच नाडणूक झाल्यामुळें तो असंतुष्ट झाला. त्याच्या असंतोषाचें स्वरूप १९१७।१९१८ सालीं खेडा, चंपारण्य, बोरसद येथें शेतकऱ्याच्या व मळेवाल्याच्या चळवळींत व १९१९ नंतर यापूर्वी अज्ञात अशा चालू झालेल्या कामकऱ्यांच्या संपांत स्पष्टपणें प्रतीत होऊं लागलें. दलित वर्गात याप्रमाणें जागृति झालेली पाहून कॉंग्रेस उत्तेजित झाली व तिनें असहकारितेची चळवळ पुकारली. ही चळवळ ( १९२० ) व १९३० ची सत्याग्रहाची चळवळ या दोन्ही चळवळींनीं दलित वर्गाला खडबडून जागे करून कार्यक्षम बनविलें. म्हणून या म. गांधींच्या राजकारणाला ‘ दरिद्रनारायणा ’ चे राजकारण म्हणतात. म. गांधींचा अध्यात्मिक ध्येयवाद सरंजामी संस्कृतींतला व अस्पष्ट असा असला तरी त्यांच्या राजकारणानें समाजांतील आचारांत व विचारांत क्रांति घडवून आणून आपल्या सर्व चळवळीना दलितोन्मुख केलें. हें कार्य कांहीं सामान्य नव्हे. परंतु या चळवळींच्या ध्येयाची रूपरेषा स्पष्ट नसल्यामुळें व दलित वर्गाच्या आर्थिक हितसंबंधाकडे दुर्लक्ष झाल्यामुळें या दोन्ही चळवळी दलितजागृतीचें प्रचंड कार्य करून अस्तंगत झाल्या. पं. जवाहरलालच्या साम्यवादी राजकारणाला नुकताच कोठें प्रारंभ झाला आहे.

भारतीय समाजाची रचनात्मक वस्तुस्थिति कशी आहे? त्यांतील परस्परविरोधि शक्ति कशा वावरताहेत ? व त्यांची अखेर गति काय होणार?

## भारतीय समाजाची रचना.

हिंदुस्थानांत शेंकडा ७० लोक शेतीवर उपजीविका करून आहेत त्यापैकी शेंकडा १० सरंजामदार, जमिनदार व संस्थानिक आहेत. त्यांचेच उत्पन्न १८० कोटी आहे. तें प्राप्त करून घेण्यास त्यांना काडीचेही श्रम पडत नाहींत. बाकीचे शेंकडा ६० लोक निढळ्या घामानें पीक काढणारे शेतकरी आहेत. यात फारच थोडे रयतामार्फत जमिन करणारे असे आहेत. यांतील शेंकडा २ लोक केवळ मोलमजूरीवर शेतकाम करून उपजीविका करतात.

बाकी उरलेल्या शेंकडा ३० लोकांतील शेंकडा १८ लोक उद्योग धंदा, व्यापार, मालाची ने—आण खाणींचे काम इत्यादिवर उदरनिर्वाह करून आहेत. या शेंकडा १८ लोकांत भांडवलदार व मजूर या दोघांचाही समावेश आहे. शेंकडा १½ भांडवलदार आहेत. मजूर व त्याचा परिवार मिळून शेंकडा ९ भरतात. कारागीर लहानसान व्यापारी मिळून शेंकडा ७½ आहेत. बाकीच्या उरलेल्या शेंकडा १२ लोकांत सरकारी नोकर डॉक्टर, वकील, प्रोफेसर शिक्षक लेखक लष्कर पोलीस इत्यादींचा भरणा आहे. यांतील शेंकडा ३½ लोक भरपूर पगाराचे असे आहेत. त्यांना सुखवस्तु वर्गांतच सामील केले पाहिजे. ह्मणजे शेंकडा १½ भांडवलदार शें. १० जमीनदार शें. ३½ वडे नोकर मिळून एकंदरींत शेंकडा १५ लोकांचा भरणा सुखवस्तु वर्गांत आहे. या शेंकडा १५ लोकांच्या हातांत आर्थिक सत्ता आहे. परंतु यांचे सर्व हितसंबंध साम्राज्यशाहीशी संलग्न असे आहेत. त्यांची आर्थिक सत्ताही ब्रिटीश भांडवलशाही व साम्राज्यशाही यांच्या मर्जीवर अवलंबून आहे. ह्मणून हा वर्ग परावलंबी ह्मणून दुबळा असे ह्मणण्यास हरकत नाहीं.

मध्यमवर्गांत ( petty bourgeoisie) शें. ७½ कारागीर, व्यापारी शें.

४ लहान सहान जमीनदार शें. ३½ सर्वसाधारण नोकर, वकील, डॉक्टर शिक्षक वगैरे मिळून शें. १५ लोकांचा भरणा आहे. हे बहुतेक हातावरच्या पोटावर उपजीविका करून असतात.

राहिता राहिला दलित वर्ग; त्यांत उरलेले शेतकरी शेंकडा ५६, कामकरी शें. ९ इतर अगदीं खालच्या दर्जाचे नोकर आदिकरून शें. ५ मिळून शें. ७० लोकांचा भरणा आहे. या शेतकऱ्यांची स्थिति तर अत्यंत निकृष्ट झालेली आहे. त्यांनीं काढावयाचीं पिकें केवळ पाऊसाच्या पाण्यावर अवलंबून असतात. पीक येतें न येतें तों त्यांत शें.⅔ पेक्षां जास्त भाग जामिनदार व सावकार हिरावून घेत असतो. ग्रामोद्योगांनीं शेतकऱ्यांची स्थिति सुधारेल ह्मणावे, तर आकाशाला ठिगळ लावण्यासारखे आहे. बाष्पशक्तीवर चालविलेल्या कारखान्यापुढे हस्तशक्तीनें चालविलेले ग्रामोद्योग यांचा टिकाव लागणें अशक्य आहे.

मध्यम वर्गांतल्या शें. १० लोकांची निकृष्टावस्था आहे. यांना कनिष्ट मध्यम वर्गीय ह्मणण्यास हरकत नाहीं. त्याप्रमाणें दलित वर्गांतील लोक ७० शें. कनिष्ट मध्यम वर्गांतील शें. १० मिळून शेंकडा ८० लोकांची स्थिति अत्यंत केविलवाणी आहे. यांतच बेकार सुशिक्षितांचा समावेश केला गेला आहे. परंतु पुढें पुढें निकृष्टावस्थेंत असलेल्या शें. ८० लोकांची संख्या वाढत वाढत शें. ९० वर येऊन ठेपणार. ह्मणजे मध्यमवर्गाचाही दलित वर्गांत लोप होत जाणार व कांहीं जमिनदार, भांडवलदार हेही निकृष्टावस्थेप्रत प्राप्त होणार. सरंजामी युगांत बुद्धिजीवी पांढरपेशा वर्गाचे बौद्धिक सहाय्य जमिनदारांना होते. तें सहाय्य आतां त्यांच्या बेकारीमुळें ह्मणजे आर्थिक हितसंबंधाच्या बाबतींत त्यांचा दलिताशी समान दर्जा होणार असल्यामुळें दलित वर्गाला मिळत जाणार. याप्रमाणें भारतीय समाजांत दोन परस्परविरोधी तट पडत चाललेले दृष्टोत्पत्तीस येत आहेत. असे एका बाजूला भूमंडळावर सत्ता गाजवित असलेली ब्रिटीश भांडवलशाही व तिचे अंकित बडे जमिनदार व नोकर, संस्थानिक व भांडवलदार मिळून

शें. १० हिंदी जनता यांची एक फळी; तर दुसऱ्या बाजूला शें. ९० ची संघटित कामगार वर्गाच्या धुरीणत्वाखालीं सर्वसामान्य आर्थिक हितसंबंधामुळें एकत्रित झालेली शेतकरी, कनिष्ठ मध्यम वर्ग, सुशिक्षित बेकार, कारागिर इत्यादींची दुसरी फळी; अशा दोन परस्परविरोधी फळया निर्माण होणार !

याचप्रमाणें जगांतील राष्ट्रांचे दोन परस्परविरोधि तट पडत चालले आहेत. एका बाजूला भांडवलशाही शोटिंग राष्ट्रांचा एक तट तर दुसऱ्या बाजूला कामगार राष्ट्रांचा एक तट ! ज्यावेळीं हिंदुस्थानांतील वर्गविरोध जागतिक वर्गविरोधाशीं समरस होईल त्याचवेळीं हिंदुस्थानची आर्थिक गुलामगिरी व राजकीय पारतंत्र्य यांतून एकसमयावच्छेदें करून सुटका होईल. सर्व व्यक्तींना जींत पूर्ण विकासास वाव आहे अशी समाजरचना निर्माण होऊं लागेल. हें ध्यानांत धरूनच पं. जवाहरलाल नेहरू हे जागतिक परिस्थितीशीं भारतीय परिस्थिती संलग्न असून जागतिक परिस्थितीकडे नजर ठेवूनच हिंदुस्थानच्या चळवळीचा गाडा पुढें ढकलला पाहिजे असे म्हणतात. पुढें आपोआप हिंदुस्थानची मुक्तता होणार म्हणून स्वस्थ न बसता आपल्या ज्ञानशक्ति व इच्छाशक्ति एकवटून जागतिक परिस्थितीशीं हिंदुस्थानची परिस्थिती कशी समरस होईल म्हणजे जागतिक परिस्थितींतून हिंदुस्थानला कसा फायदा करून घेतां येईल यादृष्टीनें जारीचे प्रयत्न आपण चालविले पाहिजेत असा पं. नेहरू यांच्या म्हणण्यातील इत्यर्थ आहे. हिंदुस्थानांत समाजसत्ता स्थापन होण्यापूर्वी येथील भांडवलशाही फॅसिझम् धारण करील असा कांहींचा अंदाज आहे. परंतु फॅसिझम् अस्तित्वांत येण्यास भांडवलशाहीजवळ राजकीय सत्ता व लष्करी सत्तेचें पाठबळ हीं दोन्ही असावी लागतात; परंतु हिंदी भांडवलशाहीजवळ हीं दोन्हीही नाहींत म्हणून ती दुबळी परावलंबी असल्यामुळें येथें त्याचा उदय होणें शक्य नाहीं.

असो पण हिंदुस्थानची आर्थिक व राजकीय दृष्ट्या मुक्तता होण्यास

किती अवधी लागेल हें नक्की सांगता येत नाहीं. सर्व कांहीं जागतिक परिस्थितीवर अवलंबून आहे. परंतु हा काळ जवळ नाहीं असे एकंदरीत सांप्रतच्या परिस्थितीवरून दिसून येते. पूर्ण स्वतंत्र होण्यापूर्वीं त्याला अनेक स्थित्यंतरांतून, अनेक दिव्यांतून जावे लागणार हें खास ! ह्मणून निराश होण्याचें कारण नाहीं. भविष्यकाल हा समतेचा व सुखाचा आहे हे बुद्धीला पटवून देऊन मानवी मनांत दुर्दम आशा व प्रचंड शक्ति निर्माण करण्याचें केवढें सामर्थ्य मार्क्सवादांत आहे हे रशियाच्या उदाहरणावरून अगदीं स्पष्ट होतें. मार्क्सवादाचा जितका जितका खोल अभ्यास करीत जावा तितका तितका तितका मानवी व्यवहारांतील एकेक गूढ प्रश्नांचा उलगडा होत जातो. हिंदुस्थानचे अनेक गुंतागुंतीचे प्रश्न सोडविण्याची ताकद एका मार्क्स-वादांत आहे, मार्क्सवादाचा जितका सखोल व व्यापक अभ्यास हिंदुस्थानांत होईल तितका पाहिजे आहे. आज हिंदुस्थानचे राजकीय प्रश्न राष्ट्रवादासारख्या भावनात्मक तत्वज्ञानानें सुटणार नाहीत. शास्त्रीय दृष्टि ज्याला ह्मणतात, त्याच्याच अवलंबनाने हे प्रश्न सुटू शकणार आहेत आणि मार्क्सवाद ही शास्त्रीय दृष्टि प्राप्त करून देणारे तत्त्वज्ञान आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
क्र.

## १०. फ्रेडरिक एंजल्स.

मार्क्सच्यानंतर अडीच वर्षांनीं ह्मणजे २८ नोव्हेंबर १८२० रोजीं बारमेन येथील एका मातबर कारखानदाराच्या पोटीं एंजल्स याचा जन्म झाला. त्याचें बालपण अत्यंत सनातनी ( Couscrvative ) अशा वातावरणांत गेलें होतें. बारमेन येथें त्याचें दुय्यम शिक्षण पुरें झाल्यावर एल्बरफेल्ड येथील व्यायाम शाळेंत तो दाखल झाला. परंतु लगेच एका वर्षानंतर आपला शिक्षणक्रम संपविण्यापूर्वींच तो आपल्या वडीलाच्या धंद्यांत शिरला. १८४१ मध्यें बर्लीन येथील गार्ड तोफखान्यांत त्यानें नोकरी धरली व पुढें लगेच युद्धशास्त्रांत तो सल्लागार गणला जाऊं लागला. हा लष्करी अनुभव घेतल्यावर अर्मेन व एंजल्स यांच्या मँचेस्टर येथील सुत कातण्याच्या गिरणींत एजंट या नात्यानें तो वावरूं लागला. या पूर्वींच समाज व तत्त्वज्ञान यांविषयींच्या विचारांत होत असलेल्या नूतन प्रगतीकडे त्याचें लक्ष वेधलें गेलें होतें. तदनुरूप इंग्लंडला जात असतां वाटेंत ऱ्हायनिश झिटूंगच्या संपादकीय कचेरींत त्यानें मार्क्सची प्रथम भेट घेतली. यावेळीं दोघांची मानसिक दृष्टादृष्ट न झाल्यामुळें एंजल्सचें मार्क्सकडून बरोबर स्वागत झालें नाहीं. पुढें इंग्लंडमध्यें चार्टिस्ट, कल्पनावादी ( Utopian Socialists ) व ट्रेड युनियनिस्ट यांच्या बरोबर त्यानें आपला संबंध जोडून घेऊन भांडवलशाही युगांत उत्तरोत्तर होत असलेल्या औद्योगिक उत्कर्षाबद्दल संपूर्ण माहिती करून घेतली. या माहितीच्या

जोरावर भांडवलशाही समाज-रचनेवर कोरडे ओढणारें असें ' १८४४ मधील इंग्लंडांतल्या कामगारांची स्थिति ' हें पुस्तक त्यानें प्रसिद्ध केलें. इंग्लंडहून परत फिरल्यावर ' पवित्र कुटुंब ' हें पुस्तक लिहिण्याच्या कामीं त्यानें मार्क्सला मदत केली. १८४५ त त्यानें स्वतःला अप्रिय झालेल्या अशा आपल्या धंद्याला रामराम ठोकला व ब्रुसेल्स येथें जाऊन मार्क्सला त्याच्या ग्रंथकर्तृत्वाच्या कामीं सहाय्य करतां झाला. या पुढील दोन वर्षांत दोघेही संशोधन लेखन व संघटण करण्यांत गुंतले होते.

कम्युनिस्ट लीगसाठीं नवा कार्यक्रम तयार करण्याकरतां त्यानें पॅरिस संघाचा प्रतिनिधि या नात्यानें १८४७ च्या उन्हाळ्यांत लंडनला भेट दिली व कम्युनिस्ट मॅनिफेस्टो ग्रथित करण्याच्या कामीं मार्क्सला सहाय्य केलें.

१८४९ मध्यें अखिल जर्मन साम्राज्यासाठीं घटना मागणाऱ्या पॅलॅटीनेट येथील स्वयंसेवक सेवादलांत त्यानें आपलें नांव नोंदून घेतलें; व तेथून परत लंडनला आल्यावर १८४८-५० च्या क्रांतिकारक चळवळींत तो मार्क्सचा सहकारी बनला. १८५० त मार्क्सला ग्रंथ-लेखनाचे कार्य सुलभ व्हावें म्हणून त्यानें आपल्या धंद्यांत पुनश्च प्रवेश केला.

यानंतरच्या २० वर्षांच्या अवधींत मार्क्स व एंजल्स यांच्या गांठी-भेटी क्वचित्‌च पडल्या असतील. परंतु त्यांचा पत्रव्यवहार बहुतेक रोजच्या रोज चालत असे. आपण संशोधन करून काढलेले सिद्धांत ते एकमेकाला परीक्षणार्थ पाठवीत असत. दोघांचा पूर्ण विचारविनिमय झाल्यानंतरच ते सिद्धांत प्रसिद्ध केले जात. 'न्यूयॉर्क ट्रिब्यून'ला मार्क्स जें लिखाण पाठवीत असे त्यांत त्याला एंजल्सची भरपूर मदत मिळत असे. औद्योगिक जीवना-संबंधाची संपूर्ण ऐतिहासिक माहिती एंजल्सनें मार्क्सला पुरविली. मार्क्स एंजल्सला लिहितोः-' आपल्या मदतीशिवाय मला ' भांडवल ' हा ग्रंथ केव्हांही पुरा करता आला नसता. माझ्या मनावर या ग्रंथलेखनकार्याचें

पर्वतप्राय ओझें पडलेलें आहेच. परंतु महत्वाची गोष्ट ही कीं आपण मात्र आपल्या दिव्य कार्यशक्ति माझ्यासाठीं निरर्थक धंद्यांत गुंतवून गंजवून टाकता आहात' १८६० मध्यें एंजल्सचा पिता निवर्तल्यावर तो स्वतः आपल्या वडिलाच्या धंद्यांत भागीदार झाला. धंद्यातून मुक्त होण्याबद्दलच्या आपल्या इच्छेसंबंधीं एंजल्स मार्क्सला लिहितो:—

'या नामर्द धंद्यापासून केव्हां मोकळा होईन असें मला झालें आहे. यापासून केवळ माझ्या वेळेचा अपव्यय होतो, इतकेंच नव्हे तर माझा पूर्णपणें नैतिक अधःपात होत चालला आहे. जोपर्यंत मी या धंद्यांत आहे, तोपर्यंत माझ्या हातून कांहीं एक होणें शक्य नाहीं. विशेषतः भागीदार झाल्यापासून तर माझी जबाबदारी दिवसेंदिवस वाढतच आहे. या धंद्यापासून मजला भरपूर नफा झाला नसता तर एकादा कारकून होणें मी पत्करलें असतें.'

यावरून या दोघांचा परस्पर संबंध किती जिवाभावाचा व बौद्धिक सहकारित्वावर रचिला गेला होता हें स्पष्ट होतें.

१८६९ मध्यें पुनः तोच धंदा स्वतः करावयाचा नाहीं या करारावर पुष्कळ मोबदला घेऊन एंजल्सनें आपली भागीदारी विकली. यायोगें दरसाल ३५० पौंड मार्क्सला देणें एंजल्सला सोपें जाऊं लागलें. १८७० च्या सप्टेंबर महिन्यापासून एंजल्स लंडन येथें जाऊन राहूं लागला. या नंतर मार्क्सच्या मरणापर्यंत हे दोन स्नेहबद्ध जीव एकमेकाच्या आजूबाजूला राहून कार्य करूं लागले. मार्क्सनें मुख्यत्वेंकरून पद्धतवार आर्थिक व सामाजिक सिद्धांत बसविण्याकडे आपल्याला वाहून घेतलें तर एंजल्सनें त्या सिद्धांतामुळें प्राप्त झालेल्या नवदृष्टीनें तत्कालीन विविध प्रश्नाचा उहापोह करण्याकडे आपलें लक्ष लाविलें.

मार्क्सच्या मरणोत्तर एंजल्सनें मार्क्सच्या अनेक ग्रंथांचे भाषांतर केलें; अपूर्ण ग्रंथ संपूर्ण करून ते प्रकाशित केलें एवढा प्रचंड खटाटोप

करून तो ता. ६ ऑगष्ट १८९५ रोजीं आपल्या वयाच्या ७५ व्या वर्षी निवर्तला. त्याचे प्रमुख ग्रंथ ' Socialism from utopia to Science ' 'Condition of working class in England in 1844' 'Origin of the family and Feurbach;' "Tne roots of the socialist Philosophy.' हें होत. एंजल्स हा शरीरानें उंच सरळ व सडपातळ भाषणांत चलाख व विनोदी, बुद्धिमत्तेनें असामान्य असा होता, असें त्याचें सर्वत्र वर्णन आहे. त्याला आत्मप्रकाशन मनापासून आवडत नव्हते. तो मार्क्सच्या कार्यापुढे स्वतःचे कार्य कस्पटासमान लेखित असे. तो पूर्ण आशावादी होता इतकेच नव्हे; तर त्याला पूर्वायुष्यांत क्रांति ही थोड्याच वर्षांत घडून येणार असें सतत वाटत असे. याखेरीज एंजल्सच्या कार्याविषयींची माहिती ठिकठिकाणी ग्रंथांत आलीच आहे.

REFBK-0005441

AWARDED GOLD & SILVER MEDALS AND CERTIFICATE
IN EXHIBITIONS.

PURELY SWADESHI! PRICES COMPETITIVE!!

FOR ENTIRE SATISFACTION
AND
UPTO-DATE
LEATHER ARTICLES

*Please Enquire:—*

**The Bharat Leather Goods Mfg. Co.**

AND

**ARTISTS IN TAXIDERMY.**

Thalakwadi-BELGAUM.

*We Manufacture Superior:—*

Money purses, Belts, Suit-Cases, Document-Cases, Dog-Collors, Medicine-Bags, Rifle-Cases, Cartridge-Bags, Cartridge-Belts, Hawersacks, Camera-Cases, Hold-alls, School-Bags, etc. etc.

LIBERAL TERMS TO TRADERS.

*Our Stockist:—*

**THE VASANT STORES.**

*General Merchant,*

Khade Bazar, BELGAUM.

समाजवादाच्या पार्श्वभूमीवर रंगविलेली
ललित, मधुर कादंबरी

# वा-द-ळ.

लेखकः-श्री. बा. कृ. गलगली, सहसंपादक, 'तरुण भारत' बेळगांव

प्रस्तावनाकारः-श्री. वि. स. खांडेकर.

**लवकरच प्रसिद्ध होणार!!**

# गजकर्ण खरूज नायटे वगैरे

त्वच्या रोगांनी गांजलेल्या लोकांना

छातीठोक हमी.

रजिस्टर्ड

# गोवा मलम

गुण न आल्यास पैसे परत

स्टार कंपनी बेळगांव

# —भारत फोनोस—

# सरकारी मान्यता

सरकारनें ग्रामसुधारणा मंडळाच्या कार्यक्रमांतील करमणुकीचे विभागांत प्रत्येक तालुक्यांत

## भारत फोनोच पसन्त केले

आपणही वापरून पहा.

**स्वर्गीय संगीताचा आस्वाद**

**आपल्याला**

# भारत फोन्स

# भारत हार्मोनिअम्सवर

अस्सल बरहुकूम
आवाजासाठीं
भारत फोनोवर
भारत निडल्स वापरा.

**हमखास मिळेल.**

**अधिक माहितीसाठीं**

**कॅटलॉग मोफत.**

## लिहा:—भारत फोनो वर्क्स, बेळगांव.

# हे गतिमान युग आहे!

## मग सायकलीशिवाय कसें भागेल?

## तर या, आणि खरेदी करा.

हरतऱ्हेच्या नवीन व सेकंडहँड सायकली
माफक किंमतींत मिळण्याचें आणि
ग्रामोफोन यांच्या रिपेअरीचें
तसेंच
सेकंड हँड सायकली घेऊन योग्य भावांत
नवीन सायकल मिळण्याचें

### एकच ठिकाण.

## मालाचा जंगी स्टॉक.

# स्वतंत्र भारत सायकल स्टाअर्स,

पंपिंग स्टेशन जवळ, बेळगांव.

प्रोप्रा.:—जी. वाय. पावसे.

डॉक्टर, वैद्य, व अनुभविक सद्गृहस्थाकडून
शिफारसपत्र मिळालेले
रजिस्टर्ड

# भोसकी लोशन

ह्या औषधांनीं कोणतेही त्वचा रोग बरे होतात. इतकेंच नव्हे तर इलेक्ट्रीक ट्रीटमेंटनेंही बरे न होणारे— इसब, गजकर्ण, कनवट, नायटा, कंडू, आगपेण खरूज वगैरे त्वचा रोगाचा समूळ नायनाट करण्यांत असे औषध दुसरें नाहीं. प्रत्येक बाटलीची किंमत ८८ आणे. ट. ख. शिवाय.

—: सर्वत्र मिळते :—

तयार करणारः—एस्. डी. भोसकी, हलकर्णी
(कोल्हापूर)